सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. ०८ सप्टेंबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक १५६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# उद्योग-व्यवसायासाठी १५ लाखांचे कर्ज देण्याचा निर्णय-मुख्यमंत्री

पुणे, ७ सप्टेंबर : रामोशी-बेडर समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून दोन लाख रुपयांपर्यंतचे बिगर तारण कर्ज, तसेच समाजात उद्योजक व व्यावसायिक घडावेत यासाठी १५ लाख रुपयांचे कर्ज देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. रामोशी समाजाच्या विकासासाठी यापुढेही सहकार्य करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या २३४ व्या जयंतीनिमित्त पुरंदर तालुक्यातील भिवडी येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, आमदार विजय शिवतारे, गोपीचंद पडळकर, राहुल कुल, विक्रम पाचपुते, माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर, माजी आमदार संजय जगताप, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, दौलत शितोळे, अंकुश जाधव, मोहन मदने आदी उपस्थित होते. इंग्रजांविरुद्ध पहिली ठिणगी पेटवणारे आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक हे खऱ्या अर्थाने क्रांतिकारक होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांप्रमाणेच त्यांनी



गनिमी काव्याच्या सहाय्याने ब्रिटिशांना धडा शिकवला. समाजाच्या शौर्याची परंपरा आजही जिवंत असून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केले. रामोशी-बेडर समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून समाजाला दोन लाख रुपयांपर्यंतचे बिनतारण कर्ज, तर उद्योजक व व्यावसायिक घडावेत यासाठी १५ लाख रुपयांचे कर्ज देण्यास मंत्रीमंडळाने मंजुरी दिली आहे. पोलिस भरतीसाठी विशेष योजना, तसेच शिक्षण व प्रशिक्षणाकरिता महाज्योती आणि सारथीमार्फत योजना राबवल्या जातील, असे आश्वासन श्री. फडणवीस यांनी दिले. ओबीसी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, शासनाने ओबीसी मंत्रालय, महाज्योती आणि विविध महामंडळे स्थापन करून विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिष्यवृत्ती, ४२ वसतीगृह व विविध प्रशिक्षण योजना सुरू केल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी १८ पगड जातींना एकत्र करून स्वराज्य उभारले, त्यांचे शिवकार्य पूर्णत्वास नेण्यासाठी सर्व जातींना मुख्य प्रवाहात आणणे हेच शासनाचे ध्येय असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, उमाजी नाईक हे इंग्रजांच्या विरोधात संघर्षाची ठिणगी पेटवणारे पहिले नेते होते. रॉबर्टने ब्रिटिशांना लिहिलेल्या पत्रात उमाजी नाईक गनिमी काव्याने छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणेच लढतात असा उल्लेख आहे. अन्यायाविरुद्ध उभे राहत त्यांनी सामान्यांसाठी अज्ञापत्र काढले. त्यांच्या कार्याची दखल घेत इंग्रजांनी त्यांना पकडण्यासाठी १० हजार रुपयांचे इनाम जाहीर केले होते. रामोशी-बेडर समाजाला घाबरवण्यासाठी इंग्रजांनी त्यांना फाशी दिली; तरीही हा समाज स्वातंत्र्यलढ्यात मागे राहिला नाही. इंग्रजांच्या कारस्थानामुळे समाजावर गुन्हेगारीचा शिक्का बसला, जो स्वातंत्र्यानंतर पाच वर्षांनी पुसला गेला. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले म्हणाले , मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नामुळेच राज्यात इतर मागासवर्गीयांसाठी स्वतंत्र मंत्रालय, स्वतंत्र मंत्री व विविध महामंडळे अस्तित्वात आली. महाज्योतीसारख्या संस्थेमुळे अनेक वंचित घटकांतील तरुण तहसीलदार, पोलीस निरीक्षक, वैमानिक होऊ शकले. आमदार पडळकर यांनी आपल्या मनोगतात राज्य शासनाने इतर मागासांसाठी केलेल्या कामांची माहिती सांगून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या गुप्तहेर खात्याचे प्रमुख बहिर्जी नाईक यांचे स्मारक होत असल्याचे आणि आता पुरंदर येथे राजे उमाजी नाईक यांचे पाच एकरमध्ये स्मारक उभारले जाणार असल्याचे सांगितले.

# उत्तर भारतात पाऊस आणि पुराचे थैमान

नवी दिल्ली, ०७ सप्टेंबर : देशभरात मुसळधार पावसामुळे डोंगराळ भागांपासून ते मैदानी प्रदेशांपर्यंत जनजीवन विस्कळीत झाले आहे. हवामान विभागाचे अलर्ट सातत्याने खरे ठरत असून उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, पंजाब, बिहारसह अनेक राज्यांमध्ये पाऊस आणि पुराचा प्रकोप सुरू आहे. हवामान विभागाने दिल्ली आणि उत्तर प्रदेशातील अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.

उत्तराखंडच्या नैनीताल आणि चंपावत जिल्ह्यांत भूस्खलनाचा इशारा देण्यात आला आहे.

राजस्थानमधील बांसवाडा, डूंगरपूर, प्रतापगड, सिरोही आणि उदयपूर जिल्ह्यांत पुराचा धोका वाढला आहे.राजसमंद ते जोधपूर राष्ट्रीय महामार्ग (एनएच-१६२) पाण्याच्या प्रवाहामुळे अर्धा किलोमीटरपर्यंत वाहून गेला असून, वाहतूक बंद करण्यात आली आहे. जयपूर-केकडी महामार्ग मागील ४ दिवसांपासून बंद आहे. जयपूरमध्ये चार मजली मोडकळीस आलेल्या इमारतीचा अर्धा भाग कोसळला, ज्यात पिता-पुत्रीचा मृत्यू, तर ५ जण जखमी झाले.कोटामध्ये वीज कोसळून एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला. तसेच हिमाचल प्रदेशातील कुल्लू शहरात शनिवारी इनर अखाडा बाजार परिसरात मलब्यातून ४ मृतदेह सापडले. उत्तराखंडच्या उत्तरकाशी जिल्ह्यातील नौगाव नगर पंचायत भागात ढगफुटीमुळे नाले उफाळून वाहू लागले. बाजार परिसरात गोंधळाची स्थिती निर्माण झाली. एका घराचे मोठे नुकसान झाले.

यासोबतच हरियाणामध्ये सलग पावसामुळे सुमारे १० लाख एकर शेती पाण्याखाली गेली आहे. ई-क्षती पोर्टलवर ३ हजार गावांमधील १.७ लाख शेतकऱ्यांनी पीक नुकसानीचा अहवाल नोंदवला आहे. त्याचप्रमाणे दिल्लीतील यमुना नदीचा पाण्याचा स्तर २०७ मीटर खाली आला आहे, पण तो अजूनही धोक्याच्या २०५.३३ मीटरच्या स्तरापेक्षा अधिक आहे. सध्या २० हजारांहून जास्त नागरिक राहत छावण्यांमध्ये राहत आहेत, जिथे पिण्याचे पाणी, अन्न, औषधे, स्वच्छता यांसारख्या मूलभूत सुविधांचा तुटवडा आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी ९ सप्टेंबर रोजी पंजाबमधील पूरग्रस्त भागांचा दौरा करणार आहेत. त्यांच्या गुरदासपूर येथे सर्वप्रथम येण्याची शक्यता आहे, जिथे रावी नदीच्या पाण्याने मोठे नुकसान केले आहे. मोदी अमृतसर आणि तरनतारन जिल्ह्यांचा देखील हवाई पाहणी दौरा करू शकतात.

पंजाब सरकारला अद्याप अधिकृत दौऱ्याची माहिती मिळालेली नसली, तरी राज्याचे मुख्य सचिव के.ए.पी. सिन्हा यांनी पंतप्रधानांच्या संभाव्य दौऱ्याला दुजोरा दिला आहे.

# राज्यात विसर्जनादरम्यान अनेक जण बुडाले, मुंबईत शॉक लागून एकाचा मृत्यू

मुंबई, ७ सप्टेंबर : राज्यात सर्वत्र गणेश विसर्जनाचा उत्साह शिगेला पोहोचला असताना उत्सवाला गालबोट देखील लागले. मुंबईसह राज्यात अनेक ठिकाणी भाविक वाहून गेल्याच्या घटना घडल्या. तसेच मुंबईत शॉक लागून एकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

मुंबईतील साकीनाका परिसरातील एका विसर्जन मिरवणुकीत हाय टेन्शन वायरमधून शॉक लागल्याने एकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली आहे. श्री गजानन मित्र मंडळाची विसर्जन मिरवणूक सुरू असताना त्यांच्या ट्रॉलीला लटकलेल्या हाय टेन्शन वायरचा शॉक लागला. यात बिनू शिवकुमार (३६) या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर तुषार गुप्ता (१८), धर्मराज गुप्ता (४४), आरुष गुप्ता (१२), शंभू कामी (२०) आणि करण कानोजिया (१४) यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. टाटा पॉवर कंपनीची ११ हजार व्होल्टेजची वायर मिरवणुकीच्या ट्रॉलीला लागली. त्यामुळे ही दुर्घटना घडल्याचे बोललं जात आहे.

# दलित आघाडीचे नेतृत्व मायावतींनी स्वीकारावे - रामदास आठवले

नवी दिल्ली, ०७ सप्टेंबर : दलित राजकारणाच्या एकत्रिकरणासाठी बहुजन समाज पार्टीच्या नेत्या मायावती यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले आहे.

एका मुलाखतीत आठवले म्हणाले की, भविष्यात दलित आघाडी स्थापन झाली, तर तिचे नेतृत्व मायावतींनी करावे. देशातील सर्वच राजकीय पक्ष आज बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेत आहेत, ही अभिमानाची बाब आहे. देशातील दलित नेते एकत्र आले, तर एखादा दलित पंतप्रधानही होऊ शकतो असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. दलित एकतेसाठी 'नॅशनल दलित फ्रंट' सारखी मोहीम हवीपूर्वी रामविलास पासवान, उदित राज आणि आठवले यांनी 'नॅशनल दलित फ्रंट'च्या माध्यमातून एकत्र येण्याचा प्रयत्न केला होता. दलित राजकारणाच्या एकतेसाठी मायावती एक पाऊल पुढे आल्या, तर मी १० पावले मागे जाईन असे नमूद करत आठवले यांनी एकजुटीचे आवाहन पुन्हा केले. लोकसभेत रिपाईचा एकही खासदार नसतानाही पंतप्रधान मोदींनी मला सलग तिसऱ्यांदा मंत्रीपद दिले. भाजप आणि एनडीएने मला मान दिला, त्यामुळे मी पक्ष देशभरात वाढवू शकलो असेही त्यांनी नमूद केले. त्याचवेळी प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व संपेल या भाजप नेत्याच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना आठवले म्हणाले की, हा दावा तथ्यहीन आहे. प्रादेशिक पक्षांची गरज आणि अस्तित्व कायम राहिल असा दावा त्यांनी केला.

फडणवीस सर्वसमावेशक नेते

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर विश्वास व्यक्त करत आठवले म्हणाले की, फडणवीस हे सर्व वर्गांना सोबत घेऊन चालणारे नेते आहेत. आरक्षणाच्या मुद्यावर त्यांच्या विरोधात कटकारस्थान सुरु आहे, पण त्यांनी आताही आपले सर्वसमावेशक नेतृत्व दाखवले.

## झारखंड : चकमकीत नक्षलवाद्यांचा झोनल कमांडर ठार

चायबासा, ०७ सप्टेंबर : झारखंडच्या पश्चिम सिंहभूम चिल्ह्यातील गोइलकेरा पोलिस ठाण्यांतर्गत येणाऱ्या आराहासा परिसरातील रेला गावानजीक असलेल्या बुरजूवा डोंगर परिसरात पोलिस आणि नक्षलवाद्यांमध्ये जोरदार चकमक उडाली. या चकमकीत नक्षलवाद्यांचा झोनल कमांडर अमित हांसदा ऊर्फ अपटन ठार झाल्याची माहिती मिळत आहे. त्याच्यावर १० लाख रुपयांचे बक्षीस घोषित करण्यात आले होते. यासंदर्भातील माहितीनुसार चायबासाचे जिल्हा पोलीस अधीक्षक (एसपी) राकेश रंजन यांना गुप्त माहिती मिळाली होती की, रेला पराळ परिसरात माओवादी नक्षलवादी सक्रिय आहेत. यानंतर, पोलीस व सीआरपीएफच्या संयुक्त पथकाने त्या भागात शोधमोहीम सुरू केली. शोध मोहीमेदरम्यान नक्षलवाद्यांनी अचानक पोलिसांवर गोळीबार सुरू केला. पोलिसांकडूनही प्रत्युत्तरात गोळीबार करण्यात आला. संपूर्ण डोंगराळ परिसराला सुरक्षादलांनी घेरले असून नक्षलवाद्यांचे पळवाटे बंद करण्याचा प्रयत्न सुरू आहे. एसपी राकेश रंजन या संपूर्ण कारवाईवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. परिसरात अतिरिक्त पोलिस दलही तैनात करण्यात आले आहे.

# अमेरिकेचे लष्करी विमान थेट पाकिस्तानमध्ये उतरल्याने खळबळ

नवी दिल्ली: भारत आणि अमेरिकेतील संबंध तणावपूर्ण असतानाच, अमेरिकन हवाई दलाचे एक मोठे लष्करी विमान थेट पाकिस्तानच्या नूर खान एअरबेसवर उतरल्यामुळे विविध शंका-कुशंकांना तोंड फुटले आहे. ५ सप्टेंबरच्या पहाटे अमेरिकन हवाई दलाचे सी-१७ ग्लोबमास्टर खखख हे मालवाहू विमान पाकिस्तानातील या महत्त्वाच्या लष्करी तळावर उतरले आहे. यामुळे भारत आणि अमेरिकेमध्ये काही कट शिजत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

अमेरिकेची 'मदतीची' भूमिका

अधिकृत माहितीनुसार, अमेरिकेने पाकिस्तानमधील पूरग्रस्तांसाठी मदत पाठवली असल्यामुळे हे विमान तिथे उतरले. यामध्ये काही औषधे, गोळ्या आणि खाद्यपदार्थांचा समावेश असल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, अमेरिकेचे इतके मोठे लष्करी विमान पाकिस्तानच्या एका प्रमुख हवाई तळावर उतरणे ही एक सामान्य घटना मानली जात नाही, म्हणूनच यामागे कोणताही छुपा अजेंडा असल्याचा संशय आहे.

नूर खान एअरबेसचे महत्त्व

पाकिस्तानमधील रावळपिंडी येथे असलेला नूर खान एअरबेस हा पाकिस्तानी सैन्याचा एक महत्त्वाचा आणि धोरणात्मकदृष्ट्या संवेदनशील तळ आहे. यापूर्वी, भारताने पुलवामा हल्ल्यानंतर याच एअरबेसवर ड्रोन हल्ला केला होता. याच तळावरून पाकिस्तान भारतावर ड्रोन हल्ले करत असल्याचे संरक्षण तज्ज्ञांचे मत आहे. त्यामुळे, इतक्या महत्त्वाच्या ठिकाणी अमेरिकेचे विमान उतरणे हा भारतासाठी चिंतेचा विषय आहे.

सध्या भारत आणि अमेरिका यांच्यात टॅरिफवरून संबंध ताणले गेले आहेत. याचदरम्यान, अमेरिकेचे विमान थेट पाकिस्तानमध्ये पोहोचल्यामुळे भारताने सावध भूमिका घेतली आहे आणि या संपूर्ण घडामोडींवर भारतीय लष्कराचे बारीक लक्ष आहे.

## मध्यप्रदेश : शिप्रा नदीत पोलिस वाहन पडले, तिघांचा मृत्यू

उज्जैन,७ सप्टेंबर : देशभरात जोरदार पावसामुळे नद्यांना पूरस्थिती निर्माण झाली आहे. मध्य प्रदेशातील उज्जैन शहरात शिप्रा नदी दुथडी भरून वाहत आहे. शनिवारी रात्री एका भीषण अपघातात पोलिसांची गाडी शिप्रा नदीत कोसळली. या गाडीमध्ये ठाणेप्रमुखांसह तीन पोलीस कर्मचारी होते.

ही घटना शनिवारी रात्री ९.३० वाजेच्या सुमारास घडली. शिप्रा नदीवरील मोठ्या पुलावरून जात असताना पोलिसांची गाडी अचानक नदीत कोसळली. अपघाताची माहिती मिळताच तातडीने बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले आणि शोधमोहीम सुरू करण्यात आली. ठाणेदाराचाा मृतदेह सापडला आहे, परंतु इतर दोन पोलीस कर्मचारी अद्यापही बेपत्ता आहेत. तब्बल११ तासांहून अधिक काळापासून रेस्क्यू ऑपरेशन सुरू आहे, मात्र उर्वरित दोघांचा ठावठिकाणा लागलेला नाही.

पावसामुळे नदीचे पाणी अधिक वेगाने वाहत असल्याने बचाव कार्यात अडथळे येत आहेत. प्रशासनाकडून शोध मोहीमेस गती देण्याचा प्रयत्न सुरू आहे.

# आनंदनगरी मध्ये चोरांचा सुळसुळाट :मोबाईल चोरीचे प्रमाण वाढले

## आनंदनगरी चालकांचे सुरक्षेकडे दुर्लक्ष:पैसे कामाविण्यात व्यस्त

माजलगाव : माजलगाव शहरात दरवर्षी प्रमाणे या वर्षीही गणपती उत्सवात आनंद नगरीत आयोजन करणयात आले आहे. आंदनगरी मध्ये राजपाळने, लहान मुलांचे मनोरंक खेळ असल्याने लहानमुलासह महिलाची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. याचा फायदा घेऊन मोबाईल चोर, पाकीट मार व गंठण चोरांनी लाखोचा ऐवज लंपास केला असून प्रशासन हातावर हात धरून बसले आहे.

माजलगाव शहरात मागील अनेक वर्षांपासून गणेशोत्सव काळात १५ ते २० दिवसापर्यंत आनंदनगरी चालू असते. सुरुवातीच्या काळात मोंढा मैदानात भरणारी ही आनंद नगरीं आता रेस्ट हाऊस रोड वर एका बंद पडलेल्या जिनिंग च्या मोकळ्या जागेत चालते. मागील १० वर्षांपासून या आनंद नगरीला दोन नंबर च्या धंद्यातील लोकांनी चालवण्यास घेतले असून तिर्ट, गुडगुडी, शूट व मटक्याच्या व्यवसायात असणारी काही टुकार पोर राजकीय पुढारी लोकाचा सहारा घेऊन सामान्य जनतेची लूट करत आहेत. शिवाय यांच्याच व्यवसायाशी निगडित काही लोक गर्दीचा फायदा घेऊन मोबाईल चोरी व पाकीट मारी, मंगळसूत्र चोरी करत असल्याची चर्चा मागील दोन वर्षांपासून जोर धरत आहे. यावर्षी ही आता पर्यंत ५-१० मोबाईल चोरीला गेले असून यातील फक्त एक दोन प्रकरनाची माजलगाव पोलीस ठाण्यात नोंद आहे.मंगळवारी रात्री ओम भंडारी व नंदिनी जेथलिया या दोघांचे मोबाईल गर्दीचा फायदा घेऊन चोरांनी लंपास केल्याची घटना पोलीस दपतरी नोंद आहे.चार दिवस उलटूनही या प्रशासन ॲकशन मोड वर नाही.

**सिसिटीव्ही नावालाच**

या आनंद नगरीत केवळ अटीची पूर्तता केल्याचे दाखवण्यासाठी ५-६ सी सी टी व्ही केमेरे लावण्यात आले असून ते ही अतिशय सुमार दर्जाचे व अनावश्यक ठिकाणी लावण्यात आले आहे. सी सी टीव्ही कॅमेऱ्याच्या समोरील बाजूस अशा प्रकारे फोकस लावण्यात आले आहे कि फोकस च्या प्रकाशा मुळे सी सी टीव्ही तील फुटेज दिसूच नये याची सोय आयोजकानी केली आहे. या मागचा त्यांचा हेतू वाईट असल्याचे स्पष्ट होते.

**फक्त पोलीस उपस्थित...**

पोलीस प्रशासन सोडता इतर कोणत्याही प्रशासनाचे कर्मचारी या ठिकाणी रात्रीच्या वेळी नसतात. केवळ पोलीस प्रशासनचा १ कर्मचारी व चार पाच होमगार्ड या ठिकाणी कार्यरत असतात.






# देवगिरी बँक कर्मचारी गणेश मंडळाच्या गणेशोत्सवात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांची प्रमुख उपस्थिती

छत्रपती संभाजीनगर - देवगिरी बँक कर्मचारी गणेश मंडळ आयोजित केलेल्या गणेशोत्सवात जिल्हाधिकारी मा.श्री. दिलीप स्वामी यांच्या प्रमुख उपस्थितीत व शहरातील नामवंत तरुण उद्योजक यांचे हस्ते गणरायाच्या महाआरतीचे आयोजन करण्यात आले. कुशल प्रशासक म्हणून कार्यरत असलेले दिलीप स्वामी हे उत्तम गायक, प्रवचनकार तसेच संत साहित्याचे गाढे अभ्यासक आहेत. आपल्या थोर संतांच्या साहित्याचे मोल अधोरेखित करताना त्यांनी समाजजीवनातील मूल्यांची जपणूक करण्यावर भर दिला. यावेळी त्यांनी उपस्थित तरुण उद्योजकांना व्यवसायातील प्रामाणिकपणा, चिकाटी यांचे महत्त्व पटवून दिले. व्यवसाय



केवळ नफा कमावण्यासाठी नसून समाज आणि कुटुंब संस्था यांना बळकट करणारा असावा. असे मार्गदर्शन त्यांनी केले. त्याचबरोबर जिल्ह्यातील विविध शासकीय कामकाजाची माहिती देत प्रशासन जनतेच्या सहभागातून अधिक परिणामकारक होते, यावर त्यांनी प्रकाश टाकला.

या प्रसंगी देवगिरी बँकेचे अध्यक्ष किशोरदादा शितोळे यांनीही मार्गदर्शन केले. त्यांनी बँकेचे कार्य आणि समाजाभिमुख उपक्रम यांची माहिती देत तरुण उद्योजकांना प्रामाणिकपणा, ग्राहकांचा विश्वास आणि संघटितपणा या तीन गोष्टी यशस्वी व्यावसायिक जीवनाचे आधारस्तंभ असल्याचे सांगितले. व्यवसाय करताना सामाजिक भान राखणे तितकेच महत्त्वाचे आहे. उद्योजकांनी स्वतःच्या प्रगतीसोबत समाजाच्या विकासातही योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमाला रविंद्र पाटील (आय.बी.), संतोषजी पाठक (सह कार्यवाह, रा.स्व. संघ), तसेच तरुण उद्योजक सौरभ भोगले, प्रसाद शेरकर, विराज शितोळे, योगेश देसरडा, सूर्यकांत अंबरवाडीकर, तेजेंद्र पाटील, हरिष अदवंत, गणेश धोंडरे, सुमीत पारेख, सौरभ देसरडा, अजय कोटगिरे, राहुल कुलकर्णी यांच्यासह अनेक मान्यवर व तरुण उद्योजक उपस्थित होते. देवगिरी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण नांदेडकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे व बँकेचे कर्मचारी उपस्थित होते.

www.tarunbharat.net

सोमवार, दि. ०८ सप्टेंबर २०२५

तरुण भारत छोटे उस्ताद

## तुम्हाला माहिती आहे का?

- मौल्यवान धातू आणि वस्तूंचे वस्तुमान मोजण्यासाठी एकक म्हणून कॅरटचा वापर केला जातो. खरा शब्द कॅरोब असा आहे, जे एक झाडाचे नाव आहे, ज्याच्या बिया एक समान वस्तुमानाच्या असतात असा समज आहे. कॅरोब्स, वाटाणा कुटुंबातील भूमध्यसागरीय प्रदेश आणि मध्य पूर्वेमध्ये आढळणारे स्थानिक झाड आहे. भारतात मात्र पूर्वी मौल्यवान वस्तूंचे वजन मोजण्यासाठी गुंजाच्या बिया वापरण्यात येत. गुंजा बी एकसमान असून या बियाण्याला किड लागत नाही.

## अशी पाखरे येती

निशिकांत मायी / ९८८११५२४३९

# सोनपाठी सुतार

निसर्गाने अनेक पक्ष्यांना विविध रंगांची देणगी बहाल केली आहे. प्रत्येक पक्षी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण रंगांनी प्रचलित होतो. सोनपाठी सुतार नामक पक्षी एक पक्षी आहे, ज्याला निसर्गाने सोनेरी पाठ प्रदान केली आहे. पाठीचा रंग सोनेरी असल्याने त्याला सोनपाठी सुतार असे नाव पडले आहे. सुमारे ३० सेंमी आकाराचा सोनपाठी सुतार या पक्ष्याला मराठीत सोनटी असेही म्हणतात. संपूर्ण भारतात आढळून येणारा सोनपाठी सुतारच्या नर पक्ष्याच्या पाठीचा रंग सोनेरी पिवळा असतो. त्याच्या डोक्यावर लाल तुराही दिसतो. डोळ्याच्या जवळ काळे आणि पांढुरके पट्टे असून, पोट फिकट पांढऱ्या रंगाचे असते. विविध जंगलात, बागांमध्ये तो प्रामुख्याने विहरताना नजरेस भरतो तो त्याच्या सोन्याच्या रंगाच्या पाठीच्या रंगामुळे! कीटक किंवा त्यांची अंडी तसेच फळे, बिया आणि मध हा या पक्ष्यांचा आहार असून



सुतार पक्ष्यांप्रमाणेच हे पक्षीही झाडांमध्ये खोबणी करून घरटे बनवतात. तिथेच मादी सोनपाठी सुतार पिलांचे संगोपन करतात. सोनपाठी सुतार या पक्ष्याच्या रंग आणि आकारावरून त्याच्या उपजाती असल्याची नोंद करण्यात आली आहे. काळ्या रंगाची शेपटी या पक्ष्याला लाभली आहे. नर आणि मादी दोघेही दिसण्यात सारखेच असतात. मात्र, दोघांच्या रंगांवरून नर आणि मादीची ओळख पटवता येते. भारतासह पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका येथे दोन तर म्यानमार येथे तीन उपजाती नोंदविण्यात आल्या आहेत. सोनपाठी सुतार पक्षी झाडाच्या सालीत लपलेले कीटक पकडण्यासाठी वेगाने झाडाच्या खोडात छिद्र पाडतो आणि ही याची विशेषता आहे. कीटकांशिवाय पिकलेली फळेही या पक्ष्याला आवडतात. उडताना कर्कश्श ओरडणे ही याची प्रमुख ओळख असून, या आवाजावरून त्याला सहज शोधून काढता येते. जमिनीपासून उंचावरील झाडाच्या ढोलीत सोनपाठी सुतार घरटे तयार करतो आणि तिथे मादी विणीच्या हंगामात एकाच वेळी दोन ते तीन चमकदार अशी पांढऱ्या रंगाची अंडी देते. नर आणि मादी दोघेही पिलांची देखभाल करून कालांतराने सोन्याच्या रंगाची पाठ असणारे पुन्हा जीव जन्माला येऊन सोनपाठी सुताराची वंश परंपरा सुरू होते.

## Math Puzzle

Solve the puzzle and answer it

A * A * A = 27

A * B * B * B = 24

A * B * C * C = 96

A * B * C = ?




## देशोदेशीच्या लोककथा

प्रीती वडनेरकर/ ९८२३९९४७९२

# पराक्रमी मयुरेश

भाग ८



बालमित्रांनो, गणपतीच्या अनेक कथा तुम्ही ऐकल्या-वाचल्या असतील. गणेश, मयुरेश, गजानन, चिंतामणी आणि अजून कितीतरी! गणपतीने वेळोवेळी दुष्टांचा, राक्षसांचा संहार करण्यासाठी अवतार घेतले. त्यातल्या मयुरेशाची ही कथा! मिथिल देशात गंडकी नावाची नगरी होती. तिथे चक्रपाणी राजा राज्य करत होता. त्याच्या राणीचं नाव होतं उग्रा. त्यांना मुलबाळ नव्हतं. त्यांच्याकडे शौनक ऋषी आले असताना, राजा-राणींनी त्यांचा यथायोग्य आदरसत्कार केला आणि आपलं दुःख सांगितलं. शौनक ऋषींनी प्रसन्न होऊन आशिर्वाद दिला. 'तुम्हाला पुत्र होईल, परंतु त्यासाठी तुम्हाला सौरव्रत म्हणजे सूर्याचं व्रत करावं लागेल.'

त्या व्रतामुळे राणीला तीन डोळ्यांचा पुत्र झाला. राणीला त्याचा उग्र दाह सहन होईना. तिने त्याला समुद्रात सोडले. मात्र, समुद्रही त्याच्या धगीने कोरडा पडू लागला. त्यामुळे समुद्राने परत त्याला राजाकडे सोडले. पाण्याने दिलेला पुत्र म्हणून राजाराणीने त्याचे नाव 'सिंधू' ठेवले. सिंधू अतिशय तापट होता. मोठेपणी त्याचा देह अक्राळ विक्राळ झाला. त्याने वनात जाऊन सूर्याची कडक उपासना केली. सूर्याने प्रसन्न होऊना त्याला अमृत प्राशन करण्यास दिले आणि सांगितले,'हे अमृत, तुझ्या नाभीतून जो दूर करेल, त्याच्यापासून तुला मृत्यू ओढवेल.' सिंधू राजवाड्यात परत आला. राजाने त्याचा राज्याभिषेक केला. राज्यपद मिळाल्यावर सिंधू सर्व सैन्यानिशी, पृथ्वी जिंकायला निघाला. एकेक करत त्याने सर्व देश जिंकले. मग, त्याने इंद्रलोकात प्रवेश केला. इंद्र धावत विष्णुदेवाकडे गेला. सिंधूने इंद्राच्या ऐरावताचे गंधस्थळ फोडले. सिंधू आणि विष्णुदेव यांच्यात तुंबळ युद्ध झाले. विष्णुदेवांच्या गदेचे, सिंधूने दोन तुकडे केले. विष्णूदेव सिंधूच्या शौर्यावर आनंदले. प्रसन्न होऊन, त्यांनी सिंधूला वर मागायला सांगितले. 'तुम्ही माझ्या गंडकी नगरीत वास्तव्यास यावे.' विष्णुदेवांबरोबर सर्व देवांना गंडकी नगरीत राहणे भाग पडले. सिंधूच्या तावडीतून सुटण्यासाठी सर्व देवांनी गणेशाची मूर्ती बनवून त्याची पूजा केली. गणेश प्रसन्न झाला. सर्व देवांनी आपलं गाऱ्हाणं मांडलं.'देवाधिदेवा, या सिंधू राक्षसानं फार उच्छाद मांडला आहे. काही करून त्याला हरवायला हवे,' इंद्र म्हणाले.

'काळजी करू नका. मी माता पार्वतीच्या पोटी जन्म घेईन. मयूरेश म्हणून प्रसिद्ध होईन. मी सिंधू राक्षसाचा वध करेन,' गणेशाने आश्वासन दिलं. त्याप्रमाणे माता पार्वतीने तपश्चर्या केली आणि गणेशाने पुन्हा तिच्या पोटी जन्म घेतला. सर्व श्रेष्ठ ऋषीमुनींनी येऊन त्याला शुभाशिर्वाद दिला. त्याचवेळी सिंधूचे गुप्त दूत आकाशमार्गे जात होते. त्यांनी सर्व वर्णन सिंधूला कथन केले.

सिंधू घाबरला. त्याने आपल्या सर्व राक्षसांना, आपल्या मारेकऱ्यांचा शोध घेऊन त्याला ठार मारण्याच्या योजना आखल्या. त्याचे सारे राक्षसगण त्रिसंध्या क्षेत्रात गुप्तरूपानं येऊन राहू लागले. गृधासूर राक्षसानं गिधाडाचं रूप घेतलं आणि बाळाला पायाच्या पंजांनी उचललं. बाळानं गिधाडाची चोच आपल्या बाळमुठीमधे घट्ट पकडून ठेवली आणि त्याचा श्वास रोखून ठेवला. आपल्या खऱ्या रूपात गृधासुर मरून पडला.

बाळाच्या पाळण्यात, क्षेम आणि कुशल हे दोन राक्षस उंदराच्या रूपात चढले. बाळाचे हात अंगावर पडले आणि दोन्ही राक्षस मेले. क्रूर नावाच्या राक्षसानं बोक्याचं रूप घेतलं. त्यानं पाळण्यात उडी मारली. बाळाच्या टाळूवर आपले दात रोवणार इतक्यात, बाळानं बोक्याचे दोन्ही कान आपल्या हातात पकडून पिरगाळले. त्याला अक्षरशः रक्तबंबाळ केले. तो ही मरून पडला.

जावळं काढलेल्या बाळाला अंगणात ठेवलं असताना व्योमासूर राक्षसानं आंब्याच्या झाडात प्रवेश केला. ते बाळाच्या अंगावर कोसळण्याच्या तयारीत असतानाच झाडाचे तुकडे झाले.

बाळ जसजसा मोठा होऊ लागला, तसतसे सिंधूचे राक्षस निरनिराळ्या रूपात येऊन बाळाला ठार मारायचा प्रयत्न करत राहिले. बाळ सहा वर्षांचा असताना विश्वकर्मा तिथे आले. त्यांनी 'बाल गुणेशाला मी अंकुष, परशू, पाश आणि पद्म अर्पण करतो.' एवढं बोलून विश्वकर्मा निघून गेले. सिंधू राक्षसाच्या कानावर या सर्व गोष्टी पोहचत होत्या.

कश्यप ऋषींची पत्नी विनिताला जंगलात एक अंड सापडलं. ते अतिशय कठीण होतं. इतकं की, वज्र आणि पर्वतही ते फोडायला असमर्थ होते. योगायोगानं, गुणेश एका राक्षसाला मारण्यासाठी तिथे आला. त्याला झाडाच्या ढोलीत ते अंडं मिळालं. त्याने ते अंडं हातात घेताच ते फुटलं. त्यातून मोर बाहेर पडला. तेव्हापासून मयूर गुणेशाचं वाहन झाला आणि गुणेशाला मयूरेश हे नाव मिळालं. या नावाने संबोधू लागले.

प्रथम नंदी पुढे गेला. त्यानं सिंधूला देवांना सोडण्याची विनंती केली. पण, त्याने नंदीचा घोर अपमान केला. हे कळताच मयुरेशने तात्काळ युद्धाची आज्ञा दिली. त्याच्या सैन्यानं कित्येक राक्षसांना ठार मारलं. सिंधू राक्षस संतप्त झाला. तुंबळ युद्ध झाले. राक्षसाचे दैत्य, अमात्य मारले गेले. सूर्यानं दिलेला प्रखर बाण सिंधूने सोडला. पण, मयूरेशनं परशूने त्याचा छेद केला. सिंधूने चक्र सोडले आणि मयूरेशने शूलाने ते मोडले. सिंधूचे पुत्र धर्म आणि अधर्म मारले गेले. त्याच्या शोकाकुल पत्नीने युद्ध थांबवण्यासाठी सिंधूला विनंती केली. चक्रपाणी राजानेही त्याला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु तो मागे हटला नाही.

सिंधू मयूरेशला मारायला धावला. मयुरेशनं विराट रूप धारण केलं. संपूर्ण आकाश व्यापलं. मयूरेशनं स्वतःचा परशू अभिमंत्रून सोडला. तो सिंधूच्या नाभीत शिरला आणि त्यातून अमृत बाहेर पडलं. तो तात्काळ मरण पावला. सर्वत्र आनंदी आनंद झाला. विष्णुदेवांसह साऱ्यांची सुटका झाली.

## तरुण भारतचा अभिनव उपक्रम

# ज्ञानांजली!



**संतश्रेष्ठ** गजानन महाराज यांच्या चरित्राविषयी सविस्तर जाणून घेण्यासाठी श्रीगजानन महाराज अध्ययन समूह, नागपूरच्या सहकार्याने तरुण भारतच्या वतीने, 'ज्ञानांजली' हा अभिनव उपक्रम सुरू आहे. श्री गजानन विजय या ग्रंथावर आधारीत दहा प्रश्न दर शनिवारी आकांक्षा पुरवणीत प्रसिद्ध केले जातील. अचूक उत्तर निवडण्यासाठी चार पर्यायही दिले जातील. ज्ञानांजलीतील सर्व १० प्रश्नांची अचूक उत्तरं देणाऱ्या भाग्यवंत भक्तांची नामावली पुढच्या आकांक्षामध्ये प्रकाशित करू. ही प्रश्नावली तुम्हाला गूगल फॉर्म स्वरूपातच सोडवायची आहे. प्रिंट किंवा हस्तलिखीत स्वरुपात दै.तरुण भारत कार्यालयाकडे ती पाठवू नये. आपली ज्ञानसेवा श्रींच्या चरणी रुजू करण्याची ही सुवर्णसंधी आहे. प्रत्येक शनिवारी गूगल फॉर्म मिळविण्यासाठी 'तरुण भारत नागपूर' या आमच्या व्हॉट्स ॲप चॅनेलला फॉलो करा. अधिक माहितीसाठी सुरेखा देशपांडे ९८२२४४४२४५ या क्रमांकावर संपर्क करा.

### प्रश्नसंच क्र. २६ चे भाग्यवान विजेते

संध्या चावडीपांडे, शर्वरी परब, राजेंद्र शानी, प्रसाद कावळे, अंजली भानेगावकर, अनघा वैद्य, नंदिनी कुलकर्णी, दिपाली पाटील, ओंकार गावडे सुनीता सोनारे, उज्वला कुलकर्णी, सुजाता कुलकर्णी, मंजुषा कठाळे, अलका देशमुख, निलम पांढरीपांडे, लक्ष्मीबाई अतकरे, शिवशक्ती साखरे, संतोष कापडणी, सुषमा सोमठाणकर, सुविधा कुलकर्णी, कविता देशपांडे, श्रद्धा कोकणे, रश्मी तेलंग, चित्रा अमृतकार, प्रियांका मालशे, ओम पडवळ, देवकाबाई तळपते, अतुल देवगडे, सानल पोंक्षे, अपर्णा गांधी, राम काणीकर, नयना खंबे, मंगला किम्मतकर, कल्पना साखरकर, निलिमा भाले, शांता शाह, विजय कुलकर्णी, सुरेखा वाणी, मनिषा सावजी, उत्तमराव वाकोडकर, जयश्री एतवडेकर, नारायण तावडे, नयना पाटील, जयश्री डोरले, डॉ.स्वाती कुलकर्णी, अमोल डोरले, डॉ.आनंद कुलकर्णी, अर्चना बिरारी, मुकेश पांढरे, सुलोचना येवले, अस्मिता तलाठी, स्नेहा जामकर, श्रद्धा भरत, सीमा निवसरकार, प्रितीलता वखरे

## प्रश्नसंच - २७

### ओवीतील चूक चरण ओळखा

१) अ) **तैसी लोचटा तुझी कृति**
ब) गरिबावर असते प्रीती
क) झाली जयाला विरक्ती
ड) त्यानेच येथे यावे रे

२) अ) **सच्चिदानंद करुणालया**
ब) थोरा न आणी कमीपणा
क) हे जाणोन नारायणा
ड) गणू हा ठेवा संग्रही

३) अ) **निज भक्तांचे मनोरथ**
ब) समर्थ कैसे पुरवितात
क) ते येईल ध्यानात
ड) स्वामी शेगावग्रामीचे

४) अ) **हा ग्रंथ केवळ चिंतामणी**
ब) चिंतिले फळ देईल जाणी
क) त्याच्या अवघ्या मनकामना
ड) हे मात्र विसरू नका

५) अ) **म्हणून आदरे वंदना**
ब) विघ्ने अवघी भस्म होती
क) कापुसाचा पाड किती
ड) अग्निपुढे दयाघना !

६) अ) **भूपतीचा वशिला**
ब) मोठा नाही कोणी आन
क) देवा मम पातकालागून
ड) किमपि आता पाहू नको

७) अ) **बोल आता झडकर**
ब) काय तुझा विचार
क) त्याचा उपयोग करावा
ड) देणे घेणे चालते

८) अ) **तू जननी जनिता सद्गुरू**
ब) तू भक्तांना कल्पतरू
क) भवनदीचे भव्य तारू
ड) तूच की रे विठ्ठला

९) अ) **श्रोते या प्रपंचात**
ब) संकटे येती अतोनात
क) जो जो आला शरण पदा
ड) लोभ त्याचा मानावा

१०) अ) **परी तो जे काही बोलला**
ब) ऐसे बोलिला जरी बरवे
क) खोटेपणाचा राग आला
ड) म्हणून गेले उठोन

### प्रश्नसंच - २६ उत्तरे

१) काही शिष्य पितांबरास
२) महाराज देविदास व बंकटलालास
३) महाराज बाळाभाऊस
४) दासगणू परशुरामास
५) महाराज सदाशिवास
६) भास्कर कोणालातरी
७) महाराज माधवास
८) बाळाभाऊ कवरास
९) पाटील बंधू हरी पाटीलास
१०) महार महाराजांना

## वारसा

प्रवीण अविनाश योगी/+९१ ७५०७४ ९३११२

# राजदुर्ग राजगड

किल्ले राजगड...शिवरायांचा इमानी सेवक! स्वराज्याची पहिली राजधानी! गडांचा राजा आणि राजांचा गड! समुद्रसपाटीपासून १३९५ मीटर उंच असलेला हा किल्ला! सिंहगड, पुरंदर, मंगळगड ऊर्फ कांगोरी, तोरणा ऊर्फ प्रचंडगड या दुर्ग चौकडीच्या मध्यभागी राजगड हा किल्ला आहे. निरा, वेळवंडी, गुंजवणी, कानद या नद्यांनी वेढलेला हा डोंगर निसर्गतःच दुर्गम आहे. शिवरायांनी तोरणा उर्फ प्रचंडगडावर सापडलेल्या धनाचा उपयोग करून मुरूंबदेवाच्या डोंगरमाथ्यावर तटबंदीचं पागोटं चढवलं. पद्मावती, सुवेळा, संजीवनी अशा तीन माच्या तसेच आभाळाशी गप्पा मारणारा अभेद्य आणि मुलखावेगळा बालेकिल्ला हे याचं वैशिष्ट्य. राजगडाच्या माथ्यावरून पुरंदर, वज्रगड, रोहिडा, रायरेश्वर, महाबळेश्वर, मकरंदगड, प्रतापगड, वरंधा घाट, कावळ्या, मनमोहनगड, गोप्या घाट, मढ्या घाट, रायदंड, रायगड, लिंगाणा, तोरणा, लोहगड, विसापूर, प्रचंडगड, तिकोना आदी महत्त्वाची ठिकाणे सहज नजरेस पडतात. मुळात राजगडाची निर्मिती अतिशय दुर्गम ठिकाणी होती. याच्या दुर्गमतेविषयी लिहिताना साकी मुस्तैदखान म्हणतो,राजगड हा अतिशय उंच. त्याची उंची पाहता तो सर्व किल्ल्यात श्रेष्ठ होय असे म्हणता येईल. त्याचा घेर बारा कोसांचा आहे. त्याच्या मजबुतीची आणि उंचीची कल्पनाही करवत नाही. या डोंगराच्या दऱ्याखोऱ्यांतून आणि घनघोर अरण्यातून वाऱ्याशिवाय दुसरे काही फिरू शकत नाही. तिथे पावसालाच वाट मिळू शकते इतर कोणीही त्यातून जाऊ शकत नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांनी इ.स. १६४८ ते १६७२ हा पंचवीस वर्षांचा काळ या बुलंद, बेलाग आणि बळकट दुर्गावर काढला. शिवरायांच्या जीवनातील अनेक हर्ष-विषादांच्या स्मृती या गडाशी संलग्न आहेत. छत्रपती राजाराम महाराजांचा जन्म येथेच झाला. अफजलखानाचा बंदोबस्त करण्यास राजांनी इथूनच प्रस्थान ठेवले. सौभाग्य संपन्न सईबाई साहेबांचा मृत्यूही येथेच झाला. महाराज औरंगजेबाच्या भेटीसाठी दिल्लीला इथूनच रवाना झाले आणि दिल्लीपतीच्या हातावर तुरी देऊन महाराष्ट्रात परत आले ते याच राजगडावर!

गडावर प्रवेश करण्याचे मार्ग म्हणजे पाली दरवाजा, चोर दरवाजा, गुंजवणे दरवाजा, काळेश्वरी दिंडी, अळू दरवाजा तसेच अनेक चोर दिंड्या आणि ढोरवाटा. यातील सर्व मार्ग काही कायम वापरातले नाहीत. त्यातल्या त्यात पुणे-वेल्हा रस्त्यावरील मार्ग आणि चोर दरवाजा किंवा पाली दरवाजा मार्गाने बरेच लोक जातात. प्रत्येक वाटेने गडावर पोचण्यात एक थ्रिल आहे. राजगडाचे चार प्रमुख भाग आहेत १) बालेकिल्ला २) पद्मावती माची ३) सुवेळा माची आणि ४) संजीवनी माची. राजगडाचा आकार काहीसा पंख पसरलेल्या पक्ष्यासारखा आहे.

वायव्येकडे तोंड केलेल्या या पक्ष्याच्या उजव्या अंगास पद्मावती माची तर डावीकडे संजीवनी माची आहे. शेपटाकडील भागात सुवेळा माचीचा भाग येतो तर पाठीवर बालेकिल्ला!

पद्मावती माची : ही माची इतर दोन्ही माच्यांपेक्षा विस्तृत



आहे. पद्मावतीचे मंदिर, पद्मावती जलाशय, हवालदाराचा वाडा, राजांचा राहता वाडा, रत्नशाळा, सदर, लोडतक्याचा दगड, चोर दिंडी, पाली दरवाजे, गुंजवणे दरवाजे असे कितीतरी अवशेष येथे दिसतात.

सुवेळा माची : पद्मावती माचीवरून बालेकिल्ला उजवीकडे आणि गुंजवणे दरवाजा डावीकडे ठेवून पायवाटेने गेले की, उंच टेकाड दिसते त्याला डुबा म्हणतात. त्याच्यापुढे काही चौथरे दृष्टीस पडतात. तेथून तटबंदीच्या रोखाने पुढे गेले की, एका बुरुजातून दिंडी वाटेबाहेर पडता येते. येथेच उजव्या तटात एक गणेश मूर्ती आहे व थोडे पुढे गेले की सहा-सात मीटर उंचीवर त्या अरुंद कातळकड्याच्या भिंतीला असलेले आरपार खिंडार आहे. या चिंचोळ्या माचीला तटबंदी घातल्यामुळे ती संरक्षण योग्य झालेली दिसते.

संजीवनी माची : दिड -दोन कि.मी. लांबीची ही माची व तिची दुहेरी तटबंदीची नाळ म्हणजे दुर्ग शास्त्रातील प्रगत स्थापत्याचा आदर्श नमुनाच आहे. माची तीन टप्प्यांनी उतरत गेली आहे. त्या प्रत्येक टप्प्यात चिलखती बुरुज घालून अभेद्य केली आहे. तोरण्याची बुधला माची आणि राजगडाची संजीवनी माची जोडणारी एक डोंगररांग आहे. साहसी दुर्गयात्री ही जोड दुर्गयात्रा येथून पुरी करतात.

राजगडावर खरा कस लागतो तो बालेकिल्ला सर करायला. बालेकिल्ला हे राजगडाचे वैशिष्ट्य. चहुंगांनी तुटलेला कातळकडा आहे. वर जाण्यास एकच वाट आहे, ती ही तशी कठीणच. बालेकिल्ल्याचा मुख्य दरवाजा सुबक बांधणीचा आणि कोनदार बुरूजांमुळे डौलदार दिसतो. बालेकिल्ल्यावरील जननीचे मंदिर, ब्रह्मर्षीचे मंदिर, जवळच चंद्रकोरीसारखे टाके, त्याच बाजूचा सुटवलेला बुरुज, त्यातील चोरवाटेची दिंडी, महाराजांची सदर, राहता वाडा

बालेकिल्ल्यावरून सुरुवातीचं असलेलं चिमुकलं स्वराज्य येथून व्यवस्थित न्याहाळता येत असल्याने शिवरायांनी हा मोक्याचा गड राजधानीसाठी निवडला असावा. पुढे हिंदवी स्वराज्याच्या कक्षा विस्तारल्या आणि रायरी डोंगरावरच्या रायगडाला राजधानीचा मान मिळाला. महाराजांच्या पाऊलखुणा जास्तीत जास्त जर कुठे उमटल्या असतील तर त्या इथंच. त्यामुळे हा राजदुर्ग आयुष्यात एकदा तरी पाहायलाच हवा!

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## सोयगाव येथे गणेशोत्सव निमीत्ताने जय भोले गणेश मंडळ येथे जैविक शेती व पर्यावरण जनजागृती

सोयगाव,दि.७ सप्टेंबर - पर्यावरण आणि जैविक शेती जनजागृती यावर कृषीभूषण अरुण सोहनी यांनी जय भोले गणेश मित्र मंडळ या ठिकाणी मार्गदर्शन केले जैविक शेती काळाची गरज व तसेच वृक्षरोपण ची किती महत्त्व हे कोविड काळा मध्ये ऑक्सिजन किती गरजेचा त्याची किंमत कळाली म्हणून वाढदिवसाच्या दिवशी केक कापण्यापेक्षा एक वृक्ष लावावे असे मत कृषीभूषण अरुण सोहनी त्यांनी आपल्या मनोगत मध्ये सांगितले.याप्रसंगी भगवान वाघ,अग्नी इंगळे,आरोग्य दूध दिंगबर वाघ व तसेच जिवन मिसाळ, निखिल हिंगणे,योगेश बावस्कर,ऋषी हिवाळे,भुषण वाघ,विशाल बागले,मुरलीधर बागले,हरीश सोहणी व शेतकरी बांधव,जय भोले गणेश मित्र मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते.



## छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हास्तरीय कला महोत्सव जिल्हा परिषद प्रशाला सोयगावच्या उमंग सोनवणे प्रथम

सोयगाव,दि.७ सप्टेंबर - छत्रपती संभाजीनगर येथे दि.२ मंगळवार रोजी झालेल्या कला महोत्सवात दृश्य कला या प्रकारात मूर्तिकला अंतर्गत उमंग सोनवणे या विद्यार्थ्याने गणपतीची मूर्ती तयार करून जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळवला.उमंगची निवड आता विभाग स्तरासाठी करण्यात आले आहे.विभाग स्तरावर छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे.त्याच्या या यशाबद्दल प्रशालेचे मुख्याध्यापक दादाराव राठोड,एस व्ही पाटील,नवले,दौलतसिंग परदेशी,अनिल ठाकूर,पंकज रगडे,विद्याधर बागुल, संजिव जोशी, वैजनाथ सावळे, सतोष भारद्वाज, जया वाघ,सिमा राऊत,नलिनी खेडकर, शिवराम आगे, सचिन ढगे यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या.उमंग सोनवणे यास दौलतसिंग परदेशी यांचे मार्गदर्शन लाभले.



## सोयगाव सह तालुक्यात गणेश विसर्जन शांततेत संपन्न



सोयगाव,दि.७ सप्टेंबर - सोयगाव शहरासह तालुक्यात गणेश विसर्जन उत्साहात भक्तिमय वातावरण संपन्न झाले.सोयगाव येथे नगरपंचायत प्रशासनाच्या वतीने पारंपरिक विसर्जन स्थळी विविध उपाययोजना करण्यात आल्या होत्या. त्यासोबत गवळणीचा तलाव येथे पर्यावरण पूरक विसरून व्यवस्था करण्यात आली होती. सकाळी १० वाजल्या पासून गणेश विसर्जनाला हळूहळू सुरुवात झाली होती. विसर्जन स्थळी सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांच्या मार्गदर्शनाखाली चौक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

## जीएसटी सुधारणांमुळे समावेशक विकासाला चालना मिळते: सीआयआय डब्ल्यूआर अध्यक्ष ऋषी कुमार बागला



जीएसटी सुधारणा केवळ कर बदल नाहीत त्या समावेशक विकासासाठी उत्प्रेरक आहेत. कमी दर, विमा सवलती आणि एमएसएमई सुलभता आत्मविश्वास वाढवेल, वापर वाढवेल आणि एक मजबूत आर्थिक पाया तयार करेल. सीआयआय हे परिवर्तन सक्षम करण्यासाठी पूर्णपणे वचनबद्ध आहे. श्री ऋषी कुमार बागला, अध्यक्ष सीआयआय पश्चिम क्षेत्र.

## सान्या मल्होत्रा 'फ्लाईट'ची नवीन ब्रँड अम्बेसेडर

पुणे : रिलॅक्सो फुटवेअर्स लिमिटेडचा एक ब्रँड असलेल्या 'फ्लाईट' ने प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेत्री सान्या मल्होत्राला त्यांचा नवीन ब्रँड म्बेसेडर म्हणून घोषित केले आहे. फ्लाईट हा भारतातील एक आघाडीचा कौटुंबिक फॅशन फुटवेअर ब्रँड आहे. या घोषणेसोबतच, फ्लाईटने येणाऱ्या सण आणि लग्नसराईसाठी खास डिझाइन केलेली नवीन श्रेणी बाजारात आणली आहे. यामुळे ग्राहकांना प्रत्येक प्रसंगासाठी स्टाईलिश पर्याय उपलब्ध होतील. ही घोषणा एका दमदार ३६०- डिग्री (३६०-वशसीशश) मार्केटिंग मोहिमेला धरून आहे, जी आत्मविश्वास, वेगळेपणा आणि स्टाईलसह पुढे जाण्याचा संदेश देते.'सर उठा, कदम बढा' या फ्लाईटच्या ब्रीदवाक्याला साजेसा असा सान्याचा प्रवास आहे. तिच्या निर्भीड वृत्तीसाठी आणि उत्साही ऊर्जेसाठी ती ओळखली जाते. या भागीदारीद्वारे, फ्लाईटचा उद्देश सर्व वयोगटातील लोकांना स्टाईलचा स्वीकार करण्यासाठी प्रेरित करणे हा आहे. फ्लाईटच्या मते, स्टाईल ही स्वतःला व्यक्त करण्याचे एक माध्यम आहे आणि त्यातून आत्मविश्वास वाढतो.

## महुवा, मुंबई आणि इतर ठिकाणी अकाली जीव गमावलेल्यांना मोरारी बापूंची श्रद्धांजली आणि कुटुंबांना मदत

मुंबई - दोन दिवसांपूर्वी कटपरजवळील पाण्यात बुडून महुवा येथील एका व्यक्तीचा मृत्यू झाला. देवप्रयाग रेसिडेन्सीमधील एका तरुणाचाही अपघातात मृत्यू झाला. त्याचप्रमाणे काही दिवसांपूर्वी पोरबंदरजवळील समुद्रात बुडून चार मच्छिमारांचा मृत्यू झाला. पूज्य मोरारी बापूंनी वरील सर्व मृतांच्या कुटुंबियांना प्रति व्यक्ती १५,००० रुपये या दराने एकूण ९० हजार रुपयांची मदत केली आहे.मुंबईजवळील पालघर येथे इमारत कोसळून १७ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. मोरारी बापूंनी या मृतांच्या कुटुंबियांना २,५५,००० रुपयांची मदत केली आहे. ही आर्थिक मदत मुंबईतील राम कथा श्रोत्याकडून दिली जाईल. पूज्य मोरारी बापूंनी सर्व मृतांच्या आत्म्याच्या शांतीसाठी प्रार्थना केली आहे आणि त्यांच्या कुटुंबियांना शोक व्यक्त केला आहे.

## भारतातील सर्वात मोठा टेलिव्हिजन सादर

नवी दिल्ली- इंडकाल टेक्नॉलॉजीज ब्रॅन्डचा अंतर्गत तंत्रज्ञान विभाग असलेल्या वॉबल डिस्प्लेजने आज मॅक्सिमस सीरीज ११६.५ इंच गुगल टीव्ही ५.० च्या लाँचची घोषणा केली आणि भारताच्य आजवरच्या सर्वात मोठ्या ग्राहक टेलिव्हिजनच्या इतिहासात एक नवीन उच्चांक प्रस्थापित केला. तंत्रज्ञानाचा हा चमत्कार, इतर ब्रॅन्ड्सपेक्षा खरोखरच उच्च दर्जाचा (शब्दश:) आहे आणि वॉबल डिस्प्लेजचे डिस्प्ले तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील संशोधन व नवोन्मेष यातील सामर्थ्य प्रदर्शित करतो पूर्णत: आंतरराष्ट्रीय ब्रॅन्ड्सचे वर्चस्व असणाऱ्या या क्षेत्रात, एका भारतीय कंपनीसाठी हा एक अनन्य विक्रम आहे.

## बाबुराव रावणे यांचे निधन



सोयगाव,दि.७ सप्टेंबर : येथील बाबुराव माधवराव रावणे (वय.७०) यांचे दि.५ शुक्रवार रोजी सकाळी ८:४५ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांचेवर संध्याकाळी ६:०० वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात,पत्नी,दोन मुले,एक मुलगी,सुना,नातवंडे,असा परिवार आहे.होमगार्ड विजय रावणे यांचे ते वडील होत.

# मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष विखे यांचा सत्कार



अहिल्यानगर : भावी मुख्यमंत्री म्हणून मिरवून घेणा-यांनी मराठा समाजाच्या आरक्षणावर शब्दही कधी काढला नाही. अडीच वर्षांची सत्ता भोगताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजाला दिलेले १६ टक्के आरक्षण घालविण्याचे महापापही केले. त्यांनी महायुती सरकारने काढलेल्या शासन आदेशावर बोलण्यापेक्षा आत्मपरिक्षण करावे असा सल्ला जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिला.

मंत्री विखे पाटील यांनी जनता दरबाराच्या माध्यमातून प्रवरानगर येथे नागरीकांच्या भेटी घेतल्या. मराठा आरक्षणाच्या संदर्भात त्यांनी उपसमितीचे अध्यक्ष या नात्याने बजावलेल्या यशस्वी भूमिकेबद्दल जिल्ह्यासह राज्यातून आलेल्या मराठा समाजातील कार्यकर्त्यांनी आणि संघटनांनी सत्कार करुन त्यांचे अभिनंदन केले. जनता दरबारामध्ये नागरीकांची निवेदने स्विकारुन त्यांनी अधिका-यांना तात्काळ कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या.

त्यानंतर माध्यमांशी बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी शासन आदेशावर केलेले वक्तव्य अत्यंत दुर्दैवी आहे. गेली अनेक वर्ष तेही सत्तेत राहीले आहेत. मंत्री पदही त्यांनी भोगले आहे. परंतू मराठा आरक्षणाच्या संदर्भात कधीही पुढाकार घेतल्याचे दिसले नाही. ते ज्यांच्या नेतृत्वाखाली काम करतात त्या शरद पवारांनीच मराठा समाजाला आरक्षणाची गरज नाही असे वक्तव्य करुन, समाजाच्या तोंडाला पान पुसली याचा सोयीस्कर विसर थोरातांना पडला आहे.

शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्याच अडीच वर्ष महाविकास आघाडीचे सरकार होते. या सरकारमध्ये सुध्दा मंत्री राहीलेले आणि त्यानंतर स्वत:ला भावी मुख्यमंत्री म्हणून मिरवून घेणारे बाळासाहेब थोरात मराठा आरक्षणाच्या संदर्भात शब्दही काढताना दिसले नाहीत. उलट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजाला दिलेले १६ टक्के आरक्षण घालविण्यातच महाविकास आघाडी सरकारने धन्यता मानली. राज्यात जेव्हा युती सरकार आले तेव्हा मराठा समाजाला न्याय देण्याची भूमिका घेतली गेली. आमच्या शासन आदेशावर बोलण्यापेक्षा बाळासाहेब थोरात यांनी आत्मपरिक्षण करण्याची गरज असल्याचा सल्ला मंत्री विखे पाटील यांनी दिला.

ओबीसी समाजाचे नेते लक्ष्मण हाके यांच्या सुरु असलेल्या आंदोलनावर प्रतिक्रीया व्यक्त करताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, यापुर्वी ओबीसी समाजाच्या संदर्भात निर्णय झाले तेव्हा मराठा समाजाने त्या विरोधात कधीही आंदोलन केलेले नाही. मात्र आत्ताच काही लोकांनी मराठा समाजाच्या संदर्भात झालेल्या निर्णयाच्या विरोधात आंदोलन करुन केवळ स्वत:च्या हट्टासाठी सामाजिक तेढ निर्माण करण्याचे काम सुरु केले आहे. मी यापुर्वीही त्यांना सल्ला दिला आहे, इतर समाजाच्या आक्षणात तुम्ही लुडबुड का करता? उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संदर्भात केलेले वक्तव्य म्हणजे लक्ष्मण हाके आपली राजकीय अपरिपक्वता सिध्द करीत असल्याचे विखे पाटील म्हणाले.

हैद्राबाद गॅझेटीअर मधून दाखले मिळण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्यासाठी उपाय योजना करण्यात आल्या असून, त्यासाठी गावपातळीवर समितीही नेमण्यात आली आहे. त्याचा आढावा जिल्हाधिका-यांच्या माध्यमातून घेतला जाणार असून, याची प्रक्रीया सुरु झाल्यानंतर अनेक गोष्टी स्पष्ट होतील असे त्यांनी सांगितले.

# 'शोध गुणवंतांचा स्थानिक कलावंतांचा सोहळा' संपन्न

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.०७ सप्टेंबर - गणेश महासंघ कन्नड आयोजित तालुकास्तरीय 'शोध गुणवंतांचा सोहळा - स्थानिक कलावंतांचा' हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमात जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित काशिनाथ पाटील जाधव प्राथमिक विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या नृत्याला प्रथम क्रमांक मिळाला.



स्थानिक कलावंतांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने आयोजित कार्यक्रमात तालुकाभरातील ३५ संघांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. सिताराम जाधव आणि डॉ. सदाशिव पाटील यांनी केले. परीक्षक म्हणून सहयोग जावळे, प्रवीण जंजाळ आणि उदय सोनवणे यांनी काम पाहिले.

यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान ए.पी.आय. कुणाल सूर्यवंशी, नायब तहसीलदार दिलीप सोनवणे व मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला. या यशाबद्दल जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर कृष्णराव जाधव, सचिन भामरे, पवन सोनवणे, साईनाथ आल्हाड, याकूब शेख, सुनील निकम, प्रल्हाद तायडे, संतोष राजे जाधव, प्रकाश काचोळे, सचिन काळे, भाऊसाहेब सोननीस, सिद्धार्थ कनघरे यांनी अभिनंदन केले.

निकाल पुढीलप्रमाणे: सामूहिक

प्रथम - काशिनाथ पाटील जाधव प्राथमिक विद्यालय, सामूहिक द्वितीय - अंजनासागर विद्यालय, पळशी, सामूहिक तृतीय - अपेक्षा शेळके व समूह, सामूहिक चतुर्थ - देवगिरी इंग्लिश स्कूल, कन्नड, उत्तेजनार्थ - तनुजा केदारे व समूह, रामनगर.

वैयक्तिक स्पर्धेत त्रिशा जाधव प्रथम, आरोही निकम व दिशा रामटेके द्वितीय, विधी ठोलिया व विहा लोहाडे तृतीय आणि उत्तेजनार्थ मानांकन मिळाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण दाभाडे यांनी केले तर आभार डॉ. सदाशिव पाटील यांनी मानले.

# संत परंपरेच्या विचारांना नवी दिशा : 'विठ्ठल आमचा प्रचंड' पुस्तकाचे प्रकाशन

## पुस्तकाचे अनावरण जिल्हाधिकारी, मुद्रांक शुल्क व वनविभाग लातूर यांच्या हस्ते कन्नड येथे संपन्न

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.०७ सप्टेंबर - प्रा. डॉ. भारत पगारे लिखित विठ्ठल आमचा प्रचंड या पुस्तकाचे प्रकाशन दि.०७ रोजी कन्नड येथे पार पडले. जिल्हाधिकारी, मुद्रांक शुल्क व वनविभाग, लातूर गोरख सातदिवे यांच्या हस्ते पुस्तकाचे अनावरण करण्यात आले. कार्यक्रमास बुद्धधम्म प्रेमी, साहित्यरसिक, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



भारतीय बौद्ध महासभा, कन्नड शाखेच्या वतीने आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या वर्षावास काळात प्रबोधन मालिकेचे आयोजन करण्यात आले असून त्याचा प्रारंभ त्रिरत्न बुद्धविहार, कन्नड येथे झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेंद्र पगारे यांनी केले, सूत्रसंचालन विनोद अंभोरे यांनी केले, अध्यक्षीय समारोप अरविंद कांबळे यांनी तर आभार प्रदर्शन रमेश धनेधर यांनी मानले.

यावेळी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारतीय बौद्ध महासभेचे रजु आवचार, राकेश पवार, रतन घोरपडेसर, जी.पी. पवार, जी.एस. जाधव, माणिक पगारे, वाल्मिक नवघडे, रविंद्र जाधव, ॲड. प्रदीप जाधव, अशोक जाधव, विजय आमृतफळे, प्रकाश सिरसाठ, गौतम भालेराव, अनिलमामा सिरसाट, कडुबा पवार, सुदय पगारे, इंजि. नागसेन पगारे, साहेबराव राठोड सह भारतीय बौद्ध महासभेचे अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# तालुकास्तरीय विज्ञान नाट्य स्पर्धेत जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव चा संघ प्रथम

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.७ सप्टेंबर

कै.बाबुराव काळे मराठी विद्यालय सोयगाव येथे झालेल्या तालुकास्तरीय विज्ञान नाट्य स्पर्धेमध्ये डॉ.आनंदी गोपाल जोशी या नाटिकेला प्रथम क्रमांक मिळाला.या स्पर्धेत एकूण पाच संघांनी सहभाग नोंदवला होता.कै.बाबुराव काळे शाळेचा संघ द्वितीय क्रमांकावर राहिला.डॉ.आनंदी गोपाल जोशी या नाटिकेमध्ये डॉ.आनंदीची भूमिका कु. गायत्री बावस्कर हिने साकारली तर गोपाळरावच्या भूमिकेत देवयानी मिसाळ होती.या नाटिकेमध्ये कामाक्षी शिनकर,निशा बागुल,नेहा अस्वार,वैभवी महाले,साक्षी सोनवणे,वृषाली साळुंखे यांनी महत्त्वाची भूमिका साकारली. डॉ.आनंदी गोपाल जोशी हा संघ जिल्हास्तरावर सोयगाव तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहे.



या नाट्योत्सवाचे आयोजन जि.प.शिक्षण विभाग छत्रपती संभाजीनगर अंतर्गत,करण्यात आले गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे, सोयगाव केंद्रप्रमुख फिरोज तडवी उपस्थित होते तसेच परीक्षक म्हणून विशेष शिक्षक बावचे,जगन्नाथ काकडे,कैलास लांडगे,महाकाळ होते.प्रथम क्रमांक मिळवलेल्या संघाचे अभिनंदन प्रशालेचे मुख्याध्यापक दादाराव राठोड,एस व्ही पाटी,दौलतसिंग परदेशी,अनिल ठाकूर,पंकज रगडे,संजय जोशी,विद्याधर बागुल सहसर्व शिक्षकांनी अभिनंदन केले. आनंदी गोपाळ जोशी टीमला जिल्हास्तरासाठी खूप खूप शुभेच्छा देण्यात आल्या.

# शिक्षकांचे प्रश्न विधानसभेत मांडणार : आ. विलास भुमरे

तभा वृत्तसेवा

पैठण दि ७ :- शिक्षक बांधवांना वैद्यकीय उपचारासाठी ईतर कर्मचाऱ्यांन प्रमाणे कॅशलेस सुविधा उपलब्ध करून देणे तसेच त्यांच्या ईतर मागणीपर आपण विधानसभेत प्रश्न उपस्थित करणार असल्याचे आमदार विलास बाप्पू भुमरे म्हणाले. पैठण तालुका संत एकनाथ महाराज शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित च्या ५८ वी वार्षिक सर्वसाधारण सभे प्रसंगी बापू बोलत होते. मराठवाड्यात पैठण तालुक्यातील जिप शाळेची गुणवत्ता वाखण्याजोगी असल्याचे ही यावेळी आमदार विलास बाप्पू भुमरे म्हणाले.



येथील अभिनंदन मंगल कार्यालय या सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी चेअरमन अमोल एरंडे यांनी पतसंस्थेला स्वतः च्या जागेची मागणी करताच आमदार विलास बाप्पू भुमरे यांनी पैठण तालुका खरेदी विक्री संघाशी संपर्क करून जागा उपलब्ध करून घ्यावी असे सांगितले. तसेच यावेळी मयत सभासदांच्या वारसांना मदत व गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष सोमनाथ परदेशी, राज्य दूध महासंघाचे सदस्य नंदलाल काळे, नाथ संस्थानचे कार्यकारी विश्वस्त दादा बारे,खरेदी विक्री संघाचे चेअरमन बाबुराव पडुळे, व्हाईस चेअरमन बळीराम औटे, विनोद बोंबले,आमदार भुमरे यांचे स्वीय्य सहाय्यक सतिष आंधळे, नगरसेवक अजित पगारे,भूषण कावसणकर,कृष्णा मापारी,राजू पाटील औटे,श्रीराम केदार,मुश्ताक शेख,अंकुश बोबडे, अंकुश भडके, महेश बोंबले, सुरेश बोंबले,दीपक मोरे,शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन अमोल एरंडे, व्हाईस चेअरमन माणिक नल्लेवाड, श्रीकांत कराड संचाकल राम तांगडे, महेश लबडे,प्रवीण वाघमोडे, कैलास मिसाळ, पांडुरंग गोर्डे, अमोल शेळके, आबासाहेब टकले,आदिनाथ दहिफळे,रोहिणी मिटकर,अमृता भुमरे, शमीम पठाण, लक्ष्मण गलांडे,जनार्धन मिटकर शौकत पठाण, शमशेर पठाण, कार्यालय प्रमुख वसंत ठोंबरे, लिपिक रवींद्र कुलकर्णी, सुरेश केसापुरे सह मोठया संख्येने शिक्षक, शिक्षिका, गुणवंत विद्यार्थी सभासद उपस्थित होते.

## ब्लु व्हॅली इंग्लिश स्कूल व ब्लु माउंटेन प्री इंग्लिश स्कुल येथे शिक्षक दिन साजरा



बिडकीन दि ७ सप्टेंबर - शिक्षक दिनाचे औचित्य साधून ५ सप्टेंबर रोजी बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूल ब्लु माउंटेन प्री इंग्लिश स्कुल मध्ये शिक्षक दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला व मुख्याध्यापिका सविता तोतला शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शाळेतील विद्यार्थ्यांनी शिक्षकांना पुष्पगुच्छ भेट देऊन शिक्षकांप्रती त्यांचा आदर व्यक्त केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विद्यार्थीनी स्वरा औटी हिने केले. शाळेच्या मुख्यध्यापिका सविता तोतला यांनी शिक्षकांचे महत्त्व आणि समाजात असलेली शिक्षकाची गरज या विषयी मार्गदर्शन केले. आजच्या दिवशी शाळा संचालक म्हणुन स्वराज हाडे, मुख्याध्यापिका विद्या पाटील, उपमुख्याध्यापिका सेजल राठोड तर रुद्राणी कांबळे हिने पर्यवेक्षक म्हणून कामकाज पाहिले आणि इतर विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विषय शिक्षकांची भुमिका साकारली.

## ज्ञानेश्वर चाटुपळे यांना पुणे येथील शिवप्रतिष्ठानचा राज्य पुरस्कार जाहीर



बिडकीन दि ७ सप्टेंबर : पैठण तालुक्यातील श्री.सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन येथील सहशिक्षक ज्ञानेश्वर दिगंबर चाटुपळे यांना शिवप्रतिष्ठान, पुणे या सेवाभावी संस्थेचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहिर झाला आहे. या संस्थेच्या वतीने दरवर्षी शिक्षकदिनाच्या निमित्ताने उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांना हा पुरस्कार दिला जातो.ज्ञानेश्वर चाटुपळे हे ३४ वर्षांपासून श्री.सरस्वती भुवन शिक्षण संस्थेमध्ये कार्यरत आहे. त्यांनी गणित प्रयोगशाळा,गणित बाजार, गणित साहित्य प्रदर्शन, भौमितिक रांगोळी प्रदर्शन, साने गुरुजी कथामाला, सामान्य ज्ञान परीक्षा, लसीकरण मोहीम, बँक क्षेत्रभेट, शिक्षक पालक संपर्क अभियान, पल्स पोलिओ, एड्स जनजागृती यांसारख्या विविध उपक्रमांचे आयोजन केलेले आहे.त्यांना हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल डॉ मिलिंद कोनार्डे, शालेय समितीचे अध्यक्ष किसनलाल तोतला मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले, उपमुख्याध्यापक युवराज पाडळे शालेय समितीचे सर्व सन्माननीय सदस्य, सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेत्तर सहकारी, मित्रपरिवार यांनी अभिनंदन केले आहे.

### फर्दापूर येथे अज्ञात चोरांनी लष्करी सैन्याच्या घरात केली चोरी

फर्दापूर दि ७-फर्दापूर . छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर वस्ती मध्ये लष्करी सैन्याच्या घरात अज्ञात चोरांनी चोरी केली अंजनाबाई सदाशिव वाघ वय ५४ यांनी फर्दापूर पोलिस स्टेशन मध्ये फिर्याद दिली यावरून घरातील ऐवजी अशा प्रकारे चोरांनी रोख रक्कम ५५००० हजार,बारा ग्रम सोन्याचे झुंबर,५५००० हजार दहा ग्रॅम एकदाणी सोन्याची पोत ,११००० हजार दोन ग्रॅम मंगळसूत्र सोन्याचे,८२५० हजार एक ग्रॅम होम सोन्याचे ११००० हजार दोन ग्रॅम सोन्याच्या बाळ्या ४८०० चांदीचे कडे अशी एकूण दोन लाख पन्नास हजार रुपये पर्यंत चोरांनी लंपास केले शनिवार रात्री एक वाजता चोरांनी घरात प्रवेश केला असून यात घरामध्ये सर्व घरातील सामानाची नासधूस केली यात कपाट,बेड,देवघर यातील सर्व सामान अस्तव्यस्त करून चोर चोरी करून निघून गेले यावेळी चोरांनी घराच्या समोरचे घरांच्या कड्या लावून घेण्यात आल्या आणि शांत पणे चोरी करून निघून गेले अंजनाबाई सकाळी त्याचा भावाच्या घरुन आल्यावर त्यांनी हा प्रकार पाहायला असता त्यांनी फर्दापूर पोलिस स्टेशन मध्ये कळवले असता यावेळी फर्दापूर पोलिस स्टेशन चे सहायक पोलिस निरीक्षक प्रफुल्ल साबळे आणि योगेश कोळी यांनी येऊन पंचनामा करण्यात आला असून यावेळी खाजगी कॅमेरे चेक करत होते परंतु पोलीस स्टेशन मार्फत बसवण्यात आलेले कॅमेरे यांना चुकून चोर सरळ निघून गेले तरी पुढील तपास सुरू आहे .

## भगवती विद्यालय येथे डॉ सर्व पल्ली राधाकृष्णन यांची जयंती साजरी



बिडकीन दि ७ पैठण तालुक्यातील भगवती विद्यालय बिडकीन येथे डॉ. सर्व पल्ली राधाकृष्णन यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमास बिडकीन सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या हस्ते डॉ सर्व पल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले शाळेचे मुख्याध्यापक रायभान रकटेसर ,संतोष तोतला, डिंगाबंर सर्जे,कल्याण बरकशे,पोलीस कर्मचारी योगेश नाडे, कमलाकर काळे, तसेच पालक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांची,उपस्थित कमलाकर काळे यांनी प्रस्ताविक, केले वआभार सुनिल पवार यांनी केले. शेळके यांनी मार्गदर्शन केले व शिक्षक दिनानिमित्त हार्दिक स्वागत केले. शिक्षक प्रेमीपालक हजर होते.

## माय' या दीर्घकाव्यावर प्रा. दीपक रंगारी यांचे व्याख्यान



कन्नड : स्व. सुरेश केवट यांच्या सातव्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन व प्रेरणादायी व्याख्यानाचे आयोजन गुरुवार, ११ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालयात करण्यात आले आहे.या कार्यक्रमासाठी 'माय' या दीर्घकाव्याचे कवी प्रा. दीपक रंगारी प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रम पत्रकार, शिक्षक, विद्यार्थी आणि साहित्यप्रेमींसाठी आयोजित करण्यात आला आहे.शालेय, महाविद्यालयीन व स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी, शिक्षक आणि पत्रकारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## सोयगाव केंद्रातील जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन जयंती साजरी



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.७ सप्टेंबर

सोयगाव केंद्रातील जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे भारतरत्न,भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जयंती मान्यवरांच्या उपस्थित साजरी करण्यात आली.यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात होते.यावेळी मुख्याध्यापक किरणकुमार पाटील यांनी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या कार्याविषयी विद्यार्थ्यांना माहीती दिली.यावेळी नगरसेवक गजानन कुडके,ज्येष्ठ पत्रकार विजय पगारे,समाजसेवक राजू कुडके,शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्षा वैशाली पवार,शालेय शिक्षण समिती सदस्य योगेश बोखारे,सदस्या मनिषा जेठे,पालक अमृत साबळे,अनिल नेरपगारे यांच्यासह विद्यार्थी,मुख्याध्यापक,शिक्षक,पालक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

## अग्रलेख...

# संतुलितच असावा विकास

विकास आणि विनाश यातील सीमारेषा खूप अस्पष्ट आणि पुसट आहे. विकास कुठे संपतो आणि विनाश कुठे सुरू होतो, हे सांगणे अवघड आहे. महत्त्वाचे म्हणजे यासाठी विकासाची निश्चित व्याख्या आम्हाला करावी लागेल. विकास कोणासाठी आणि कशासाठी करायचा हे विचारपूर्वक ठरवावे लागेल. त्यानंतर विकासाची गरज अधोरेखित करून त्या दिशेनेच विकासाची गाडी हळुवारपणे आणि योग्य मार्गावरून न्यावी लागेल. विकासाची गाडी भरधाव सोडली की होत्याचे नव्हते व्हायला वेळ लागत नाही. अतिरेकी आणि अनियंत्रित विकासामुळे पर्यावरणाची अपरिमित आणि कधीच भरून न निघणारी हानी होत आहे. विकासाचा हा भस्मासुर पर्यावरणासोबत आणि मानवी जीवनाचीही राखरांगोळी करत आहे. याचा अर्थ विकास हा करायचा नाही, विकासाची गरज नाही, असे नाही. पण विकास हा मानवाच्या भल्यासाठी, त्याचे जीवनमान उंचावण्यासाठी असला पाहिजे; त्याचा नाश करणारा नसावा. विकास हा नेहमीच संतुलित आणि मानवकेंद्रित असला पाहिजे. असंतुलित आणि मानवाचा नाश करणारा विकास हा एखाद्या नरभक्षकासारखा असतो. तो तुम्हाला कधी गिळंकृत करून टाकेल, याचा नेम नसतो. याचा अनुभव सध्या संपूर्ण उत्तर भारत घेत आहे. उत्तर भारतातील जम्मू-काश्मीर, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, राजस्थान, पंजाब आणि हरयाणा या राज्यात जी नैसर्गिक आपत्ती आली आहे, त्याचे मूळ या दिशाहीन आणि पर्यावरणाची हानी करणाऱ्या आत्मघातकी विकासात दडले आहे. पर्यावरणाचा बळी देऊन होणारा विकास समस्त मानवजातीच्या मुळावर येत असतो.

विकासात पहिला बळी झाडांचा जात असतो. झाडे कापल्यानंतर अपरिहार्यपणे पर्यावरणाचा नाश होत असतो. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयालाही त्याची दखल घ्यावी लागली. बेकायदेशीरपणे झाडे तोडल्यामुळे निसर्ग कोपला, असे ताशेरे सर्वोच्च न्यायालयाने ओढले आहेत. झाडे तोडल्यामुळेच जम्मू-काश्मीर, उत्तराखंड, पंजाब व हिमाचल प्रदेशमध्ये गंभीर पूरस्थिती उद्भवल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाने पर्यावरणाच्या मुद्द्यावर सरकारची कानउघाडणी करण्याची ही पहिली वेळ नाही. याआधी दोन-तीन वेळाही सरकारचे कान उपटले आहेत. पण हा प्रश्न फक्त केंद्र सरकारचा नाही तर राज्य सरकारचाही आहे. यासाठी केंद्र आणि राज्य सरकारला एकत्रित प्रयत्न करावे लागतील. डोंगरावरील बेकायदेशीर वृक्षतोड हे या नैसर्गिक आपत्तीचे प्रमुख कारण आहे; खरं म्हणजे याला वृक्षतोड म्हणणेही योग्य नाही, तर ही वृक्षांची कत्तल म्हणायला पाहिजे. वृक्षांची बेकायदेशीर कत्तल होत असल्यामुळे निसर्ग सूड घेत असल्याचे अतिशय महत्त्वपूर्ण निरीक्षण न्यायालयाने नोंदविले आहे. आतातरी सगळ्यांचे डोळे उघडले पाहिजे. आताही आमचे डोळे उघडत नसतील तर आमचे डोळे कायमस्वरूपी बंद व्हायला वेळ लागणार नाही. ही आपत्ती नैसर्गिक नाही तर मानवनिर्मिती म्हटली पाहिजे.

ग्लोबल वॉर्मिंगची चर्चा गेल्या काही वर्षांत सुरू झाली आहे. पृथ्वीचे तापमान वाढत आहे. त्यामुळे हिमालयातील बर्फाचे पर्वत म्हणजे ग्लेशियर वितळू लागले आहे. याला आपण दैवी आणि नैसर्गिक आपत्ती म्हणू शकत नाही, तर ही मानवनिर्मित आपत्ती म्हणायला पाहिजे. उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशमध्ये दरड कोसळण्याच्या घटना वाढल्या आहेत. नद्यांना अचानक पूर येऊ लागला आहे. ढगफुटीच्या घटनाही गेल्या काही वर्षांत वाढल्या आहेत. आम्ही जर निसर्गाची काळजी घेतली, पर्यावरणाचे रक्षण केले तर निसर्गही आमचे रक्षण करायला तयार आहे. निसर्गाने आपली सीमा आणि मर्यादा कधीच ओलांडली नाही. मात्र मानवाने लाजलज्जेसोबत मर्यादा सोडली आहे. त्याचे परिणाम वा दुष्परिणाम दरड कोसळण्याच्या घटना आणि गंभीर अशा पूरस्थितीतून जाणवत आहे. यामागचे खरं कारण वृक्षतोड हे आहे. हे एकमेव कारण नसले तरी एक कारण नक्की आहे. झाडांची मुळं ही जमिनीतील माती धरून ठेवतात, त्यामुळे दरड कोसळण्याच्या घटनांना आळा बसतो. पण मानवाने स्वत:च्या स्वार्थासाठी अनियंत्रित वृक्षतोड सुरू केली. काही वर्षांपूर्वी चंदन तस्कर वीरप्पनच्या नावाची खूप चर्चा होती. काही दशकं तो जंगलातील मौल्यवान अशी चंदनाची झाडे तोडत होता, त्याची तस्करी करत होतो. एक संघटित असे जाळे त्याने तयार केले होते. पोलिस, प्रशासन आणि राजकारण्यांची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष साथ असल्याशिवाय कोणीही एवढ्या दीर्घकाळ चंदनाची तस्करीच काय, कोणताही गुन्हा करू शकत नाही, हे शेंबड्या पोरालाही समजते. विशेष म्हणजे वीरप्पन एका नाही तर तीन-चार राज्यातील पोलिसांना हुलकावणी देत होतो, असे म्हणण्यापेक्षा हप्ते देत असावा, असे म्हणायला हरकत नाही. गेल्या काही वर्षांत उन्हाळा अतिशय तापू लागला आहे. तापमान ५० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचू लागले आहे. त्यामुळे वातानुकूलित यंत्राची म्हणजे एसीची मागणी वाढत आहे. एसीमध्ये जो गॅस वापरला जातो, त्याने पर्यावरणाची हानी होत असते. याला कारण म्हणजे खरे जंगल कमी होत आहे. शहरात सिमेंटचे जंगल वाढत आहे. हा कोणा एका देशासाठी नाही तर संपूर्ण जगासाठी आणि पर्यायाने मानवजातीसाठी धोक्याचा इशारा आहे. २० ते २५ वर्षांपूर्वी जसे पर्यावरण होते, तसे आता राहिले नाही. उन्हाळ्यात कोणत्याही शहरात सायंकाळी वा रात्री थंड वारे वाहात होते. आज थंड हवेची म्हणून जी ठिकाणे आहे, तेथील हवा गरम होऊ लागली आहे. यावर्षी संपूर्ण देशात अतिवृष्टी झाली, सगळ्या राज्यात पूरस्थिती होती आणि अजूनही आहे. विशेष म्हणजे पुरामुळे प्राणहानी आणि वित्तहानी मोठ्या प्रमाणात होत असते. राजधानी दिल्लीही यातून सुटली नाही. राजधानी दिल्लीत यमुना नदी धोक्याच्या पातळीपर्यंत पोहोचली आहे. उत्तरेकडील राज्यातून पाणी सोडावे लागल्यामुळे राजधानी दिल्लीत यमुना नदी धोक्याच्या पातळीपर्यंत पोहोचली आहे. राजधानी दिल्लीत तासभरही मुसळधार पाऊस झाला तर रस्त्यावर पाणी साचून वाहतुकीची कोंडी होते. याला कारण आहे, नियोजनशून्य विकास. सिमेंटचे रस्ते आणि मोठमोठे उड्डाणपूल बांधले म्हणजे विकास झाला असे नसते. देशाच्या एका भागात पूरस्थिती असते, तर दुसऱ्या भागात कोरडा दुष्काळ. यावर नदी जोड प्रकल्पाचा पर्याय समोर आला होता. एका पट्ट्यातील नद्या एकमेकांना जोडायच्या. म्हणजे ज्या नदीतील पाण्याची पातळी वाढली, त्यातील पाणी ज्या नदीत पाणी कमी आहे, तेथे सोडायचे. मात्र या प्रकल्पाचा खर्च अमर्याद आहे. त्यामुळे तो प्रस्ताव बारगळला.

एखाद्या व्यक्तीचा एखादा पाय सुजला म्हणजे ती व्यक्ती शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त झाली असे म्हणता येणार नाही. असा एक पाय सुजणे हे हत्तीरोगाचे लक्षण म्हटले पाहिजे. दोन्ही हात आणि दोन्ही पायांसोबत संपूर्ण शरीर विकसित झाले तर तो शारीरिकदृष्ट्या सक्षम आहे, असे म्हणता येऊ शकेल. विकासाचेही तसेच आहे. ग्लोबल वॉर्मिंगबाबत जागतिक स्तरावर अनेक परिषदा होतात, पण या परिषदात प्रस्ताव पारित करण्याशिवाय आणि उपस्थित नेत्यांचे सुहास्य मुद्रेतील छायाचित्र काढण्याशिवाय कोणतेही ठोस निर्णय होत नाही. आवश्यक उपाययोजना केल्या जात नाहीत. आज अनेक शहरात डोंगर कापून बिल्डर लोक मनमानी पद्धतीने बहुमजली इमारती बांधत आहेत. लोकांना सुविधा पुरविण्याच्या नावावर चारधाम यात्रेच्या मार्गावर सिमेंट कॉंक्रिटचे रस्ते बांधले जाते आहेत. विद्युत प्रकल्प उभारले जात आहे. हे करताना तेथील भौगालिक रचनेकडे आपण सोयीस्कर दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालय सरकारची कानउघाडणी करत आहे. सरकारने आता तरी शहाणे झाले पाहिजे. विकासाच्या नावावर सुरू केलेल्या माकडचेष्टा थांबवल्या पाहिजे. विकास हा संतुलित आणि गरजेनुसार असला पाहिजे. पर्यावरणानुकूल जीवनशैलीचा अवलंब करण्याची आज खरी गरज आहे. कारण पर्यावरण टिकले तर मानवी जीवन राहणार आहे, पर्यावरणाचा नाश झाला तर मानवी जीवनाचा नाश व्हायला वेळ लागणार नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निर्णयाचा हा शोध आणि बोध म्हटला पाहिजे. ▮

## यंगिस्तान

# लोकां सांगे ब्रह्मज्ञान...

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

भुवनेश्वरच्या खंदागिरीबारी परिसरात सुभद्रा आणि विश्वजित नावाचे नवविवाहित जोडपे राहत होते. सुभद्रा बँकेत नोकरी करायची, तर विश्वजित एका छोट्या फार्मसीचा मालक. त्यांचे आयुष्य साधे आणि शांत होते. पण एके दिवशी त्यांच्या आयुष्यात असा प्रसंग घडला ज्याने त्यांना धक्का बसला. विश्वजित दुपारी घरी परतले तेव्हा त्यांना मुख्य दाराचा उघडा दिसला आणि बेडरूममधील कपाटाचे टाळे तुटलेले आढळले. घरात चोरी झाली होती. ३०० ग्रॅम सोन्याचे दागिने आणि ५ लाख रुपये रोख चोरून नेले. नवविवाहित संसाराला नुकतीच सुरुवात केलेली. अशा परिस्थितीत घरात इतकी मोठी चोरी झाल्याने दोघंही खचून गेले. त्यांनी भारतपूर पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. पोलिसांनी तपास सुरू केला. काही दिवसांतच त्यांना संशयित सापडला. पोलिसांनी त्याच्या हालचालींवर सुमारे एक आठवडा पाळत ठेवली आणि अखेरीस त्याला खंदागिरीबारी येथून अटक केली. त्याच्याकडून २०० ग्रॅम सोन्याचे दागिने, १ लाख रुपये रोख, चोरीसाठी वापरलेली मोटरसायकल आणि लोखंडी रॉड जप्त करण्यात आला. तपासात असे समोर आले की, त्याने केलेल्या ३०० ग्रॅम सोन्यापैकी ८२ ग्रॅम नयागड येथील आर्थिक संस्थेत ४.७३ लाख रुपये कर्ज घेण्यासाठी गहाण ठेवले होते. उर्वरित १०० ग्रॅम सोने आणि रोख रक्कम त्याच्याकडून जप्त करण्यात आली. पोलिसांनी सर्व चोरीचे सामान तक्रारदाराला परत केले.

आता तुम्हाला प्रश्न पडला असेल कोण होता तो चोर? तो होता मनोजकुमार सिंग, ४२ वर्षांचा यूट्यूबर, जो त्याच्या चॅनेलवर प्रेरणादायी व्हिडीओ बनवायचा. त्याच्या व्हिडीओमध्ये तो प्रामाणिकपणा आणि गुन्हेगारीपासून दूर राहण्याचा सल्ला देत असे. लोक त्याला प्रेरक वक्ता म्हणून ओळखत होते. मनोजवर यापूर्वीही भुवनेश्वर आणि नयागड येथे अनेक चोरीचे गुन्हे दाखल होते. तो रात्री बंद घरे शोधून, लोखंडी रॉडने दार तोडायचा आणि काही मिनिटांत चोरी करून पसार व्हायचा. त्याच्या यूट्यूब चॅनेलमुळे लोकांना वाटायचे की तो सुधारला आहे; खरे तर तो आपल्या गुन्ह्यांना यूट्यूबच्या आड लपवत होता. अटकेनंतर त्याच्या मुलीने त्याचे चॅनेल डिलीट केले. पोलिसांनी मनोजला न्यायालयात हजर केले, जिथे त्याला कोठडी सुनावण्यात आली. या घटनेने परिसरात खळबळ माजली. कारण एका प्रेरक वक्त्यामागचा खरा चोराचा चेहरा समोर आला होता. पोलिसांनी लोकांना सावध राहण्याचा आणि ऑनलाईन व्यक्तींच्या दाव्यांची पडताळणी करण्याचा सल्ला दिला.



पोलिस आयुक्त एस. देव दत्ता सिंग यांनी सांगितले की, मनोज हा एक सराईत चोर आहे, जो विशेषतः बंद घरे आणि स्वतंत्रपणे उभी असलेली घरे लक्ष्य करत असे. त्याच्यावर भुवनेश्वर आणि नयागड येथील विविध पोलिस स्टेशनांमध्ये १० हून अधिक चोरीच्या गुन्ह्यांची नोंद आहे. २०११ पासून त्याचा गुन्हेगारी इतिहास आहे आणि यापूर्वीही त्याला १० वेळा अटक झाली होती. या प्रकरणात तो जामिनावर बाहेर होता. मनोजची मॉडस ऑपरेंडी अशी होती की, तो मोटरसायकलवर लोखंडी रॉड घेऊन बंद घर शोधत असे. मुख्य दार आणि कपाट तोडून १० मिनिटांत चोरी करून पसार होत असे. त्याच्या यूट्यूब चॅनेलच्या माध्यमातून तो आपल्या गुन्हेगारी कारवायांपासून पोलिसांचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करत होता, असे पोलिसांचे म्हणणे आहे. म्हणजे काय तर 'लोकां सांगे ब्रह्मज्ञान, स्वतः मात्र कोरडे पाषाण' किंवा हिंदीत 'चोर मचाएं शोर' असेही म्हणता येईल. आता आपण जरा राजकारणाकडे वळुया. राहुल गांधी यांनी अलिकडेच निवडणुकीत 'मत चोरी' झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. त्यासाठी त्यांनी आंदोलनही केले. राहुल गांधी यांच्यावर आणि कॉंग्रेस पक्षावर भ्रष्टाचाराचे अनेक आरोप झाले आहेत. यापैकी सर्वात चर्चित आहे नॅशनल हेराल्ड प्रकरण. या प्रकरणात राहुल गांधी आणि त्यांच्या मातोश्री सोनिया गांधी यांच्यावर नॅशनल हेराल्ड या वृत्तपत्राशी संबंधित कंपनीच्या मालमत्तेचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. २०१२ मध्ये सुब्रह्मण्यम स्वामी यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार, कॉंग्रेस पक्षाने नॅशनल हेराल्डशी संबंधित असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडला मोठ्या प्रमाणात कर्ज दिले; जे नंतर यंग इंडियन प्रायव्हेट लिमिटेड नावाच्या कंपनीद्वारे हस्तांतरित करण्यात आले. या कंपनीत राहुल आणि सोनिया गांधी यांचा मोठा हिस्सा आहे.

या प्रकरणात कथित आर्थिक गैरव्यवहार आणि मनी लॉन्ड्रिंगचे आरोप असून प्रवर्तन संचालनालय (ईडी) याची चौकशी करत आहे. राहुल गांधी यांना या प्रकरणात अनेकदा समन्स बजावण्यात आले आहेत; तरीही ते स्वतःला निवडणूक प्रक्रियेचे रक्षक म्हणून पुढे करतात. राहुल गांधी यांच्यावरील आणखी एक गंभीर प्रकरण म्हणजे सात्यकी सावरकर यांनी दाखल केलेली बदनामीची केस.

कॉंग्रेस पक्षाचा भ्रष्टाचाराचा इतिहास नवीन नाही. १९७५ मध्ये इंदिरा गांधी यांना अलाहाबाद उच्च न्यायालयाने १९७१ च्या निवडणुकीत गैरप्रकार केल्याबद्दल दोषी ठरवले होते. यामुळे त्यांना सहा वर्षांसाठी राजकारणातून बंदी घालण्यात आली होती, ज्याला प्रत्युत्तर म्हणून त्यांनी देशात आणिबाणी लागू केली, असे म्हटले जाते. हा भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील सर्वात काळा कालखंड मानला जातो. म्हणजे 'मत चोरी' हा आरोप राहुल गांधी इतरांवर लावत असले, तरी अशा गोष्टी त्यांच्यासाठी नवीन नाहीत. याशिवाय, बोफोर्स घोटाळा हा राजीव गांधी यांच्या काळातील एक मोठा भ्रष्टाचाराचा मुद्दा होता, ज्यामध्ये स्वीडिश कंपनी बोफोर्सकडून तोफा खरेदीच्या व्यवहारात लाचखोरीचे आरोप झाले. या प्रकरणाने कॉंग्रेस पक्षाची प्रतिमा डागाळली आणि १९८९ च्या निवडणुकीत त्यांना सत्तेतून बाहेर पडावे लागले.

कॉंग्रेसच्या इतर नेत्यांवरही भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप झाले आहेत. उदाहरणार्थ, २जी स्पेक्ट्रम घोटाळा, कोळसा घोटाळा आणि कॉमनवेल्थ गेम्स घोटाळ्यामध्ये कॉंग्रेसचे अनेक नेते अडकले होते, ज्यामुळे काहींना तुरुंगवासही भोगावा लागला. अशा पृष्ठभूमीवर राहुल गांधी यांचे 'मत चोरी'चे आरोप हास्यास्पद वाटतात. तुम्हाला काय वाटते? बरं, आता वरील मनोजकुमार सिंह या चोराचं, लोकांना चोरी करू नका, हे सांगणं आणि 'मत चोरी' या दोन्ही गोष्टींची तुम्ही सांगड घालत असाल तर तर ही तुमची जबाबदारी! ▮

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

विजय कुळकर्णी

# पोलिसांचे कार्यक्षेत्र रुंदावतेय

'पोलिसांचा पूर्वी जनतेमध्ये दरारा होता; आजही आहे. कोणाच्या घरी जर पोलिस आले तर त्याची वेटाळातच नव्हे, तर गावभर चर्चा व्हायची. पोलिस गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठीच एखाद्याच्या घरी जातात, असा त्याकाळी समज होता. एखाद्या चौकात वाहतूक नियंत्रक पोलिस कर्तव्यावर असेल तर त्या चौकापासून २०० ते ३०० मीटर दूर सायकलवरून डबलसिट जाणाऱ्यांपैकी दुसऱ्या व्यक्ती उतरून पायी तो चौक पार करून पुढे १००-२०० मीटर गेल्यावर सायकलवर डबलसिट बसत असे. एवढा दरारा पोलिसांचा होता. आमचे घर पोलिस ठाण्याला लागूनच असल्याने गुन्हेगारांची धुलाई आम्ही नित्य पाहायचो. चोर, दरोडेखोर, खिसेकापू, दारूची अवैध विक्री करणारे, जुगार खेळणारे व खेळविणारे यांना पकडणे, शहरात शांतता व सुव्यवस्था कायम ठेवणे, सण-उत्सव काळात निघणाऱ्या मिरवणुका, जाहीरसभा, यात्रा, महोत्सवादरम्यान चोख बंदोबस्त ठेवून वरील सर्व आयोजन शांततेत पार पाडण्याची जबाबदारी पोलिसांची आहे, हे आपल्याला माहीत आहे. मात्र, यात आता बदल होऊन पोलिसांच्या कार्यकक्षा रुंदावत आहेत. पूर्वी पोलिस गुन्हेगार किंवा दोषी व्यक्तीला शोधून त्याला कठोर शिक्षा कशी होईल, याकडे लक्ष देत होते. म्हणजे झालेल्या आजारावर उपचार करीत होते. तर, आता ज्याप्रमाणे एखादा आजार होऊ नये म्हणून आपण लसीकरण करवून घेतो, त्याप्रमाणे पोलिस गुन्हे आणि गुन्हेगार निर्माण होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना करताना दिसत आहेत. त्याचे उदाहरणच पाहायचे म्हटल्यास आमच्या बुलढाणा जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक नीलेश तांबे यांनी 'मिशन परिवर्तन' या उपक्रमांतर्गत संपूर्ण जिल्ह्यात विविध सामाजिक उपक्रम हाती घेतले आहेत. त्यात व्यसनमुक्ती, रक्तदान शिबिर, वृक्षारोपण इत्यादी कार्यक्रमांचा समावेश आहे. आजची तरुण पिढी धूम्रपान, तंबाखू, गुटखा सेवनाकडे आकृष्ट झाल्याचे दिसून येते. तर, मोठ्या शहरांमध्ये ड्रग्स, चरस, अफिम, गांजा, ब्राऊन शुगर इत्यादी अमली पदार्थाच्या आहारी युवक गेल्याचे दिसून येते. ड्रग्जचे व्यसन एवढे भयंकर आहे की, ते एकदा जडले की त्यातून बाहेर पडणे कठीण होते. ड्रग्जचा अंमल संपला की ठरावीक वेळेनंतर तो ड्रगिस्ट अस्वस्थ होतो. त्याचे हातपाय थरथर कापू लागतात. त्याला काहीच सुचत नाही. त्याला कोणत्याही परिस्थितीत ड्रग्ज हवे असते. त्यासाठी तो कोणतीही किंमत मोजायला तयार असतो. त्यातूनच मग गुन्हेगारी आणि गुन्हेगार जन्माला येतो. असे गुन्हेगार निर्माण होऊ नये म्हणून जिल्हा पोलिस अधीक्षकांनी व्यसनमुक्ती जनजागृती अभियानाच्या माध्यमातून व्यसनांना आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायांचे पाऊल उचलले आहे. त्याचप्रमाणे रक्तदान शिबिरांचे आयोजन करून शासकीय रुग्णालयांची रक्तांची मागणी पूर्ण केली जात आहे. विज्ञानाच्या सहाय्याने मानवाने मोठी प्रगती केली असली, तरी पाणी आणि रक्त या दोन गोष्टी अजूनही मानवाला कृत्रिमरीत्या तयार करता आलेल्या नाहीत. बुलढाणा जिल्हा पोलिसांनी रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना आवाहन करून शासकीय रुग्णालयातील रक्तपेढींमधील रक्तांची मागणी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. वृक्षारोपणाच्या माध्यमातून पर्यावरणाचा ढासळलेला समतोल राखण्याचा प्रयत्न पोलिस करीत आहेत. त्याचबरोबर कौटुंबिक हिंसाचारांच्या प्रकरणात पोलिस समुपदेशन केंद्रांच्या माध्यमातून अनेक मोडलेले संसार पुन्हा सुरळीत करण्याचे काम पोलिस करीत आहेत. यापूर्वी एखाद्या विवाहितेने पोलिसांकडे तक्रार केल्यास तिच्या सासरच्या मंडळीविरुद्ध शारीरिक छळवणूक, हुंडा प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हे दाखल करून त्यांना कोठडीत डांबण्याचे काम करीत होते. पण, आता केवळ गुन्हेच दाखल करीत नाहीत तर तक्रारकर्ती, तिचा पती, तिच्या सासरच्या मंडळीला समुपदेशन केंद्रात बोलावून त्यांचे समुपदेशन केले जाते. दोन्हीकडील लोकांना समजावून सांगितले जाते. समजूत काढल्यावर त्यांचा संसार पुन्हा सुरळीत करून देण्याचे प्रयत्न पोलिस करीत आहेत. तसेच, गुन्हे आणि गुन्हेगारांचे बदललेले स्वरूप हे पोलिसांसमोरील नवे आव्हान आहे. एखाद्या घरात चोरी झाली तर, त्यातील आरोपींचा शोध लागू शकतो. 'सायबर क्राईम' या नावाचा नवीन गुन्हेगारी प्रकार आता सुरू झाला आहे. शेकडो कि.मी. लांब बसून इंटरनेटच्या साहाय्याने एखाद्याच्या बँक खात्यातील पैसे परस्पर काढून दुसऱ्याच्या खात्यात वळते केले जातात. यातील गुन्हेगार शोधणे ही जटिल समस्या पोलिसांसमोर उभी ठाकली आहे. त्याचे आव्हानही पोलिसांनी स्वीकारले असून सायबर गुन्ह्यांची उकल पोलिस करीत आहेत. 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' असे पोलिसांचे ब्रीद आहे. पूर्वी खलनिग्रहण होत होते. पण, आता खलनिग्रहणायसोबतच सद्रक्षणाय व सदनिर्माणाचे कार्यदेखील पोलिस करीत आहेत. त्यावरून पोलिसांचे कार्यक्षेत्र रुंदावत असल्याचे दिसून येते. ▮

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

# अखेर राज्यानेच दिले आरक्षण

नागेश दाचेवार

मराठा आरक्षणाचा लढा हा गेल्या दोन-चार दिवसातला नाही; तो १९८१ पासून चालला आहे. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणाचे आंदोलन चालविले आहे. २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी मराठा समाजाला आरक्षण दिले होते. कालांतराने नव्हे, दुर्दैवाने २०१९ ला तोंडाशी आलेला घास हिरावून घेत दगाबाजीने, गद्दारीने उद्धव ठाकरेंनी राजकीय दुश्मनांशी हातमिळवणी करून, स्वतः मुख्यमंत्री होण्याचे कटकारस्थान रचले. या कारस्थानाने आलेल्या कारस्थानी सरकारच्या काळात सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणाविषयी राज्य सरकारच्या वतीने पाहिजे तसे प्रयत्न केले गेले नाहीत. त्यामुळे फडणवीसांनी दिलेले आरक्षण उद्धव ठाकरेंच्या सरकारने घालवले. घालविल्यानंतर मविआ सरकारने आरक्षण देणे राज्य सरकारच्या हाती नाही ते केंद्र सरकारच्या हाती असल्याची बोंब उठवली. आरक्षण केंद्र सरकारच देऊ शकतो, आमच्या हाती काही नाही, असे म्हणत मराठा आरक्षणाबाबत तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मविआचे सर्वेसर्वा शरद पवार आणि मविआ सरकारने हात वर केले होते. मात्र, त्यानंतर मुख्यमंत्री झालेल्या एकनाथ शिंदे यांच्या मदतीने फडणवीसांनी पुन्हा मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिले. तर, उर्वरित मागण्यांनादेखील न्याय राज्य सरकारच्या पातळीवरच त्यांनी दिला. केंद्र सरकारकडे बोट दाखवून आपली जबाबदारी झटकणाऱ्या उद्धव ठाकरे आणि शरद पवारांना दाखवून दिले की, हा विषय केंद्राच्या नव्हे, तर राज्य पातळीवरचा होता आणि तुम्ही तुमच्या सरकारच्या काळात हाताळू शकले नाही; नव्हे तर शरद पवारांनी आपल्या अख्ख्या राजकीय कारकीर्दीत मराठा समाजाला न्याय दिला नाही. मात्र, तोच न्याय मराठा समाजाच्या नेहमी टीकेचा धनी राहिलेल्या व्यक्तीने दिला, हे विशेष.

ओबीसी समाजाच्या बाबतीतदेखील मविआ सरकारची आणि त्यांच्या नेत्यांची भूमिका अशीच उदासीन राहिली आहे. न्यायालयाने 'ट्रिपल टेस्ट' करण्याचे आणि इम्पिरियल डेटा आणण्याचे सुचविल्यानंतर इम्पिरियल डेटा देणे राज्य सरकारचं काम नाही; ते केंद्र सरकारचं आहे, असे सांगून ओबीसी आरक्षणाचा विषयदेखील असाच चिघळवला. तेदेखील घालवले. मविआने ओबीसी आरक्षणात डबल-ट्रिपल ढोलकी वाजविण्याचे काम केले.



मराठा असो किंवा ओबीसी दोन्ही समाजासाठी कुठलीही ठोस भूमिका यांनी घेतली नाही आणि घेणार नाही. मुंबईत एवढे मराठे एकवटले, मुंबई कधी थांबणार नाहीची घोषणा नेहमी ऐकायला मिळते. पण यावेळी मुंबई थांबलेली आणि हतबल झालेली दिसली. मुंबई ही ठाकरेंची आहेची वल्गना करणारे यावेळी कुठे होते कळलेच नाही. सर्वसामान्य मुंबईकरांचे हाल होत होते. कामाला जाणं बंद, लोकल प्रवास कठीण, खाजगी उद्योग धंदे बंद, सरकारी नोकर, चाकरमान्यांचे हाल आणि ऐन गणेशोत्सवात बाजारपेठा बंद, एक, दीड, तीन, पाच दिवसांच्या गणपती विसर्जनाची गैरसोय, हे सगळं मुंबईकर सोसत होते. पण मुंबईच्या कैवाऱ्यांनी मोर्चेकऱ्यांची बाजू घेताना, मुंबईकरांना त्रास होईल असे वागू नका. रस्त्यावर नाचू नका, दळणवळणाला बाधा आणू नका, असे साधे आवाहन मोर्चेकऱ्यांना केले नाही. एरवी तर, लगेच मुंबई आणि मुंबईकर म्हणजे यांचीच मक्तेदारी असल्यागत अंगावर धावून येणाऱ्या या तथाकथित मुंबईवाद्यांची बोबडी यावेळी का वळली होती, असा प्रश्न आता सामान्य मुंबईकर विचारत आहेत. म्हणजे आरक्षणच नव्हे, तर मुंबईकरांच्या हिताच्या विषयातदेखील हे यांचा स्वार्थ बघतात, हे या आंदोलनाच्या माध्यमातून सिद्ध झाले. मुंबई मराठी माणसांची नाही का? मग मराठी माणूस आंदोलन कुठं करेल, असा प्रश्न विचारणाऱ्यांना आता लवकरच मुंबईकर उत्तर देतील तेव्हा मिळतील या प्रश्नांची उत्तरं, सोयीच्या भूमिका घेणाऱ्या डबल ढोलकी वादकांना.

**मुंबईकरांची बाजू घेणाऱ्या देवरांवरच उडाले**

खासदार असले, तरी सामान्य व्यक्तीप्रमाणे मिलिंद देवरांसारख्या व्यक्तीने राजकारण बाजूला सारत मुंबईकरांचे झालेले हाल बघता यावर काही निर्बंध असले पाहिजे, अशी ठोस भूमिका मांडली. तर, त्यांना लक्ष्य करण्यासाठी हे लबाड लांडगे चवताळून उठले. त्यांना धनिकांचे प्रतिनिधी म्हणून हिणवू लागले. मुळात देवरा यांनी मांडलेला मुद्दा या संधिसाधू लोकांसारखा अदानी-अंबानीचा नव्हता, तर तो हातावर आणून पानावर खाणाऱ्या सर्वसामान्य, गोरगरीब मुंबईकरांचा होता. आणि हो, यात उच्च न्यायालयाचे आदेशदेखील आहेत. आझाद मैदानावर आंदोलन करण्याची पाच हजारांची मर्यादा न्यायालयाने घालून दिली आहे. रात्री आंदोलन करता येणार नसल्याचं म्हटलं आहे. रस्त्यावर आंदोलन करण्याचा तर प्रयत्नच उद्भवत नाही. अशा परिस्थितीत एखाद्याने न्यायालयात याचिका दाखल केली तर तो घटनेला आणि न्यायालयाचा सन्मान करीत असल्याचे म्हणण्याऐवजी त्यालाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करणं आणि जे कायदा, न्यायालयाचे निर्देश पायदळी तुडवत आहेत, त्यांच्या चुकीच्या कृत्याला समर्थन देण्याच्या प्रकाराला काय म्हणावे? तसेही संविधान-संविधान बचाव म्हणून छाती बडवणारी ही जमात नेहमी संवैधानिक संस्थांवर शरसंधान साधताना दिसते. यांना हवे तसे वागले तर ठीक अन्यथा सर्व आरोपीच्या पिंजऱ्यात असतात. यांनी याआधी अनेकदा आरोपीच्या पिंजऱ्यात न्यायालयाला उभं केलं असल्याचा इतिहास आहे. न्यायालयाचे निर्देश पाळण्याचा, घटनेनुरूप वागण्याचा यांचा दुरान्वये संबंध नाही. त्यामुळे यांच्याकडून न्यायिक वर्तणुकीची अपेक्षा करणेच मूर्खपणाचे आहे.

**टीकेचे धनी फडणवीसच!**

बरं, एवढं करूनदेखील देणाऱ्याच्या वाटेला काय आलं, तर मराठा आंदोलन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिलेल्या शब्दानुसार महिनाभरात सातारा गॅझेट लागू करावे, अन्यथा येत्या निवडणुकांत सरकारचा धुरळा उडवू आणि राज्यभरात एकाही नेत्याला रस्त्यावर फिरू देणार नसल्याची धमकी... म्हणजे ज्यांची दिशाभूल केली, न्याय दिला नाही, दिलेलं आरक्षणं घालवलं, आरक्षण देणं तर दूरच; साधं आम्ही समाधान करू, आरक्षण देण्याचे प्रयत्न करू देखील न म्हणणारे नामानिराळे राहिलेत, भले ठरलेत; आणि ज्यांनी आरक्षण दिले, देण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले, त्यांचे धन्यवाद मानायचे तर सोडा; वाटेला काय तर शिव्याशाप... ▮

९२७०३३३८८६

### प्रतिष्ठापना आणि विसर्जन

नुकत्याच श्री महालक्ष्मी सण आटोपून निरोप घेऊन गेलेल्या. महालक्ष्म्यांना निरोप असो की गणेश विसर्जन अशा वेळी लहान-मोठ्या साऱ्यांच्याच मनात असे भाव दाटून येतात. मनाच्या तारा जुळल्या की, मनातलं न बोलताच आपल्या प्रिय व्यक्तीला आपल्या मनातील भाव आपोआपच कळतात. जरी त्या दूर अंतरावर असतील तरीही अतींद्रिय शक्तीच्या आधारे ती जाणीव होते. असा अनुभवी अनेकांना आलेला असेलच. आजकाल या मनाच्या तारा जुळो न जुळो, पण मोबाईल आणि विशेषतः सोशल नेटवर्किंग साईट्सच्या तारा आपल्या मनाशी इतक्या जुळल्या आहेत की, या आंतरजालाच्या (नव्हे मायाजालाच्या) अतींद्रिय शक्तीचा प्रत्यय पदोपदी येत असतो. फेसबुक उघडले अन् समोरच एक पोस्ट दिसली... सावरकरांचे वाक्य म्हणून शेअर केलेली ती पोस्ट होती... 'खरं तर तो कुठेच जात नाही; इथेच असतो. प्रतिष्ठापना, विसर्जन हे आपल्या मनाचे खेळ. अनादी, अनंत आणि असीम अशा काळावर अधिराज्य गाजवणाऱ्यांना आपण काय बसवणार आणि विसर्जित करणार? विसर्जन माणसांचं असतं, तत्त्वं चिरंतन असतात..!' या चराचराला व्यापणाऱ्या ज्या निर्गुण निराकार तत्त्वांचं आपण विविध देवी-देवतांच्या रुपात पूजन करतो त्या मूळ तत्त्वांचं विसर्जन होतच नसतं... ही चिरंतन आहेत. बदलत्या काळानुसार प्रत्येकवेळी वेगवेगळी रूपं पालटून ही तत्त्व आपल्या अस्तित्वाची जाणीव करून असतात. मग दरवर्षीचं हे प्राणप्रतिष्ठापना आणि विसर्जन कशासाठी? एका कवीने महालक्ष्मी निरोप घेतेवेळी होणारी मनाची अवस्था अगदी नेमक्या शब्दात व्यक्त केली आहे. तो म्हणतो,

**गौराईचे वास्तव्य, चैतन्याची झळाळी...**
**दिस हा शुभंकर, सकाळ सोनसळी...**
**आली निरोपाची वेळ, जिवा हुरहूर दाटे...**
**ये ग पुन्हा तू माउली, माझ्या घरकुला वाटे..!!**

**प्रसाद दत्तात्रेय पोफळी**/९८२२५६९६४८

●● ●●

### ऋषितुल्य भाऊ...

ऋषिपंचमीला आपण संत श्री गजानन महाराजांची पुण्यतिथी साजरी केली आणि याच दिवशी अशाच एका ऋषितुल्य महानुभावाची शतकोत्तर रोप्य (१२५ वी) जयंतीसुद्धा होती; ती म्हणजे प.पू. भाऊंची. भाऊ म्हणजे प.पू प्रल्हाद महाराजांचे कनिष्ठ बंधू. साखरखेर्ड्याचे वे.शा.सं. पुरुषोत्तम मुकुंद काळे आपल्या मामांनाच दत्तक दिल्यामुळे ते पुरुषोत्तम त्र्यंबक किंबहुने झाले. प.पू. प्रल्हाद महाराज व आमचे भाऊ म्हणजे अगदी श्रीराम-लक्ष्मणाचीच जोडी होती. जगप्रसिद्ध मेहकरच्या श्री शारंगधराची पुजारी म्हणून नव्हे तर खऱ्या अर्थाने अर्चक म्हणून त्यांनी सुमारे पाच दशक सेवा केली. भाऊंनी मंदिरात संपूर्ण श्रावण महिन्यात श्री विष्णुसहस्रनाम पठनाचा सुरू केलेला उपक्रम आजही सुरू आहे तसेच जन्माष्टमीला श्रीमद्भगवद्गीतेच्या ११ व्या अध्यायाचे पठन त्यांनी सुरू केले, ते सुद्धा सुरू आहे. अखंड परमेश्वराच्या चिंतनात राहणे हा एकच ध्यास त्यांना होता. मार्गशीर्षातील उत्सवात दहा दिवस डोळ्याचे पारणे फिटणारा वाराप्रमाणे पोषाख करावा तो भाऊंनीच. भाऊंचे प्रस्थान त्रैयीचे वैदिक शिक्षण इंदूरला झाले होते. आम्हा बालगोपाळांवर त्यांनी केलेले संस्कार अजूनही आम्ही विसरलेलो नाही. आमचे भाऊ प्रखर राष्ट्रभक्त होते. ते उत्कृष्ट कवी होते. त्यांनी श्री बालाजीवर अनेक पदे, आरत्या, अष्टके केल्या आहेत. सात्त्विक आचरणाने समाजात त्यांच्याविषयी आदरयुक्त भीती होती. सामाजिक कार्यात ते अग्रेसर असत. त्यांचं घर म्हणजे जुन्या काळातील गुरुकुलच! प.पू. महाराजांचे ते उजवे हात होते. कोणतेही मोठे कार्य महाराज भाऊंवर सोपवित. आश्विन महिना हा या काळे कुटुंबाला घात महिना ठरला. याच महिन्यात महाराजांचे वडील, भाऊ आणि भाऊंच्या सौभाग्यवती श्रीराम चरणी लीन झाल्यात. अशा या १२५ वर्षांपूर्वी जन्मलेल्या ऋषींना विनम्र अभिवादन.

**अशोक पत्की**/९८८१३०१३३१

●● ●●

## वाचक पत्रे

### चारचाकी वाहनांचा अतिरेक

भारतात शैक्षणिक कर्जावरील व्याज दर हे चारचाकी गाडीच्या व्याज दरापेक्षा अधिक असून यातून राज्यकर्ते-सरकारमधील लोकांची बौद्धिक दिवाळखोरी प्रदर्शित होते. सगळीकडे चारचाकी गाड्यांचा सुळसुळाट असून ९० टक्के कार मालकांकडे पार्किंगची जागा नाही. चारचाकीही गरज नसून चैनीची वस्तू आहे. पण सरकारला ही बाब कळू नये? शिवाय आता जीएसटी २८ वरून १८ टक्के केल्यामुळे या मूर्खपणात अजून भर घातली आहे. यामुळे चारचाकींची संख्या वाढून वाहतूक कोंडी अजून भीषण होणार आहे, हे नक्की.

**अनिल वाटवे** /९०११२९८०९९

●● ●●

### प्रथा आणि परंपरा

भारतीयांची स्वतःची एक जीवन पद्धती आहे. जीवन तर सगळेच जगताच, पण त्याला धर्म आणि कर्तव्याची जोड हवी. धर्म आम्हाला जगण्यासाठी प्रेरित करतो. आहार पोषण देतो. धर्म आणि आहार यांचा स्वर्ण मध्य साधून आम्ही जगण्याचे बीज मनमनांत पेरत असतो. अंगणात तुळस आणि शिखरावर कळस हीच आपल्या संस्कृतीची ओळख. कपाळी कुंकू आणि डोक्यावर पदर ही सौभाग्याची ओळख. माणसात जपतो माणुसकी आणि नात्यात जपतो नाती. हीच आमच्या भारताची ओळख! आपल्या पूर्वजांनी सण आणि उत्सव यांची धार्मिक कार्याशी सांगड घालून भारतीय संस्कृतीला अनमोल अशी भेट प्रदान केली आहे. त्यामध्ये धार्मिक कार्याला विज्ञानाची सांगडसुद्धा पाहायला मिळते. असा हा भारत महान संस्कृती असलेला देश आहे. ▮

**प्रा. वर्षा विलास कावरे** / ९०२१६७३१७८

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच कुठलाही लेख पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने डॉ. जगदाळे सन्मानित

**तभा वृत्तसेवा**

**लातूर , दि.७ ऑगस्ट -** शिक्षक दिनानिमित्त विज्ञान भवन येथे आयोजित समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते महाराष्ट्रातील सहा शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. यात लातूरचे डॉ. जगदाळे यांचा समावेश आहे.

यामध्ये शालेय शिक्षण क्षेत्रातील डॉ. शेख मोहम्मद वक़िउद्दीन शेख हमीदोद्दीन (जिल्हा परिषद हायस्कूल, अर्धापूर, नांदेड), सोनिया विकास कपूर (एटॉमिक एनर्जी सेंट्रल स्कूल नं. २, मुंबई) आणि उच्च शिक्षण क्षेत्रातील डॉ. संदीपन गुरुनाथ जगदाळे (दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स, लातूर), डॉ. नीलाक्षी जैन (शाह अँन्ड अँकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई), प्रा. पुरुषोत्तम पवार (एस व्ही पी एम इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड इंजिनीअरिंग, बारामती), आणि कौशल्य विकास क्षेत्रातील श्री. अनिल रामदास जिभकाटे (संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर) यांचा समावेश आहे.

शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागातर्फे आयोजित या सोहळ्यात ४५ शालेय शिक्षक, २१ उच्च शिक्षण आणि १६ कौशल्य विकास क्षेत्रातील शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, शिक्षण राज्यमंत्री डॉ. सुकांत मजूमदार, जयंत चौधरी, शिक्षण मंत्रालयाचे सचिव संजय कुमार, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाचे (चडऊए) सचिव देबाश्री मुखर्जी यावेळी उपस्थित होते.

या पुरस्काराचा उद्देश शिक्षकांचे समर्पण, नाविन्यपूर्ण कार्यपद्धती आणि विद्यार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा गौरव करणे हा आहे. मागील काही वर्षांपासून या पुरस्काराची व्याप्ती वाढवून उच्च शिक्षण तसेच कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयातील शिक्षकांनाही संधी देण्यात येत आहे.



### संक्षिप्त वृत्त...

## पोटात काचेची बाटली खुपसून एकाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ ऑगस्ट -** मानसिक तणावातून एका ५० वर्षीय इसमाने काचेची बाटली फोडून ती पोटात खुपसून आत्महत्या केल्याची घटना औसा रोडवरील बुधोडा येथील खडी केंद्राजवळ असलेल्या जुना सेलू रोडवर शुक्रवारी सकाळी उघडकीस आली. अनंत तातेराव शिंदे (रा. कळमगाव, ता. शिरूर अनंतपाळ) असे मयताचे नाव आहे. या प्रकरणी औसा पोलिसांत आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांनी सांगितले, मयत अनंत तातेराव शिंदे हा अज्ञात कारणावरून गेल्या काही दिवसांपासून मानसिक तणावाखाली होता. गुरुवारी दुपारी लातूरला जायचे आहे, असे सांगून तो दुचाकीवरून घरातून निघून गेला होता. दरम्यान, मानसिक तणावातून त्याने औसा रोडवरील कारंजे खडी केंद्राजवळ असलेल्या जुना सेलू रोडवर काचेची बाटली फोडून ती पोटामध्ये खुपसून त्याने आत्महत्या केली. जखमी अवस्थेत त्याने नातेवाईकांना व्हिडीओ कॉल करून याबाबत माहिती दिली होती. शुक्रवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह आढळून आल्याने परिसरातील नागरिकांनी पोलिसांना माहिती दिली. औसा पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. शवविच्छेदनासाठी मृतदेह ग्रामीण रुग्णालयात पाठविला. या प्रकरणी मयताचा चुलत भाऊ राजेंद्र शिंदे यांच्या फिर्यादीवरून औसा पोलिसांत आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक डाके हे करत आहेत.

## लातूर जिल्हा परिषदेला पडला शिक्षकदिनाचा विसर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ ऑगस्ट -** माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन म्हणून साजरी केली जाते. मात्र, लातूर जिल्हा परिषद प्रशासनातर्फे शिक्षक दिनी शिक्षकांचा सन्मान करण्यात आला नाही. यामुळे प्रशासनाला शिक्षक दिनाचा विसर पडल्याचे दिसून येत आहे. प्रशासनाच्या सोयीनुसार हा सन्मान सोहळा उरकून घेण्यात येत असल्याने शिक्षणप्रेमींतून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

जिल्हा परिषद पातळीवर दरवर्षी शिक्षक दिनी शिक्षकांचा सन्मान करण्यात येतो. मात्र, गेली काही वर्षांपासून लातूर जिल्हा परिषद प्रशासनाकडून या दिवशी शिक्षकांचा सन्मान केला जात नाही. सोयीनुसार हा कार्यक्रम उरकण्यात येतो. ५ सप्टेंबरपूर्वी जिल्हा पातळीवरील आदर्श शिक्षकांची नावे जाहीर केली जातात. या वर्षी लातूर जिल्हा परिषदेने आदर्श शिक्षकांची नावेच जाहीर केली नाहीत. एवढेच नव्हे तर राज्य पातळीवरील आदर्श शिक्षकांचीही नावे जाहीर झाली नाहीत. त्यामुळे या दिवसाचे महत्त्व लक्षात घेऊन शिक्षकांचा सन्मान करण्याऐवजी प्रशासन एवढी उदासीनता का दाखवते? असा प्रश्नही शिक्षणप्रेमींकडून उपस्थित केला जात आहे.

## लातुरात भटक्या विमुक्त समाजाची ‘स्वातंत्र्य परिषद’

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ ऑगस्ट -** भारतीय भटक्या विमुक्त जमाती विकास संघटनेच्यावतीने लातूरच्या काँग्रेस भवन येथे भटक्या विमुक्त समाजाची ‘स्वातंत्र्य परिषद’ उत्साहात पार पडली. १९५२ ला याच दिवशी तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी सोलापूरमधील सेटलमेंटमधून भटक्या विमुक्तांना मुक्त केले होते. या ऐतिहासिक दिवसाचे स्मरण करण्यासाठी हा दिवस ‘स्वातंत्र्य दिन’ म्हणून साजरा केला जातो.

या परिषदेत भटक्या विमुक्त समाजाच्या सद्यस्थितीवर आणि त्यांच्या पुढील वाटचालीवर चर्चा झाली. समाजामध्ये गरिबी, नेतृत्वाचा अभाव आणि उपेक्षित जीवन अशा अनेक समस्या आजही कायम आहेत. या पार्श्वभूमीवर, भविष्यात मजबूत संघटनेची आवश्यकता असल्याचा सूर या परिषदेत उमटला.

अध्यक्षस्थानी भटक्या विमुक्तांचे नेते प्रा. सुधीर अनवले होते. यावेळी कामगार नेते राजकुमार होळीकर, प्राचार्य एकनाथ पाटील, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, धनाजी गुरव आणि काँग्रेसचे शहराध्यक्ष अॅड. किरण जाधव यांनी मार्गदर्शन केले. दत्ता सोमवंशी यांनी प्रास्ताविक केले, तर सत्यवान कांबळे यांनी आभार मानले. यावेळी जोशी, कैकाडी, घिसाडी, माती वडार, गाडी वडार, भोई, मसनजोगी, वासुदेव, गोंधळी, पारधी, भिल्ल, नाथ जोगी, गोसावी, कोल्हाटी, वैदू आदी भटक्या विमुक्त जमातींचा जनसमुदाय उपस्थित होता.

## अपहारप्रकरणी बँक कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ ऑगस्ट -** उदगीर शहरातील शेल्हाळ रोडवरील लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखेत बचत खातेदारांनी दिलेली २५ हजार रुपयांची रक्कम बँकेत वेळेवर न भरता स्वतःच्या फायद्यासाठी वापरून अपहार केल्याप्रकरणी बडतर्फ बँक कर्मचाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे सहायक व्यवस्थापक तथा दक्षता विभाग प्रमुख राजेंद्र ज्ञानदेव जगताप यांनी उदगीर शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, २८ मे २०२४ ते १० जून २०२४ दरम्यान उदगीर शहरातील शेल्हाळ रोडवरील लातूर जिल्हा बँकेच्या शाखेत खातेदार भीमाशंकर नवनाथ चवळे यांचे बचत खाते आहे. चवळे यांनी बँकेतील कॅशिअर असलेला आरोपी कर्मचारी शिवमूर्ती मजगे (रा. प्रगतीनगर, एल.आय.सी. कॉलनी, लातूर) याच्याकडे बँकेत भरण्यासाठी २५ हजार रुपयांची रक्कम दिली होती. खातेदार चवळे यांनी दिलेली रक्कम आरोपी मजगे याने बँकेत न भरता सदर कालावधीत रक्कम स्वतःच्या फायद्यासाठी वापरून अपहार करून फसवणूक केली आहे, सदरची माहिती मिळाल्यानंतर बँकेचे सहायक व्यवस्थापक तथा दक्षता विभाग प्रमुखांनी उदगीर शहर पोलिसांत दिलेल्या तक्रारीवरून आरोपी शिवमूर्ती मजगे याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक मोहिते हे करीत आहेत.

# ‘विघ्नहर्ता गणरायाला’ जड अंत:करणाने निरोप







**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ ऑगस्ट -** लाडक्या गणरायाला शहरातील शेकडो मंडळांनी उत्साहपूर्ण वातावरणात ढोल-ताशे, फुलांचा वर्षावात निरोप दिला. गणेश मंडळांनी विविध देखावे सादर करीत शनिवारी उत्साहाच्या वातावरणात आणि पारंपारिक वाद्यांच्या गजरात विघ्नहर्त्या गणरायाचे विसर्जन करून जड अंत:करणाने निरोप देण्यात आला.

मागील दहा दिवसांपासून शहरात विविध मंडळांसह घरोघरी लाडक्या गणरायाची मनोभावे पूजा करण्यात आली. शेवटच्या दिवशी दुपारी अकरा वाजता मानाच्या आजोबा गणपती मंडळाची शेवटची आरती झाल्यानंतर विसर्जन मिरवणुकांना सुरुवात झाली. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकासह गावभागातील गणरायाच्या विसर्जन मिरवणुका मोठ्या थाटात झाल्या. यात तरुणांसोबत महिला, मुलींचा मोठा सहभाग दिसून आला. विसर्जन मिरवणुकीत एकेका गणेश मंडळाची अनेक वाहने होती.

औसा हनुमान, गांधी चौक, गंजगोलाई, भुसार लाईन, सुभाष चौक, दयाराम रोड, पटेल चौक, सिध्देश्वर मंदिर बारव अशी विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकातील व बार्शी रस्त्यांवरील मंडळांनीही उत्साहात मिरवणुका काढल्या. महानगरपालिकेने उभारलेल्या शहरातील मूर्ती संकलन केंद्रांवर घरातील गणरायांच्या मूर्ती घेण्यात आल्या. मोठ्या मंडळांच्या मूर्ती विसर्जनस्थळावरून थेट १२ नंबर पाटी येथील खदानीकडे पाठविण्यात आल्या. तेथे विसर्जनासाठी महानगरपालिका प्रशासनाने व्यवस्था केली होती. मध्यरात्रीनंतर वाद्य बंद करण्यात आले. सिध्देश्वर मंदिर संकलन केंद्रात शेवटच्या गणपतीची आरती करण्यात आली.

गणेश विसर्जन मिरवणुकीत काही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांच्यावतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मिरवणुका निघण्यापूर्वी पोलिसांनी मिरवणूक मार्गावरील प्रत्येक गर्दी होणाऱ्या ठिकाणांची बॉम्ब शोधक पथक व श्वान पथकाकडून बारकाईने तपासणी करण्यात आली होती.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकासह गांधी चौक, अशोक हॉटेल, दयानंद गेट परिसर, संविधान चौक, हनुमान चौक, गंजगोलाई, सुभाष चौक, हत्ते कॉर्नर या भागात पोलिसांचे बॉम्बशोधक पथक व श्वान पथकाने धुंडाळा घेतल्याचे दिसून आले.

सुभाष चौकात सुभाष चौक मित्रमंडळ व सार्वजनिक गणेश मंडळ असे दोन मंच उभे करण्यात आले होते. भाजपतर्फे मंडळांचे स्वागत करण्यासाठी गंजगोलाईत सभा मंडप उभारण्यात आला होता. शहरातील मुख्य चौकात राजकीय पक्ष तसेच विविध संघटनांनी गणेशाच्या स्वागतासाठी मंडप उभारले होते. त्या समोरून जाणाऱ्या मिरवणुका आपले देखावे सादर करून पुढे जात होती. विसर्जन मिरवणुकांदरम्यान अनेक मंडळांनी ढोल-ताशाच्या गजरातच गणरायाला निरोप दिल्याचे दिसून आले.

प्रत्येक मंडळांनी स्वत:चे ढोल-ताशा पथक निर्माण केल्याचे दिसून आले. गावभागातील प्रत्येक मंडळांच्या मिरवणुकांमध्ये त्या-त्या भागातील प्रत्येक कुटुंबीयांनी हा घरचा उत्सव असल्यासारखे लहान- थोरांसह महिला, मुलींनीही मोठ्या उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविल्याचे दिसून आले. एकंदरीत, गावभागासह शहरातील गणरायांच्या विसर्जन मिरवणुका अगदी शांततेत पार पडल्या. सुदैवाने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कुठलाही अनूचित प्रकार घडला नाही.

## मराठवाडा अनुशेष शासन दरबारी मांडावा; शिष्टमंडळाची मागणी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ ऑगस्ट -** गेल्या काही वर्षांत मराठवाड्याच्या अनुशेषात प्रचंड वाढ झाली असून, याकडे राज्यकर्त्यांचे सातत्याने दुर्लक्ष होत आहे. यामुळे हा अनुशेष दिवसेंदिवस वाढतच चालला आहे.यामुळे मराठवाड्याचे मागासलेपण अधिकच ठळक झाल्याची खंत व्यक्त करण्यात आली.

या अनुशेषाच्या भरपाई करण्यासाठी शासन दरबारी ठोस पाठपुरावा गरजेचा आहे. याकामी आमदार संजय बनसोडे यांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी नामदेव पाटील तळेगावकर आणि त्यांच्या सोबतच्या शिष्टमंडळाने केली.

या प्रसंगी मोईजभाई शेख, अॅडव्होकेट व्यंकट बेद्रे, सुंदरलाल दरक यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

## गुंठेवारीवरील बंदी उठवा

### इंजिनिअर्स असोसिएशनचे पालिका आयुक्तांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ ऑगस्ट -** शहर हद्दीतील प्लॉटची गुंठेवारी करणे बंद असल्याचे महापालिका नगररचना विभागाकडून कळविण्यात आले आहे. यामुळे सद्या प्लॉट खरेदी, विक्री, बांधकाम परवाने बंद आहेत. गुंठेवारीवरील बंदी कायमस्वरूपी उठवण्यात यावी. दीडशे ते तीनशे चौरस मीटरपर्यंतच्या घर बांधकामांना खासगी अभियंत्यांच्या मंजुरीवर परवानगी देण्यात यावी, अशी मागणी इंजिनिअर्स असोसिएशन, लातूरच्यावतीने महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या १४ फेब्रुवारी २०२४ च्या महसूल, गुंठेवारी आदेशाची पालिकेकडून अंमलबजावणी होणे आवश्यक होते. मात्र, अद्याप गुंठेवारीचे काम सुरू करण्यात आले नाही. नगर रचनाकार यांच्या हलगर्जीपणामुळे शहरामधील



प्लॉटची खरेदी, विक्री करणे व बांधकाम परवानगी यास खिळ बसली आहे. याचा सर्वसामान्य लातूरकरांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे गुंठेवारीवरील बंदी कायमस्वरूपी उठवावी, दीडशे ते तीनशे चौरस मीटरपर्यंतच्या घर बांधकामांना खासगी अभियंत्यांच्या मंजुरीवर परवानगी देण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष अभिजीत देशपांडे-सरसंबेकर, मनोज देशमुख, ऋषिकेश निगडीकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## आ. देशमुख यांच्या हस्ते गणेश मंडळांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ ऑगस्ट -** माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी अनंत चतुर्दशीच्या निमित्ताने गंजगोलाई येथील विलासराव देशमुख युवा मंचच्या स्वागत कक्षात शहरातील विविध गणेश मंडळांचे स्वागत केले. यावेळी त्यांनी उत्कृष्ट देखावे सादर करणाऱ्या मंडळांचे विशेष कौतुक केले.

शनिवार, ६ सप्टेंबर रोजी सायंकाळी आयोजित या कार्यक्रमात, आमदार अमित देशमुख यांनी रणवाद्य गणेश मंडळ (सेंट्रल हनुमान) आणि श्री वक्रतुंड गणेश मंडळ यांच्या अध्यक्ष आणि सदस्यांचा सत्कार केला. श्री वक्रतुंड गणेश मंडळाने ३९;भक्त प्रल्हाद३९; यांचा सजीव देखावा सादर केल्याबद्दल त्यांचे विशेष कौतुक करण्यात आले. यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, माजी महापौर दीपक सुळ, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, अशोक गोविंदपुरकर आदी उपस्थित होते.

यास्वागत कक्षाच्या वतीने लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे विरोळे आणि तहसीलदार सौदागर तांदळे यांचेही स्वागत करण्यात आले. यावेळी व्यंकटेश पुरी, गिरीश ब्याळे, रईस टाके, राम स्वामी, सत्यवान कांबळे, सुनील कोटलवार, राम कोंबडे, युनूस मोमीन, सुलेखा कारेपूरकर, राज क्षिरसागर, अॅड. देविदास बोरुळे पाटील, रमेश सूर्यवंशी, अभिजीत इगे, विजयकुमार साबदे, राजा माने, प्रवीण सूर्यवंशी, प्रवीण कांबळे, गोरोबा लोखंडे, फारुक शेख, दगडूआप्पा मिटकरी, पवनकुमार गायकवाड, चंद्रकांत धायगुडे, विष्णुदास धायगुडे, गणेश कांबळे, अक्षय मुरळे, भाऊसाहेब भडीकर, मोहन सुरवसे, युनूस शेख, अब्बू मणियार, पंडित कावळे, तबरेज तांबोळी, राम गोरड, राजू गवळी, युसूफ बाटलीवाला करीम तांबोळी तसेच इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यंकटेश पुरी यांनी केले.

## प्रा. घार यांचा महाराष्ट्र आयडीयल पुरस्काराने गौरव

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ ऑगस्ट -** जयक्रांती महाविद्यालय, लातूर व पुणे शैक्षणिक संकुलाचे संस्थापक सदस्य प्रा. गोविंदराव अंबाजी घार यांना साप्ताहिक महाराष्ट्र मीडिया तर्फे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्याबद्दलचा महाराष्ट्र आयडियल पुरस्कार-२५ मुंबई येथे मराठी पत्रकार भवनात ना. मेघना साकोरे (बोर्डीकर) महिला व बालविकास राज्यमंत्री, यांच्या हस्ते समारंभ पूर्वक प्रदान करण्यात आला.

यावेळी मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ चे सदस्य सलीम सारंग, स्वागताध्यक्ष तथा उद्योजक समाजसेवक पवन निकम, ज्येष्ठ समाजसेवक सुरेश अ. हिवराळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रातील प्रसिद्ध लातूर पॅटर्न मध्ये प्रा. गोविंदराव घार सर यांचे योगदान अतिशय मोलाचे आहे. घार सर नवनवीन संकल्पना शिक्षण क्षेत्रात राबवून शैक्षणिक क्रांती घडवण्याचे काम त्यांनी केले आहे. त्यामुळेच महाराष्ट्र आयडियल पुरस्कार २०२५ करिता त्यांची निवड झाली आहे. ही निवड अतिशय योग्य असून योग्य व्यक्तीचा सन्मान झाल्याचा आम्हाला अभिमान वाटतो असे मत महिला व बाल विकास राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी व्यक्त केले.

घार सरांनी लातूर शहरांमध्येच नाही तर महाराष्ट्रामध्ये आपल्या सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कार्य केले आहे. त्यांच्या सन्मानाबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हजारो भाविकांनी घेतले विघ्नहर्ता श्री चिंतामणी गणपतीचे दर्शन

## भाविकांसाठी नाश्ता, फराळ, भोजनाची व्यवस्था, पोलिस, स्वयंसेवक, सफाई कर्मचाऱ्यांनी घेतले परिश्रम







**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ सप्टेंबर**
हिंगोली शहरातील मोदकाचा गणपती तसेच नवसाला पावणारा गणपती म्हणून देशभरात प्रसिध्द असलेल्या विघ्नहर्ता श्री चिंतामणी गणपतीच्या दर्शनासाठी सुमारे १ ते दीड लाख भाविक दर्शनासाठी हिंगोली शहरात दाखल झाले. मध्यरात्रीपासूनच भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. बाहेर गावाहून येणाऱ्या भाविकांसाठी शहरातील विविध ठिकाणी दानशुर व्यक्ती, व्यापारी महासंघ आदींनी चहा, पाणी, नाश्ता, फराळ, भोजनाची व्यवस्था केली. यावेळी पोलिस प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी, नगर पालिका अधिकारी, कर्मचारी, सफाई कर्मचारी तसेच स्वयंसेवकांनी दिवसभर परिश्रम करीत भाविकांना सोयीसुविधा मिळवून देत दर्शन सुलभ केले.

दरवर्षी अनंत चर्तुदशीच्या दिवशी विघ्नहर्ता श्री चिंतामणी गणपतीच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह राज्यातून तसेच परराज्यातून हजारो भाविक दर्शनासाठी येतात. महाराष्ट्रासह गुजरात, राजस्थान, आंध्र प्रदेश, तेलंगणा, दिल्ली, मध्यप्रदेश या राज्यातून भाविक दर्शनासाठी येत असतात. यावर्षी संस्थानच्यावतीने दररोज मोदक वाटप करण्यात आले आहेत.

शनिवारी दि ६ सप्टेंबर रोजी पहाटे चार वाजता महापूजा, अभिषेक, आरतीनंतर गणपतीच्या दर्शनाला सुरूवात झाली. हजारो भाविकांनी सकाळपासूनच रांगेत गर्दी केली होती. सकाळपासून शहरातील व्यापारी महासंघ, दानशूर व्यक्ती तसेच मित्रमंडळांनी बाहेरून येणाऱ्या भाविकांसाठी चहा, पाणी, फळे, फराळ, नाश्ता, भोजनाची व्यवस्था केली होती. शहरात येणारे सर्व मार्ग पोलिस विभागाने बंद केले होते. त्यामुळे भाविकांना थेट दर्शनासाठी येण्यास सुविधा झाली होती. जागोजागी पोलिस कर्मचारी, गृहरक्षक दलातील जवान यांनी मोर्चा सांभाळला होता. हजारो भाविकांनी विघ्नहर्ता चिंतामणीच्या दर्शनासाठी रांगेत उभे राहून दर्शन घेतले. यावेळी दुर्वा, फुले तसेच प्रसद, पूजेचे साहीत्याची दुकाने थाटली होती. अन्नदान करण्यासाठी राजकीय पुढाऱ्यांसह सामाजिक कार्यकर्ते तसेच व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. काही व्यापाऱ्यांनी प्रतिष्ठाने बंद ठेवीत दिवसभर चिंतामणीच्या दर्शनसाठी येणाऱ्या भाविकांची सेवा केली.

मंदिर संस्थानने वॉटर प्रुफ मंडप उभारल्यामुळे पावसातही भाविकांना सुलभतेने दर्शन घेण्यास मदत झाली. भाविकांच्या सोयीसाठी मंदिर संस्थान समिती, पोलिस प्रशासन तसेच जिल्हा प्रशासन सज्ज झाले होते. होणारी गर्दी लक्षात घेता शहरातीत्यानंतर भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, महावीर चौक, मेडीकल लाईन, जुने ग्रामीण पोलिस ठाणे, मारवाडी गल्ली भागातून दर्शन रांग मंदिरापर्यंत लागल्या होत्या. महिला, तरूण-तरूणी तसेच अबालवृध्दांनी विघ्नहर्ता चिंतामणीच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. ठिकठिकाणी स्वयंसेवकांची नेमणूक करण्यात आली होती. भाविकांना रांगेत मंदिरापर्यंत पोहोचण्यासाठी त्यामुळे मदत झाली. नगर पालिकेचे सफाई कर्मचारी तत्काळ कचरा उचलून गाडीत भरून बाहेर नेऊन टाकत असल्यामुळे स्वच्छता दिसत होती. भाविकांच्या वाहनांसाठी रामलीला मैदानात पार्कींगची व्यवस्था करण्यात आली होती. हजारो वाहने पार्कींगमध्ये लागल्याचे चित्र दिसत होते. संपूर्ण शहरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांच्यासह अधिकाऱ्यांची करडी नजर होती. सुमारे ४०० पेक्षा अधिक पोलिस कर्मचारी व गृहरक्षक दलाचे जवान बंदोबस्तासाठी तैनात केले होते. शिवाय १०० पेक्षा अधिक स्वयंसेवक मदतीला होते. तसेच ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे देखील बसविण्यात आले होते.दर्शन रांग व परिसरात स्वच्छता राखण्यासाठी पालिका मुख्याधिकारी अरविंद मुंडे, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, उपमुख्याधिकारी शाम माळवटकर, यांनी सफाई कामगारांची चार पथके स्थापन करण्यात आली होती. त्यांना विविध ठिकाणी स्वच्छतेसाठी नियुक्त केले होते. गोळा केलेला कचरा वाहून नेण्यासाठी ६ घंटागाड्या ठेवण्यात आल्या होत्या.

# डीजे रद्द करून वृध्दाश्रमाला मदतीचा हात, पोलिसांकडून सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**वसमत ६ सप्टेंबर**
शहरातील स्वानंद गणेश मंडळाने समाजासाठी अनुकरणीय असा निर्णय घेतला आहे. गणेशोत्सव मिरवणुकीच्या वेळी होणारा प्रचंड खर्च, त्यासाठी लावला जाणारा डीजे यावर पैसा खर्च करण्याऐवजी मंडळाने तो थेट समाजोपयोगी कार्यासाठी वापरण्याचा संकल्प केला.



या निर्णयानुसार मिरवणुकीचा डीजे रद्द करून त्यावरील सर्व खर्च पळसगाव येथील वृद्धाश्रमाला मदत स्वरूपात देण्यात आला. मंडळाच्या या पवित्र उपक्रमामुळे वृद्धाश्रमातील गरजू वृद्धांना दिलासा मिळणार असून समाजात एक सकारात्मक संदेश गेला आहे. युवकांनी सामाजिक बांधिलकी लक्षात घेऊन घेतलेल्या या निर्णयाचे शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधीर वाघ व विवेक गुंडरे संदीप जोगदंड यांनी मनःपूर्वक कौतुक करत स्वानंद गणेश मंडळाचा सत्कार केला. या प्रसंगी पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले की, गणेशोत्सव हा केवळ जल्लोष करण्याचा सण नाही तर समाजासाठी काहीतरी चांगले घडविण्याची संधी आहे आणि स्वानंद गणेश मंडळाने तो आदर्श घालून दिला आहे.

या निर्णयामुळे स्वानंद गणेश मंडळाचे नाव केवळ वसमत तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरले आहे. ध्वनीप्रदूषण आणि फाजील खर्चाला नकार देत समाजोपयोगी कार्याला दिलेले प्राधान्य हे इतर गणेश मंडळांसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे.



**हिंगोली–** नवा मोंढा भागात श्रीराम बाल गणेश मंडळाच्या वतीने यांच्या स्मरणार्थ आयोजन करण्यात आले माजी जि.प. सदस्य बाबा नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष बि डी बांगर, आशिष काबरा, माजी नगरसेवक गोपाल दुबे ,माजी नगरसेवक खय्युम भाई,प्रा. सुखदेव बळखंडे, राजेश मानधने, भूषण पिल्ले, अमित बांगर, संदीप घुगे, ओम सारडा, अर्पित दुबे, राजू पिल्ले, तन्मय दुबे आदींची उपस्थिती होती. छाया– विजय गुंडेकर

## संक्षिप्त वृत्त

### जश्ने ईद मिलादुन्नबी निमित्त आरोग्य शिबीर



हिंगोली– जश्ने ईद मिलादुनबी निमित्त भव्य मोफत आरोग्य शिबिराचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मोखिजर हाजी अहेमद खान नसीर ख़ान मूसा भाई शाहरूख हाजी अशपाक रजा शेख़ सिराज स ईमरान ईतर ईदे मिलादुन्नबी कमेटी आदींची प्रमुख उपस्थीती होती. दरवर्षी प्रमाणे यावर्षीही जश्न ईद मिलादुन्नबी निमित्त आरोग्य शिबीर, गोदावरी हॉटेल जवळ रजा मैदान मंगळवारा रोड हिंगोली येथे मोफत आरोग्य शिबीर घेण्यात आली. सदरील शिबीर मध्ये तज्ञ डॉक्टरांमार्फत तपासणी करून मोफत औषधीचे वाटप करण्यात आले या मध्ये ४६० रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला. ईद-ए- मिलादुन्नबी समिती हिंगोली च्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

### डॉ. गोविंद देशमुख यांना पुरस्कार



हिंगोली-महात्मा ज्योतीराव फुले शिक्षण परिषदेच्यावतीने डॉ गोविंद देशमुख यांना राज्यस्तरीय नागरीरत्न पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आला. दि ५ सप्टेंबर रोजी नांदेड येथील कुसुम सभागृहात ब्रिगेडीयर सावंत यांच्याहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल डॉ देशमुख यांना हा पुरस्कार मिळाला आहे.

### श्रीराम बालगणेश मंडळातर्फे रक्तदान शिबीर

हिंगोली- शहरातील नवा मोंढा भागात श्रीराम बाल गणेश मंडळाच्या वतीने यांच्या स्मरणार्थ आयोजन करण्यात आले माजी जि.प.. सदस्य बाबा नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष बि डी बांगर, आशिष काबरा, माजी नगरसेवक गोपाल दुबे ,माजी नगरसेवक खय्युम भाई,प्रा. सुखदेव बळखंडे, राजेश मानधने,भूषण पिल्ले, अमित बांगर, संदीप घुगे, ओम सारडा, अर्पित दुबे, राजू पिल्ले, तन्मय दुबे, अजमत पठाण, बाबा सलमान याच्यासह युवा फ्रेंड्स टायगर ग्रुप महाराज मित्र मंडळ चे सदस्य मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्यावतीने बासापूजन कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ सप्टेंबर**
सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्यावतीने आज शहरातील रामलीला मैदानावर बासा पूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी सार्वजनिक दसरा महोत्सव समितीचे सचिव तथा तहसीलदार श्रीकांत भुजबळ व आमदार तानाजी मुटकुळे यांच्या हस्ते विधिवत पूजा आर्चा करून बासा पुजन करण्यात आले.

हिंगोली येथील ऐतिहासिक सार्वजनिक दसरा महोत्सवाला दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी बासापूजनाने सुरूवात झाली. येथील रामलीला मैदानावरील दसरा महोत्सव समितीच्या कार्यालयासमोर बासापूजन करण्यात आले. यावेळी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अरविंद मुंडे, नगर अभियंता प्रतिक नाईक, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, सेवानिवृत्त तहसीलदार मधुकर खंडागळे, दौलत बनसोडे, चंदू लव्हाळे, उमेश नागरे, उमेश गुट्टे नारायण गायकवाड सामाजिक कार्यकर्ते गणेश साहू, नायक, यांच्यासह इतरांची उपस्थिती होती आता येथून पुढे सार्वजनिक दसरा महोत्सव समिती अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन केल्या जाते.

# फसवणुक प्रकरणात आरोपींच्या अटकेसाठी विशेष पथक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ सप्टेंबर**
शहरातील हिंगोली महिला अर्बन व न्यू अर्बन पतसंस्थेच्या सुमारे २५ कोटी रूपयांच्या फसवणुक प्रकरणात आरोपींच्या अटकेसोबत गुन्ह्याच्या तपासात मदत करण्यासाठी विशेष तपास पथक नियुक्त करण्यात आले असून या पथकाला तातडीने आर्थिक गुन्हे शाखेत रूजू होण्याचे आदेश पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिले आहेत.

हिंगोली शहरातील महिला अर्बन व न्यू अर्बन पतसंस्थेत सुमारे २५ कोटी रूपयांची फसवणुक झाल्याचे स्पष्ट झाले आहे. यामध्ये पतसंस्थेच्या संचालकांसह अधिकारी व कर्मचारी यांच्याविरोधात शहर पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये संचालकांनी सभासदांच्या नावे कर्ज काढून अपहार केल्याचे स्पष्ट झाले आहे. यामध्ये दोन गुन्ह्यात तब्बल ६८ जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. त्यानुसार तपासाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी आर्थिक गुन्हे शाखेला दोन्हीही गुन्ह्यांच्या तपासामध्ये मदत करण्यासाठी विशेष पथकाची नियुक्ती केली आहे. यामध्ये पोलिस उपनिरीक्षक सतीश ठेंगे, गोरेगाव पोलिस ठाण्याचे जमादार हेमंत दराडे, वाहतुक शाखेचे गजानन राठोड, शहर पोलिस ठाण्याचे संजय डोंगरदिवे यांचा समावेश आहे. या पथकाला तातडीने आर्थिक गुन्हे शाखेत रूजु होण्याचे आदेश कोकाटे यांनी काढले आहेत.

यामुळे तपासाल गती येणार असून पुढील दोन दिवसात आरोपींची धरपकड मोहीम सुरू केली जाणार असल्याचे पोलिस विभागाने सांगितले आहे.

संचालकांनी सभासदांच्या नावे कर्ज उचलून अपहार केला हे संबंधित सभासदाला समजल्यानंतर त्यांनी काही दिवसांपूर्वी आर्थिक गुन्हे शाखेत जाऊन तक्रारी दिल्या होत्या. तसेच मोंढा भागातील महिला अर्बन पतसंस्थेच्या कार्यालयाबाहेरही गर्दी केली होती. या प्रकारामुळे सभासदांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून संचालकांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर तसेच यामध्ये सामील अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कार्यवाही करावी अशी मागणी या सभासदांमधून होत आहे. या पतसंस्थेच्या गैरकारभारामुळे अनेक ठेवीदारही अजूनही परेशान असून सहकार क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

# १७ सप्टेंबरला ओबीसींचा कळमनुरीत मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ सप्टेंबर**
महाराष्ट्र सरकारने ओबीसींचे शिक्षण नोकरी राजकारणातील २७% आरक्षण संपण्यासाठी हैदराबाद गॅझेटचा जीआर लागू केला.त्यामुळे ६५% ओबीसींना आता रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याची वेळ आणली आहे.

हैदराबाद गॅझेट जीआर आणि न्यायमूर्ती संदीप शिंदे समिती रद्द करावी या मागणीसाठी ओबीसी संघर्ष समितीचे प्रा.लक्ष्मण हाके यांच्या नेतृत्वाखाली मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी दि १७ सप्टेंबर २०२५ बुधवार रोजी दुपारी १ वा. कळमनुरी उपविभागीय कार्यालयावरओबीसी एल्गार मोर्चा काढण्यात येणार आहे.

ओबीसी एल्गार मोर्चाच्या पुर्व तयारी निमित्त दि.७ सप्टेंबर २०२५ रविवार रोजी दुपारी १२ वा.शासकीय विश्राम गृह कळमनुरी येथे ओबीसी बांधवांची बैठक आयोजित केली आहे, या बैठकीस कळमनुरी तालुक्यातील ओबीसी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन ओबीसी जनमोर्चा जिल्हाध्यक्ष ॲड. रवि शिंदे, सावता परिषद प्रदेश संघटक विठ्ठल गाभणे, जीवासेना प्रदेश सचिव उमेश गोरे, समता परिषद मराठवाडा सचिव डॉ.नागोराव जांबुतकर, जिल्हाध्यक्ष चंदू लव्हाळे, सभापती मारोतराव खांडेकर, माजी नगराध्यक्ष उत्तमराव शिंदे, राजेंद्र शिखरे, ॲड. संतोष राठोड, दिनकर कोकरे, बालाजी देवकर, गफार कुरेशी, अशोक करे, अतुल बुर्से, आप्पाराव शिंदे, केशवराव मस्के, वनीता गुंजकर, सुवर्णा गाभणे, प्रा.गजानन थोरात, डॉ.प्रकाशराव नाईक, शिवाजी शिंदे, डॉ.दिलीप मस्के, हाफिज फारूखी, निहाल कुरेशी, खाजा बागवान, शरद सुरोशे, तुकाराम मस्के, प्रकाश गिराम, सतीश लकडे, दिपक कापसे, गजानन मोरे, शंकरराव मुलगीर, भास्कर ढाले, साहेबराव मेटकर, राजू बावळे, दयानंद चट्टे, तुकाराम कवाने, दिलीप नरहरे, प्रवीण राठोड, शिवराज घुगे, वैजनाथ चांदीवाले, कुबेर गोरे, राजू जाधव, साहेबराव मस्के, दत्ता गोरे, देवानंद मुलगीर, दिलीप मिरटकर, प्रदीप मस्के, अनिल खांडेकर, प्रभू वडकुते, तुकाराम भूतनर, किसनबापू कोकरे, शिवाजी शिखरे, सिताराम लकडे, गंगाराम वैद्य, सतीश तांबारे, गजानन शिंदे, रवि जाधव, प्रकाश साखरे, पुंजाराव वाघमारे, दिनाची क्षीरसागर, गणपत सातव,शामराव फटींग, डॉ.देवराव गोरे, दत्ता तास्के, विलास लकडे, बालासाहेब वैद्य यांच्यासह कळमनुरी तालुक्यातील ओबीसी बांधवांच्यावतीने करण्यात येते.

# सुखदेवानंदमध्ये शिक्षक दिन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ सप्टेंबर**
जिजामाता बहुउद्देशी व सेवाभावी शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच ग्रामपंचायत भांडेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिनाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सुखदेवानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय भांडेगाव येथे कार्यरत असणारे सर्व अध्यापकांचा, कर्मचारी यांचा सत्कार करून सन्मान केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा जिजामाता बहुउद्देशी व सेवाभावी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तानाजीराव मुटकुळे, संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपराव चव्हाण, सरचिटणीस उत्तमराव जगताप, सहचिटणीस ग्यानदेवरावजी जगताप, शाळा समिती अध्यक्ष संतोषराव जगताप, संचालक प्रकाशराव निरगुडे, प्राचार्य गजानन वैद्य, उप प्राचार्य दत्तराव ढोबळे, भांडेगाव येथील सरपंच पार्वतीबाई इंगळे, उपसरपंच शिवप्रसाद जगताप आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरचिटणीस उत्तमराव जगताप व संचालक संतोषराव जगताप यांनी मानले.

# गोवंश हत्या प्रकरणातील आरोपींच्या पोलिसांनी आवळल्या मुसक्या!

**तभा वृत्तसेवा**
**जालना /प्रतिनिधी**

सोशल मीडियावर गायीची कत्तल करतानाचा व्हिडीओ व्हायरल झाल्याने खळबळ उडाली होती. या प्रकरणी फरार असलेल्या मुख्य आरोपीसह तिघांना अखेर सदर बाजार पोलिसांनी गुप्त कारवाई करून अटक केली आहे.



दिनांक ०१ सप्टेंबर २०२५ रोजी सोशल मीडियावर तीन इसम गोवंश जातीचे प्राणी कापतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला. या प्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात गु. र. नं. ७४५/२०२५ अन्वये कलम २९९, ३(५) बीएनएस सह कलम ५ (क), ९, ९ (अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी असलम महेमूद कुरेशी, रा. मंगळबाजार, जालना दोन अनोळखी इसम. गुन्हा दाखल झाल्यापासून हे सर्व आरोपी फरार होते.

फरार आरोपींच्या शोधासाठी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सदर बाजार पोलीस ठाणे व स्थागुशा जालना येथील वेगवेगळी चार पथके गठीत करून आरोपींचा शोध हैद्राबाद, खुलताबाद (छ. संभाजीनगर), मानवत, पाथरी (परभणी) अशा ठिकाणी राबविण्यात आला. तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे पथकाने आरोपींचा माग काढला आणि अखेर असलम कुरेशी (मुख्य आरोपी), सोफीयान शेख समद, रा. चमडाबाजार, जालना, यासीन रशीद कुरेशी, रा. राजणी, ता. घनसावंगी या आरोपींना ताब्यात घेतले. सदर आरोपींविरुद्ध नोंदवलेल्या गुन्ह्यात आता संघटित गुन्हेगारी व आयटी ॲक्टअंतर्गत अतिरिक्त कलमे लावण्यात आली असून पुढील तपास पोलिसांनी हाती घेतला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप भारती (सदर बाजार), स्थागुशा पोलीस निरीक्षक पंकज जाधव सपोनि उबाळे, पोउपनि शैलेश म्हस्के, पोउपनि सचिन सानप, पोउपनि संजय, पोहेकॉ धनाजी का. वळे, पोहेकॉ सुभाष पवार, शिवहरी गवई, जगन्नाथ जाधव, बाबा हरणे, नजीर पटेल, लक्ष्मीकांत आडेप, सतीश श्रीवास, प्रशांत लोखंडे, शारदा गायकवाड, भगवान मुंजाळ, दूर्गेश गोफणे, अजिम शेख, गणेश तेजनकर, राहूल कटकम, धंनजय लोढे, धीरज भोसले, तसेच चालक मोहन हिवाळे, कल्पेश पाटील, सद्दाम सय्यद आदींचा मोलाचा सहभाग होता. सदर आरोपींना न्यायालयात हजर करून पोलिस कोठडी मागितली जाणार असून या प्रकरणी अजून काही आरोपींचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### आत्महत्येचा बनाव पोलिसांनी आणला उघड

# बदनापूर तालुक्यात मुलीचा खून; वडिलांकडूनच गळा दाबून हत्या



**तभा वृत्तसंस्था**
**बदनापूर/प्रतिनिधी**

बदनापूर तालुक्यातील दावलवाडी येथे घडलेल्या एका धक्कादायक घटनेत वडिलांनी स्वतःच्या मुलीचा गळा दाबून खून केला असून प्रकरण आत्महत्या म्हणून दाखविण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

दि. ५ सप्टेंबर रोजी रात्री गस्तीदरम्यान पोलीस उपनिरीक्षक संतोष कुकलारे यांना माहिती मिळाली की, दावलवाडीतील हरी बाबुराव जोगदंड यांची मुलगी गळफास घेतला आहे. घटनास्थळी पोहोचून पाहणी केली असता आत्महत्या नसून घातपाताचा संशय निर्माण झाला. याबाबत पोलिस निरीक्षक एम. टी. सुरवसे यांनी तत्काळ तपास सुरू केला असता, मुलीचे एका मुलाशी प्रेमसंबंध होते. या प्रकरणामुळे झालेला अपमान सहन न झाल्याने वडिलांनीच स्वतःच्या मुलीचा गळा दाबून खून केल्याचे निष्पन्न झाले. खून लपवण्यासाठी मृतदेहाला लोखंडी अंगलाला दोरीने लटकवून आत्महत्येचा बनाव रचण्यात आला होता. प्राथमिक चौकशीदरम्यान मुलीचे वडील हरी बाबुराव जोगदंड यांनीच खून केल्याचे स्पष्ट झाले असून पोलिसांनी आरोपीस ताब्यात घेऊन बदनापूर पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास एपीआय करेवार मॅडम करत आहेत. ही कारवाई मा. पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अप्पर पोलिस अधीक्षक आयुष नोपानी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक एम. टी. सुरवसे व त्यांच्या पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली.

नेमलेल्या अधिकारी पथकात सपोनी स्नेहा कारेवांड, सपोनी अविनाश राठोड, पो. उप. नि. संतोष कुकलारे, पोक. आधार भिसे, दीपक कराढ, विकास घाडगे, पूनंसिंग गोलवाल, पो. का. एस. जे. तडवी, पिल्लेवाड, पो. कॉ. सानप यांचा समावेश होता.

## संक्षिप्त

### जगद्गुरु नरेंद्राचार्य यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराची मागणी

#### नरेंद्राचार्यजी यांच्या भक्तगनाचे आ.बबनराव लोणीकर यांना निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

परतूर विधानसभा मतदारसंघाचे माजी मंत्री आणि लोकप्रिय आमदार श्री. बबनराव लोणीकर यांना एक निवेदन सादर करण्यात आले आहे. या निवेदनात जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य, रामानंदाचार्य दक्षिणपीठ, नाणीजधाम यांना त्यांच्या सामाजिक आणि धार्मिक कार्यासाठी 'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्याची मागणी करण्यात आली आहे. हे निवेदन शिवदास हनवते, सोमनाथ सोनवणे, भगवानराव सरकटे, केशवराव येऊन, किशोर हनवते, अंबादास फुपाटे, धोंडीराम फुकाटे, भगवान राठोड, शत्रगुण जाधव, राजेश पवार, महादेव काळे, प्रवीण गारकर आणि सुनील ठोंबरे यांनी संयुक्तपणे सादर केले.

जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य हे वैष्णव पंथाचे प्रमुख आचार्य असून, त्यांनी हिंदू धर्माचे संवर्धन, समाजसुधारणा आणि समाजसेवेत मोलाचे योगदान दिले आहे. २०११ पासून 'ब्लड-इन-नीड' योजनेत हजारो युवक-युवतींनी २५,००० हून अधिक गरजूंना विनामूल्य रक्त पुरवले. ४ ते १९ जानेवारी २०२५ या कालावधीत १,३६,२७२ रक्त बाटल्या संकलित झाल्या. वेदांचे शिक्षण देऊन ४५० पुरोहित तयार केले असून, मुलींनाही पुरोहित प्रशिक्षण देण्याचे कार्य सुरू आहे. २००९ पासून विनामूल्य इंग्रजी माध्यमाच्या शाळा चालवून गोरगरीब मुलांना शिक्षण देत १००% निकालाची परंपरा कायम आहे. २०१० पासून ५३ ॲम्बुलन्सद्वारे २७,००० हून अधिक अपघातग्रस्तांचे प्राण वाचवले गेले. ५६,५३७ लोकांनी देहदानाचे अर्ज भरले, १३५ व्यक्तींचे देहदान आणि ५५ अवयवदान झाले. २०१४ पासून ७०० हून अधिक आदिवासी युवकांना मोटर ड्रायव्हिंग प्रशिक्षण देऊन स्वावलंबी बनवले. १,५२,००० कुटुंबांची घरवापसी, १५,४०० कुटुंबांचे विवाह संस्कार आणि ४-५ लाख युवकांना व्यसनमुक्तीचे कार्य केले. २०२३ पासून वृक्षलागवड, पाणी अडवा-पाणी जिरवा आणि नेट झिरो कार्यक्रम राबवले जात आहेत. महापूर, भूकंप, आग आणि कोरोनासारख्या संकटांमध्ये अन्न, औषधे, कपडे आणि कोट्यवधी रुपयांची आर्थिक मदत पुरवली. या कार्यांमुळे त्यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्याची मागणी लाखो अनुयायांनी केली आहे. निवेदनकर्त्यांनी आ.बबनराव लोणीकर यांच्याकडे सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

### ईद-ए-मिलाद निमित्त रक्तदान शिबिर; मुस्लिम युवकांसह हिंदू युवकांचाही पुढाकार



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन शहरात शुक्रवारी जश्ने ईद-ए-मिलाद-उन- नबी निमित्ताने टिपू सुलतान चौक आयशा फंक्शन हॉल येथे मुस्लिम लोकां तर्फे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी मोठ्या संख्येने हिंदू ,मुस्लिम तरुणांनी रक्तदान करीत विक्रम स्थापित केला.यावेळी रक्तदान करण्याऱ्या रक्तदात्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.तर रक्तदानामुळे अनेकांचे प्राण वाचतात,म्हणून वर्षातून किमान एकदा तरी प्रत्येकाने रक्तदान करण्याचा संकल्प करावा असे आयोजकांनी आवाहन करीत या भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते असे सांगितले.

शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे यात हिंदू मुस्लिम युवकांनी पुढाकारघेत मानवतेच्या सेवेसाठी पुढाकार घेतला. शिबिराचे उद्घाटन पोलीस निरिक्षक किरण बिडवे यांच्या हस्ते करण्यात आले.तर प्रमुख पाहुणे काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमूख ,शफिक पठाण, शमीम मिर्झा,अब्दुल कदीर (बापू) नसीम पठाण, नूझेरशाह,प्रा.नईम कादरी, साहेबराव झोरे, इरफान सिद्दकी, हाफिज रिझवान,शामराव दांडगे, शेख जावेद, शेख साहेब, गुड्डू कादरी, करीम कादरी, रिझवान बेग, जुनेद कादरी, रमेश जाधव, मधुकर सहाणे, अनिल पगारे, सय्यद आरेफ, विलास शिंदे, भाऊसाहेब राऊत,विलास देवरे,पत्रकार सलीम शेख आदी उपस्थित होते.तर शिबिर यशस्वीतेसाठी अमान खान,शाकेर शेख, शाहेद शेख यांनी परिश्रम घेतले.

### येत्या हैदराबाद मुक्ती संग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर

# राज्य मंत्रिमंडळाची दोन दिवसांची बैठक छ.संभाजी नगर येथे आयोजित करण्यात यावी -लाखे पाटील

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

हैदराबाद मुक्ती संग्रामाच्या अमृतमहोत्सवी वर्षातील वांझोट्या बैठकीनंतर दोन/तिन वर्षांपासून न झालेली राज्य मंत्रिमंडळाची बैठक १६/१७ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित करून मराठवाड्याच्या विकासाचे प्रलंबित विविध प्रश्न आणि त्यासाठी निधी यासंबंधी निर्णय व्हायला पाहिजेत अशी आग्रही मागणी मराठवाडा अनुशेष निर्मुलन आणि विकास मंचचे संस्थापक अध्यक्ष डॉ संजय लाखेपाटील आणि पदाधिकारी यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. देवेंद्र फडणवीस व मुख्य सचिव यांच्याकडे ई-मेल/निवेदनाद्वारे केली आहे.

यासंदर्भात अधिक माहिती देतांना डॉ. संजय लाखेपाटील यांनी सांगितले की, विदर्भ हा नागपूर कराराने मराठी भाषिक महाराष्ट्र राज्यात सामिल झाला आणि त्या नागपूर करारातील एका कलमान्वये दरवष नागपूर येथे राज्य विधिमंडळाचे अधिवेशन घेऊन विदर्भाच्या प्रश्नांची तड लावण्यासाठी तरतूद आहे आणि त्यानुसार दरवष नागपूर येथे साधारण तिन आठवड्याचे हिवाळी अधिवेशनात आयोजित केले जाते, परंतु दुर्दैवाने तत्कालीन मराठवाड्याच्या नेतृत्वाला भविष्यकाळीन आव्हानांचा अंदाज न आल्यामुळे अतिशय मोकळ्या मनाने त्यांनी विना अट मराठी भाषिक महाराष्ट्र राज्यात सामिल होण्याचा निर्णय केला आणि तत्कालीन मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांनी विनाकरार महाराष्ट्रात सामील मराठवाड्यावर अन्याय होऊ दिला जाणार नाही; नव्हे आम्ही त्यांना अधिकचे देऊ असा शब्द व बांधिलकी महाराष्ट्र विधानमंडळाच्या पहिल्या अधिवेशनात १ मे १९६० रोजी घालून घेतली. परंतु दुर्दैवाने हा शब्द नंतरच्या नेतृत्वाने पाळला नाही आणि राज्याच्या वैधानिक तिन विभागांमधे विकासापासून, विकासाच्या प्रत्येक संधीपासून दूर फेकला गेला. एव्हढे की कै. गोविंदभाई श्रॉफ यांच्या नेतृत्वाखालील जनरेट्यामधून छत्रपती संभाजीनगर येथे हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या पार्श्वभूमीवर होणारी मंत्रीमंडळाच्या बैठकाही कैक वर्षे घेतल्या जात नाहीत आणि मराठवाड्याच्या विकासावर



चर्चा/तोडगा निघत नाही! हैदराबाद मुक्ती संग्रामाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त झालेल्या बैठकीनंतर अद्याप बैठक झाली नाही यावष तरी ती झाली पाहिजे ही मराठवाड्यातील जनतेची आग्रही मागणी असून राज्यातील नेतृत्वाने या मागणीचा गंभीरपणे आणि कर्तव्याच्या भावनेतून विचार करावा अशी मागणी डॉ. संजय लाखेपाटील यांनी मराठवाड्यातील जनतेच्या वतीने केली असून येत्या १७ सप्टेंबर या हैदराबाद मुक्ती संग्राम दिनी राज्यसरकारने मंत्रीमंडळाची बैठक छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित केली नाही तर जालन्यासह ठिकठिकाणी हुतात्मा स्मारका समोर लाक्षणीक उपोषण केले जातील आणि त्यासाठी मराठवाड्यातील विविध सामाजिक, विकास प्रिय संघटना, राजकीय पक्ष यांना सहभागी होण्यासाठी संपर्क साधून आवाहन केले जात असून स्थानिक आमदार अर्जुनराव खोतकर यांनी यासाठी पुढाकार घ्यावा अशी जाहीर विनंती केल्याची माहिती डॉ. संजय लाखेपाटील आणि सहकारी यांनी दिली आहे.

# लांडग्याचा शेळ्यांवर हल्लया, ५ ठार; लाखो रूपायचे नुकसान



**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

लांडग्यांने केलेल्या हल्लयात पाच शेळ्या ठार झाल्याची घटना रविवारी पहाटेच्या सुमारास जाफराबाद तालुक्यातील अकोला देव येथे घडली.अकोला देव शिवारातील रविवारी सकाळी लंडग्याच्या कळपाने गोठ्यात शिरून पाच शेळ्यांचे लचके तोडून ठार केले याबाबत शेतकरी विठ्ठल कदम यांनी जिल्हा परिषद सदस्य दत्तू पंडित यांच्यामार्फत वनविभागाशी संपर्क साधला असता वनविभागाच्या अधिकाऱ्याने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. या संदर्भात सविस्तर माहिती अशी की अकोला देव येथील विठ्ठल कदम हे अल्पभूधारक शेतकरी असून ते शेती सोबत गेल्या अनेक दिवसांपासून शेळीपालन करतात. शनिवारी रात्री ते नेहमीप्रमाणे शेळ्यांना गोठ्यात बांधून घरी गेले.रविवारी सकाळी शेतात गेले असतांना त्यांना गोठ्यातील शेळ्यांवर लांडग्याच्या कळपाने हल्ला केल्याचे दिसताच त्यांनी आरडाओरडा करून लाडग्यांना हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला मात्र तो पर्यंत या कळपाने ५ बकऱ्याचे लचके तोडून ठार केले होते. या बाबतीत वनविभागाच्या अधिकाऱ्यांकडून घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा केला. गरीब व अल्पभूधारक शेतकरी विठ्ठल कदम यांनी मला घटलेली घटनेची माहिती देताच मी या वन परिमंडळ अधिकारी श्री योगेश डोमळे यांच्याशी तातडीने संपर्क साधत अधिकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला .या शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे. या बाबतीत आमदार संतोष दानवे यांच्या माध्यमातून संबंधित पीडित शेतकऱ्यांला पूर्णपणे नुकसान भरपाई मिळवून देणार असल्याचे माजी जिल्हा परिषद सदस्य दत्तू पंडित यांनी यावेळी सांगितले

## डोल्हारा येथे गणपती उत्सवात कीर्तनाचे आयोजन; माणसाच्या शक्ती पेक्षा युक्ती श्रेष्ठ -हभप कु.श्रुतिका काळबांडे

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**



बौद्धिक बळ असणारे शारीरिक बळ असणाऱ्या माणसावर अधिकार गाजवत असतात. त्यामुळे माणसाच्या शक्ती पेक्षा युक्ती श्रेष्ठ असल्याचे प्रतिपादन हभप कु. श्रुतिका काळबांडे, राधामाधव वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थिनीनी केले. त्या डोल्हारा येथे गणेश उत्सवात कीर्तन प्रसंगी बोलत होत्या. यावेळी पुढे बोलताना म्हटले आहे की रोजगार हमीच्या कामावर जाणारा मजूर दिवसभर काम करून दोनशे रुपये कमावत असतो. त्यांची देखरेख करणाऱ्यांना पाचशे हजार रुपये रोज कमवत असतो. हे बुद्धीबळ आहे. माणसाच्या आजच्या सामान्य व्यवहारात बळाचे काही प्रकार सांगितले आहे त्यात शारीरिक बळ, बौद्धिक बळ, आर्थिक बळ, आणि सत्तेचे बळ, आजच्या काळात ज्याचे शरीर चांगलं त्याचे मन चांगलं, त्याचे मन चांगले त्याची बुद्धी चांगली, ज्याची बुद्धी चांगली त्याचे विचार चांगले. ज्याचे विचार चांगले तोच संप्रदायात कीर्तनात येतो. कीर्तनाला येण्यासाठी चांगले विचार पाहिजेत. चांगले विचार चांगल्या बुद्धीमध्ये येतात. चांगली बुद्धी चांगल्या मनामध्ये वास करते. चांगल असावं वाटत असेल तर काहीही सेवन करू नका. काहींनी शरीराचे गोडाऊन करून टाकले आहे. मांसाहार काय माणसाचा आहार नाही. मांसाहार कोणते प्राणी करतात. जे जीभेने पाणी पितात आणि ज्याचे दात सूळ्या सारखे आहेत. त्यांनाच मांसाहार करण्याचा अधिकार आहे. माणसाने जेवण हे औषधा सारखे घ्यावे. नाहीतर औषध जेवणारखे घ्यावे लागतील. जेवत असताना माणसाने शरीराचे चार भाग करावे. दोन भाग जेवण एक भाग पाणी आणि एक भाग श्वास साठी रिकामा ठेवावा. असे उदगार कीर्तन प्रसंगी हभप श्रुतिकाताई काळबांडे यांनी काढले. यावेळी कीर्तन प्रसंगी हभप रामेश्वर महाराज सवने यांच्यासह राधामाधव वारकरी शिक्षण संस्थेतील मुलींनी कीर्तनात साथ दिली. यावेळी कीर्तनाला डोल्हारा ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## जालन्यातील नागरीकांचे आरोग्य चांगले रहावे, बप्पाकडे आ.अर्जुनराव खोतकर यांचे साकडे

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



आमदार अर्जुन खोतकर यांच्या हस्ते महानगरपालिकेतील गणपतीची आरती करण्यात आली आहे जालना शहराबरोबर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचा आरोग्य चांगले राहावे अशी प्रार्थना जालनाचे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी गणपती बाप्पाकडे केली आहे जालना महानगरपालिकेत महाप्रसादाचा आयोजन करण्यात आले होते या आयोजनात आमदार अर्जुन खोतकर यांनी देखील भेट दिली आहे यावेळी शिवसेना शहर प्रमुख विष्णू भाऊ पाचफुले पंडित भुतेकर विनायक महाराज फुलंब्रीकर जालना महानगरपालिकेचे अधिक्षक विजय महाराज फुलंब्रीकर श्रीमंत संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप साबळे महानगरपालिकेचे प्रमुख पंडित पवार , ,सावता जरासे, आगळे सोनू, जैस्वाल,संजय भालेराव,मोहन जामदार यास कार्यकर्ते व महानगरपालिकेची कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# मंठा येथील जयभवानी गणेश मंडळाचा विसर्जन सोहळा पाहण्यासाठी नागरिकांची प्रचंड गर्दी

### महाकाल अघोरी तांडव नृत्य, ढोल - ताशा पथक, अश्वनृत्य नजराणा मंठेकरांचे विशेष आकर्षण





**» जय श्रीराम गणेश मंडळांनी मंठेकरांना केले मंत्रमुग्ध अघोरी बाबांचे भरम उधळत तांडव नृत्य!**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंठा शहरात जय श्रीराम गणेश मंडळाच्या भव्य मिरवणुकीत अघोरी बाबांनी केलेले तुफानी तांडव नृत्य पाहून नागरिक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. ढोल-ताशांच्या गजरात, फटाक्यांच्या रोषणाईत, गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात बाबांचे थरारक नृत्य सुरू होताच पाहणाऱ्यांची उत्साहाची उंची गाठली.अघोरी बाबांनी भरम उधळत केलेल्या या तांडव नृत्याने संपूर्ण शहराला थरारून सोडले, तर मंडळाच्या आकर्षक देखाव्यांनी व सजावटींनी वातावरण अधिकच भक्तिमय केले.या अनोख्या सादरीकरणामुळे गणेशभक्तांना अविस्मरणीय अनुभव लाभला.

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

शिवसेना जिल्हाप्रमुख ए.जे. पाटील बोराडे संस्थापक अध्यक्ष असलेल्या मंठा येथील शिवसेना पुरस्कृत जयभवानी गणेश मंडळाचा विसर्जन सोहळा पाहण्यासाठी नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती. संगमनेर येथील हिंदुराजा महाकाल अघोरी टीमच्या अघोरी तांडव नृत्य, भस्म शो आणि ढोल पथकाने मंठेकरांना आकर्षित केले.

गणरायाच्या विसर्जन मिरवणुकीत पारंपारिक कला, संस्कृती सातत्याने जोपासली जाते. या गणेश मंडळाचे ४० वे वर्ष असून जिल्हाप्रमुख ए.जे.पाटील बोराडे आणि तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षी मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग बोराडे आणि पदाधिकाऱ्यांच्या पुढाकारातून यावर्षी विसर्जन मिरवणुकीच्या सुरुवातीला संगमनेर येथील हिंदुराजा महाकाल आघोरी टीमने महादेवाची अघोरी पद्धतीने पूजा केली. या मिरवणुकीतील भव्य महानंदी पाहण्यासाठी प्रचंड गर्दी झाली होती. नागरिक रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून आगीचे प्रात्यक्षिक, भस्म शो, हॉरर शो पाहत होते. ढोल - ताशा पथक, अश्वनृत्याने मंठेकरांचे लक्ष वेधले.

डीजेमुळे गणेश भक्तांचा उत्साह ओसंडून वाहत होता. जिल्हाप्रमुख ए.जे.पाटील बोराडे, तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांना गणेशभक्तांनी डीजेच्या तालावर नाचायला भाग पाडले. दुपारी तीन वाजता गणरायाच्या आरतीनंतर छत्रपती संभाजी चौक येथून मिरवणुकीला सुरुवात झाली. गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया असा जयघोष आणि गुलालाची उधळण करीत ही मिरवणूक मुख्य रस्त्याने बस स्टॅन्ड,डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून गावातून वाजत गाजत आल्यानंतर गणरायाचे शांततेत विसर्जन करण्यात आले.




नांदेड- गणपती बाप्पा मोरया मंगलमूर्ती मोरया, पुढच्या वर्षी लवकर या घोषणा देत शहरासह परीसरात श्री गणेशाचे विसर्जन उत्साहात व शांततेत करण्यात आले. गणेश भक्तांसाठी ठिकठीकाणी अन्नदान करण्यात आजे तर पोलिसांचाही तगडा बंदोबस्त तैनात होता.

## संक्षिप्त वृत्त



### मुदखेड तालुक्यातील समस्त ओबीसी समाज बांधवांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**मुदखेड** -तालुक्यातील सकल ओबीसी समाजातर्फे सरकारने काढलेल्या जी.आर विरोधात तहसील कार्यालय मुदखेड यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले व शासनाने काढलेल्या जी.आर चा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. हा शासन निर्णय पूर्णपणे अन्यायकारक,बेकायदेशीर व असंवैधानिक आहे.या निर्णयामुळे ओबीसी समाजातील सुमारे ४०० हून अधिक जातींच्या हक्कांवर गदा येणार असूनजी.आर मुळे ओबीसीच्या आरक्षणात घुसखोरी होणार असल्याचा आरोप निवेदनात नमूद करण्यात आला आहे.आपण जो जी.आर काढला आहे तो त्वरित रद्द करावा,अशी मागणी मुख्यमंत्र्यांना निवेदनाद्वारे केली. यावेळी लक्ष्मण देवदे, माजी नगरसेवक कैलास गोडसे,गोविंद गोपनपल्ले, संजय आऊलवार, करीमखा साहब,चांदू चमकुरे,भाजपा शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण, प्रकाश बल्फेवाड, पापाराव चव्हाण,पंकज पचलिंग,भगवान पानेवार, भीमराव महादवाड, प्रभाकर चंद्रे, कानोबा बिस्मिल्ले, योगेश खांडरे, कालिदास जंगीलवाड, गोविंद गुडमवार, विठ्ठल आचार्य,सचिन चंद्रे, माधव मेटकर,राहुल चव्हाण, राकेश हेमके,मारुती पानेवार,गजानन बोडके, माधव बोडके,संभाजी हामंद,गोविंद खांडरे, आकाश हामंद, हैबती संबोड,संतोष हामंद पत्रकार ईश्वर पिनलवार, रुखमाजी शिंदे, संतोष सावंत, अब्दुल रजाक यासह आदींची उपस्थिती होती.

# प्रशासनाच्या सुयोग्य नियोजनामुळे गणेश विसर्जन मिरवणूक उत्साहात



**तभा वृतसेवा**
**किनवट , दि. ७ सप्टेबर-**

शहरातील गणेश विसर्जन मिरवणूक प्रशासनाच्या सुयोग्य नियोजनामुळे शांततेत आणि उत्साहात पार पडली. मानाच्या तसेच घरगुती गणपतींचे विसर्जन रात्री बारा वाजेपर्यंत पूर्ण करण्यात आले. नगर परिषद किनवटतर्फे यंदा विसर्जनासाठी भव्य तयारी करण्यात आली होती.

जुनी नगर परिषद परिसरासमोर शांतता समितीचे सदस्य, ज्येष्ठ नागरिक, माजी नगराध्यक्ष, विविध पदाधिकारी उपस्थित होते. पोलिस उपविभागीय अधिकारी रामकृष्ण मळघणे, नगरपरिषद मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे यांनी स्वतः विसर्जन मिरवणुकीवर लक्ष ठेवत गणेश मंडळांचे स्वागत केले. पैनगंगा नदीच्या तिरावर विसर्जनासाठी चोख व्यवस्था करण्यात आली होती. विद्युत रोषणाई, सुरक्षेच्या दृष्टीने काटेकोर नियोजन, तसेच जिवनरक्षक दल, गृहरक्षक दल व पोलीस यंत्रणा अलर्ट मोडवर तैनात होती. पोलिस निरीक्षक देविदास चोपडे, उपनिरीक्षक सागर झाडे यांच्यासह संपूर्ण पोलिस कर्मचारी वर्ग दक्षतेने कार्यरत होता.

शहरातील गणेश मंडळांनी आकर्षक विद्युत रोषणाई, विविध फुलांची सजावट, पारंपरिक वाद्य यांच्या माध्यमातून विसर्जन सोहळा रंगतदार केला. मोठ्या प्रमाणात अन्नदान उपक्रम आयोजित करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी चौकात पवार गुरु स्वामी व श्री जोनपेल्लीवार यांच्या संयुक्त विद्यमाने गणेश भक्तांना भोजनदान करण्यात आले, ज्यात हजारो भाविकांनी सहभागी होऊन प्रसादाचा लाभ घेतला. यावेळी राम नगर गणेश मंडळाने अनोखा प्रयोग सादर केला. मंडळाच्या गणेशमूर्तीवर तब्बल दहा दिवस राहण्यासाठी प्रशिक्षित कबुतर ठेवण्यात आले होते. हा जिवंत देखावा सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. तसेच आदिवासी ठेमसा नृत्यपथकाचे सादरीकरण विसर्जन मिरवणुकीत विशेष आकर्षण ठरले.

सेवादास गणेश मंडळाचे ढोल-ताशा पथक, अभय महाजन यांच्या नेतृत्वाखाली, वादनाने विसर्जन मिरवणुकीत दणदणीत उत्साह निर्माण केला. वंदेमातरम गणेश मंडळाने भव्यतेचा प्रत्यय दिला, तर मातंगेश्वर गणेश मंडळाने सामाजिक जाणीव जागवणारा वेगळा आदर्श ठेवून यंदा गणेश भक्तांना विशेष आकर्षित केले. शिस्तबद्ध मिरवणूक, प्रशासनाची चोख व्यवस्था, मंडळांची भक्तिभावपूर्ण मांडणी आणि नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे किनवटातील यंदाचा गणेश विसर्जन सोहळा संस्मरणीय ठरला.

**NAME CHANGE**

I, LAL ARUN SHYAM S/O SK Lal, R/O Bhau Patil Road, Near Pune IT Park, B-402, Mantri Kinara Bhau Patil Road Bopodi, Pune City, Range Hills, Pune, Maharashtra, PIN-411020, have changed my name to ARUN LAL.

**नावात बदल**

मी, लाल अरुण श्याम पि.एसके लाल, रा. भाऊ पाटील रोड पुणे आयटी पार्क जवळ बी-४०२, मंत्री त्तपदंतं बोपोडी, पुणे शहर, रेंज हिल्स पुणे, महाराष्ट्रा-४११०२० नावात बदल अरुण लाल असा बदल करत आहे.

# भजन,टाळ , मृदंग,ढोलकीच्या तालावर गणपती बाप्पाला निरोप

**तभा वृतसेवा**
**नरसी , दि. ७ सप्टेबर-**

दि.६ सप्टेंबर रोजी शनिवारी गणपती बाप्पा मोरया मंगलमूर्ती मोरया, पुढच्या वर्षी लवकर या! गणपती चाला गावाला, चैन पडेना जिवाला, आशा घोषणा देत भजन , टाळ, मृदंग व ढोलकी, बॅन्ड,ताशाच्या तालावर नायगाव तालुक्यातील नायगाव, नरसी , कुंटूर, मांजरम, बरबडा येथील सर्व गणेश भक्तांनी गणपती बाप्पाला जड अंतः करणाने निरोप दिला. यावेळी पर्यावरणाच्या हितासाठी आणि सर्व सामान्य माणसाला आरोग्याचे नुकसान होऊ नये म्हणून डिजे व लेझर लाईटच्या वापरावर जिल्हाधिकारी राहुल कर्डीले व जिल्हा पोलिस अधीक्षक अभिनाश कुमार यांनी कायद्यांनी बंदी आणली, तसेच सर्व ठाण्यातील पोलिस प्रमुखांना कुणी डीजे लावण्याचा प्रयत्न केला तर डीजेवर कार्यवाही करण्याचे आदेश देऊन पारंपारिक वाद्य वाजवण्यास सांगितले या नियमांचे काटेकोर पालन करत सर्व गणेश मंडळांनी पारंपरिक पद्धतीने फुलांनी सजविण्यात आलेल्या ट्रॅक्टरवर गुलाल व फुलांची उधळण करत ढोल ताशांचा गजर, टाळ मृदंग वाजवत गणपती बाप्पा मोरया, मंगल मूर्ती मोरया आशा घोषणा देत, भजन गात, गणपती ची मिरवणूक काढण्यात आली होती.

यावेळी तालुक्यातील सार्वजनिक गणेश मंडळ, नरसीतील बजरंग गणेश मंडळ, लंबोदर गणेश मंडळ, बुरूड गल्लीचा राजा मंडळ, जय मल्हार गणेश मंडळ, विघ्नहर्ता गणेश मंडळ,बाल गणेश मंडळासह सर्व गणेश मंडळांनी श्रींच्या मूर्ती चे भव्यदिव्य मिरूनूका काढण्यात आल्या होत्या, यावेळी लहान, मोठे गणेश भक्तांनी भगवी टोपी, भगवा रूमाल,पांढरी टोपी, पांढरी धोती,



कापड घातलेले हजारो गणेश भक्तांमूळे नायगाव तालुका भगवमय झालं होतं,

यामध्ये पोलिस प्रशासन, महसूल विभाग, नगरपंचायत, महावितरण कार्यालयानी आप आपली कामगिरी पार पाडली. यावेळी नायगाव, कुंटूर, रामतीर्थ पोलीस ठाण्याच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवला होता.

**भारतीय जनता पक्षाच्या वतीने गणेश मंडळाच्या अध्यक्षांचा सन्मान**

अनंत चतुर्दशी निमित्त गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीत नरसी शहरात भक्तांची मोठी गर्दी पाहायला मिळते. या निमित्ताने नरसीतील गणेश मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष सह सर्व पदाधिकारी यांचा नायगाव पंचायत समितीचे माजी सभापती तथा भारतीय जनता पक्षाचे नेते श्रावण पाटील भिलवंडे यांच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी पोलीस पाटील इब्राहिम बेग पटेल, गजानन भिलवंडे, गंगाधर वडगावे, साईनाथ अकमवाड, उपसरपंच अलीम पटेल, बालाजी चिंतावार, हनुमंत मिसे, त्र्यंबक डाके, मारुती बुके, रमेश वासरे,सह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी भाजपच्या वतीने गणेश भक्तांसाठी खास करून करमणुकीसाठी भक्तीमय अशा गीतांचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. या कार्यक्रमाला गणेश भक्तांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.

# सिडको- हडकोत उत्साहात श्रीचे विसर्जन

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ७ सप्टेबर-**

सिडको हडको परिसरातील गणरायाचे मिरवणूक ही डीजे मुक्त पारंपारिक ढोल-ताशाच्या गजरात सिडकोच्या मुख्य रस्त्याने मिरवणूक काढण्यात आली्.यावेळी सामाजिक कार्यकर्ते सम्राट आढाव यांनी सदरील मिरवणुकीतील सार्वजनिक गणेश मंडळाचे पदाधिकारी यांना सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

सिडको हडको परिसरातील गणरायाचे विसर्जन डीजे मुक्त पारंपारिक ढोल-ताशाच्या वाद्यांच्या तालावर मोठ्या उत्साहात विसर्जन करण्यात आले. गणरायाच्या मिरवणुकी दरम्यान सिडको हडकोच्या मुख्य रस्त्यांनी अन्नदात्यांनी मोठ्या प्रमाणात अन्नदान व फळे वाटप करण्यात आले. तर मिरवणुका मोठ्या उत्साहात पहावयास आलेले गणेश भक्त उत्साहात नृत्यकरत होते. यादरम्यान मोठ्या मूर्ती रस्त्यावरून जाताना दोन तास वीज पुरवठा खंडित करण्यात आली. गणेश भक्त अंधारत झाल्यामुळे परतीच्या वाटेला लागले वीजे अभावी गणेश भक्तांनी नाराजी व्यक्त केली. सिडको हडपोत बऱ्याच वर्षापासून गणेश मंडळाच्या सन्मान करण्याचा उपक्रमास



विसर पडला होता. हे बाब लक्षात घेऊन सिडको हडकोतील सामाजिक कार्यकर्ते सम्राट आढाव यांनी सार्वजनिक गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान चिन्ह देऊन सन्मान करण्याच्या उपक्रमाची सुरुवात ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांना सन्मानित करून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. झरी येथील विसर्जन घाटावर विसर्जन स्थळावरही मोठा बंदोबस्त व नियोजन आत्मक विसर्जन पूर्ण करण्यात आले. यावेळी विसर्जन स्थळी मनापाचे गिरीश कदम, संधु महाराज, गाढवी नितीन, सुनकेवार निलेश, मिर्झा बेग, सुजलेगावकर नरेंद्र, विलास गजभारे, अर्जुन बागडे, विठ्ठल आंबटवार, जिया उद्दीन, संजय गीते,रूपेश सरोदे, जयराम सूर्यवंशी, किरण सूर्यवंशी, अमोल लांडगे यांच्यासह ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी सचिन कडवे यांनी कडे कोट पोलीस बंदोबस्तात श्रीचे विसर्जन केले यावेळी कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही.

# पत्रकार दयानंद कदम यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ७ सप्टेबर-**



शहरातील गौतम नगर येथील रहिवाशी जेष्ठ पत्रकार दयानंद धोंडीबा कदम वय वर्षे ५७ यांचे ७ सप्टेंबर सकाळी नऊ वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले त्यांच्यावर ७ सप्टेंबर रोजी सायंकाळी चार वाजता हदगाव समशान भूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या जाण्याने पत्रकार क्षेत्रातील पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या लेखणीने गोरगरीब कष्टकरी शेतकरी यांना न्याय देण्याचे काम केले त्यांच्या पश्चात पत्नी चार मुली नातवंड असा मोठा परिवार आहे.

# श्री. सुभाष शुगर,शिऊर साखर कारखान्याचा बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा उत्साहात



**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ७ सप्टेबर-**

श्री. सुभाष शुगर प्रा.लि. हडसणी ता. हदगाव जि. नांदेड व शिऊर साखर कारखाना लि. वाकोडी ता.कळमनुरी जि. हिंगोली यांचा सातवा बॉयलर अग्नीप्रदीपन सोहळा तसेच शिऊर इको प्रा. लि. वाकोडी येथे १६ टी. पी. डी. बायो सीएनजी प्रकल्पाचे भूमिपूजन दोन्ही कारखान्याचे चेअरमन सुभाषराव लालासाहेब देशमुख यांच्या हस्ते दि.५ सप्टेंबर रोजी मोठ्या थाटात उत्साहाच्या वातावरणात पार पडले.

हदगाव - हिमायतनगर, उमरखेड , महागाव सह हिंगोली जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकरी बांधवांच्या कामधेनू ठरलेल्या श्री.सुभाष शुगर व शिऊर साखर कारखान्याच्या यशात आणखीन एक मानाचा तुरा शिऊर इको प्रायव्हेट लिमिटेड वाकोडीच्या रूपाने रोवला गेला असून दोन्ही कारखान्याचे अग्नी प्रदीपन सोहळ्याचे औचित्य साधून शिऊर इथे १६ टी. पी.डी. बायो सीएनजी प्रकल्पाचे दोन्ही कारखान्याचे चेअरमन श्री. सुभाषराव लालासाहेब देशमुख यांच्या हस्ते भूमिपूजन उत्साहाच्या वातावरणात पार पडले . शिऊर साखर कारखाना लि.वाकोडी येथे विकास विनायकराव देशमुख ( केनियाड सुपरवायझर) व त्यांच्या सुविद्य पत्नी तर श्री सुभाष शुगर प्रा.लि. हदगाव येथे जयजित निलंगेकर व त्यांच्या सुविद्य पत्नी यांच्या हस्ते श्री. सुभाषराव लालासाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनात अग्नी प्रदीपन सोहळा पार पडला .यावेळी त्यांच्या समवेत संचालक यशवंतराव देशमुख, श्री पतंगे, श्री सोमप्पा, राजेश मानधना, कराळे, किशोर वानखेडे, जाधव तसेच खातेप्रमुख, उपखाते प्रमुख ,विभाग प्रमुख, अधिकारी ,कर्मचारी, कामगारवर्ग यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमास शिऊर इको प्रा. लि. चे सर्व संचालक मंडळ तसेच सुशीलकुमार देशमुख ( कार्यकारी संचालक - शिऊर साखर कारखाना, श्री सुभाष शुगर प्रा.लि.व प्रसाद शुगर अँड ऍग्रो प्रॉडक्ट ) यांचे मार्गदर्शन लाभले.

**मुदखेड- मुदखेड पोलिसांच्या कारवाईत तीन जबरी चोरी करणाऱ्यांना अटक करण्यात आली असुन त्यांच्याकडून १ लाख ३५ हजार ५६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक धिरज चव्हाण, पोउपनि आकाश सरोदे यांच्या पथकाने केली.**



# धनोडा येथील जुना पूल धोकादायक ; प्रवासी भाविकांचा जीव टांगणीला !

**तभा वृतसेवा**
**माहूर , दि. ७ सप्टेबर-**

धनोडा येथील पैनगंगा नदी वर नवीन बांधकाम करण्यात आलेल्या पुलाच्या दोन्ही बाजूचा रस्ता तयार करून तो पुलास जोडून नवीन पुलावरून वाहतूक सुरू करण्याऐवजी गेली तीन चार वर्षांपासून जुन्याच जीर्ण झालेल्या धोकादायक पुलावरून वाहतूक सुरू ठेवून प्रवाशांचे जीव धोक्यात घालून संबंधित प्रशासन मात्र कमालीचे मौन बाळगत असल्याने वाहनचालक व प्रवाशांमधून प्रचंड रोष व्यक्त केला जात आहे. २२ सप्टेंबर पासून माहूरगडावरील शारदीय नवरात्रौत्सवाला प्रारंभ होत असून,यात्रा काळातील लाखो भाविकांचा जीव टांगणीला लागला असल्याने जुन्या धोकादायक पुलावरून वाहतूक बंद करून नवरात्रोत्सव यात्रेपूर्वी नवीन पुलावरून वाहतूक सुरू करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते केशव भगत यांनी केली आहे.

मराठवाडा आणि विदर्भ या विभागाच्या सीमा जोडणाऱ्या (केरोळीशेकापूरधनोडा) येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१अ वरील पैनगंगा नदी वरील जुना पूल अक्षरशः शेवटची घटका मोजत कधीही कोसळण्याच्या धोकादायक अवस्थेत कसाबसा तग धरून औटघटकेच्या उंबरठ्यावर उभा आहे. पुलाचा पाया खचला असून, पुलाच्या दोन्ही बाजूचे संरक्षक कठडे तुटून काही वाहून गेले तर काही चोरट्यांनी गायब केल्याने अपघात झाल्यास वाहने सरळ नदीच्या पात्रात कोसळतायेत, एकंदरीत ब्रिटीश कालीन पुलाच्या बांधकामाची संरचना डळमळीत झाली असून, गत महिन्यात आठवड्याभरात दोन वेळा पैनगंगेला आलेल्या पुरामुळे या पुलाची अवस्था जागोजागी खड्डे पडून अतिशय खिळखिळ झाली आहे.हा पूल कोणत्याही क्षणी कोसळून मोठी दुर्घटना घडून या पुलावरून प्रवास करणाऱ्या अनेकांच्या जीवाची पैनगंगेत जलसमाधी होण्याची दाट शक्यता वर्तविण्यात येत आहे. तरीसुद्धा संबंधित विभागाचे अधिकारी आणि ठेकेदार नवीन पुलावरून वाहतूक सुरू करण्याऐवजी जुन्याच धोकादायक पुलावरून वाहतूक सुरू ठेवून कमालीचे मौन बाळगत असल्याने या बेजबाबदार प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर नागरिक प्रश्न उपस्थित करत आहेत.

माहूर हे तिर्थक्षेत्र दक्षिणेचे शक्तिपीठ म्हणून ओळखले जाते. दररोज हजारो भाविक रेणुका देवीच्या दर्शनासाठी या मार्गाने प्रवास करतात. दहा दिवस चालणाऱ्या नवरात्रोत्सव यात्रा काळात लाखोंच्या



संख्येने गर्दी होते. मात्र धनोडा गावातील हा जीर्ण पूल भाविकांसाठी मृत्यूचा सापळा बनला आहे. वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत धरून पूल ओलांडावा लागतो. दोन मोठी वाहने समोरासमोर आली तर तो प्रसंग भयानक भीतीदायक ठरतो. अनेक वाहनांचे अपघात होऊन वाहने सरळ नदीच्या पात्रात कोसळतायेत. या पुलावरून जाणाऱ्या लाखो भाविकांच्या जीवाची किंमत प्रशासनाला नाही का? असा प्रश्न भाविक प्रवाशांमधून विचारला जातोय.

विशेष संतापजनक बाब म्हणजे राष्ट्रीय महामार्गावरील धनोडा येथील पैनगंगा नदी वर जुन्या पुलाच्या वरच्या बाजूला नवीन उंच पूल बांधून पूर्ण झालेला आहे. मात्र, मराठवाडा आणि विदर्भ या भागाला जोडणाऱ्या या पुलाच्या दोन्ही बाजूचे रस्ते पुलास अद्याप पर्यंत जोडण्यात आले नसल्याने आजवर तो नवीन पुल वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेला नाही. याकडे केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री ना. नितीन गडकरी यांनी लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

राष्ट्रीय महामार्ग १६१अ वरील धनोडा-कोठारी मार्गावरील धनोडा ते शेकापूर जुन्या पुलाप्रमाणेच यावरून जाणारा महामार्गसुद्धा अतिवृष्टी,पूर व सततच्या पावसामुळे उखडून अतिशय खड्डेमय आणि धोकादायक अवस्थेत अपघातास निमंत्रण देत आहे. आपात्कालीन काळात रुग्णवाहिका, शालेय वाहने, शेतकरी व भाविकांना रोज या मार्गावरुन प्रवास करताना अगदी जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे . महत्वाचा राष्ट्रीय महामार्ग असूनही या मार्गाकडे प्रशासनाने पाठ फिरवली असल्याचे दिसून येत आहे.

माहूर येथील सामाजिक कार्यकर्ते केशव गणपत भगत यांनी मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सदरील पुलाच्या व रस्त्याच्या गंभीर अवस्थेविषयी अवगत करत नागरिकांच्यावतीने वारंवार तक्रारी दाखल केल्या आहेत.मात्र अद्याप जुन्या पुलाची संतोषजनक दुरुस्ती किंवा नवीन पुलावरून वाहतूक सुरू करण्याविषयी कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. प्रशासनाचे मौन आणि निष्काळजीपणा हा वाहनचालकांच्या आणि पादचाऱ्यांच्या संतापाला आणखी हवा देणारा ठरत आहे. त्यामुळे जीर्णावस्थैतील धोकादायक जुना पूल तात्काळ वाहतुकीस बंद करून, तोंडावर येऊन ठेपलेल्या नवरात्रोत्सव यात्रेपूर्वी भाविकांच्या जीवाच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून तातडीने नवीन पूल वाहतुकीसाठी खुला करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते भगत यांनी केली आहे.